# संपादकीय

भारतातील ग्रंथालय प्रशिक्षणास २०११ मध्ये १०० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने देशभर विविध प्रकारचे कार्यक्रम ग्रंथालय आणि माहितीशास्त्राच्या विविध विभागांतून तसेच ग्रंथालयांमधून आयोजित करण्यात येत आहेत. मागील १०० वर्षांमध्ये ग्रंथालये व ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागांनी वेगवेगळी स्थित्यंतरे अनुभवली आहेत. कोणत्याही संस्थेचे ग्रंथालय हे त्या संस्थेचे हृदय मानले जाते. देशाच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विकासामध्ये ग्रंथालयांचे योगदान अनन्यसाधारण असते. ग्रंथालयांच्या आणि ग्रंथालय प्रशिक्षणाच्या संदर्भात अलीकडील काळात देशामध्ये दूरस्थ शिक्षणाचा प्रसार झाल्याने दूरस्थ शिक्षण प्रणालीची ग्रंथालये आणि ग्रंथालयशास्त्राचे शिक्षणक्रम विकसित होऊन शिक्षण प्रक्रियेतील पारंपरिक शिक्षणावरील काही प्रमाणात भार हलका झाला आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या ग्रंथालयशास्त्र शिक्षणक्रमांमुळे राज्यातील अनेक संस्थांना प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध झाले व त्याचबरोबर सेवांतर्गत प्रशिक्षणाची संधी ग्रंथालय सेवकांना प्राप्त झाली.

ग्रंथालय प्रशिक्षणास १०० वर्षे पूर्ण झाल्याचे औचित्य साधून ग्रंथपालनाच्या इतिहासाचा प्राचीन कालखंड मागील अंकामध्ये देण्यात आला होता. प्रस्तुत अंकात ग्रंथपालनाच्या आधुनिक कालखंडावर भाष्य करून भारतातील ग्रंथालय शिक्षणावर प्रकाशझोत टाकण्याचे प्रस्तावित आहे. भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांचे ग्रंथालय चळवळीतील योगदान त्याचबरोबर स्वातंत्र्यानंतर ग्रंथालयशास्त्र शिक्षणासंदर्भातील वेगवेगळे आयोग, समित्या, अभ्यासक्रम पुनर्रचना याबाबतची माहिती ग्रंथापालनाच्या इतिहासात देण्यात आली आहे.

माहिती तंत्रज्ञानामुळे अध्ययन-अध्यापनाचे स्वरूप बदललेले आहे. ई-लर्निंग हा त्याचा एक भाग आहे. ई-लर्निंगचे ग्रंथालयातील स्थान या विषयावर या अंकात लेख सादर करण्यात आला आहे. कोणत्याही आस्थापनेत वाचकांना समाधान करणारी



व्यवस्था असणे हे आता जागतिकीकरणाच्या जमान्यात अनिवार्य आहे. वाचक संतुष्टीच्या पाऊलखुणा अर्थात् Customer Satisfaction यावरील चर्चा ग्रंथालयाचे वाचक वाढविण्यास निश्चित मदत करेल असा विश्वास आहे. माहिती तंत्रज्ञानामुळे झालेले बदल आणि त्याच्या अतिरिक्त वापरामुळे होणारे परिणाम यासंदर्भातील चर्चा केवळ महत्त्व माहितीलाच या लेखात केलेली आहे. याशिवाय कोहा (KOHA) प्रणालीकृत ग्रंथालय संगणकीकरण उपक्रम, साहित्यसूची नियतकालिकाचे आशय विश्लेषण हा संशोधनात्मक लेख, निसकेअर व दक्षिण भारत हिंदी प्रचार सभा या संस्थांचा परिचयही वाचकांसाठी देण्यात आला आहे. ग्रंथालय सहकाराची कार्यक्षेत्रे व पुस्तक परीक्षणही अशी महत्त्वपूर्ण माहिती वाचकांना उपयोगी पडेल असा विश्वास वाटतो.

❑❑❑

# ग्रंथपालाचा इतिहास : आधुनिक काळ

डॉ. मधुकर शेवाळे
Email : m_shewale@yahoo.com

*सन २०११ मध्ये ग्रंथालय प्रशिक्षणास १०० वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने ''ग्रंथपालनाचा इतिहास'' हा लेख वाचकांसाठी सादर करण्याचे प्रयोजन आहे. मागील अंकामध्ये प्राचीन व मध्ययुगीन कालखंडातील इतिहास देण्यात आला आहे. प्रस्तुत अंकांमध्ये ग्रंथालयांच्या आधुनिक कालखंडावर भाष्य करण्यात आलेले आहे.*

## ब्रिटिश काळ (आधुनिक काळ)

व्यापाराच्या दृष्टिकोनातून इ.स. १६०० मध्ये ब्रिटिशांनी ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना केली. भारतामध्ये ब्रिटिश राज्यकर्त्यांचे काम जसजसे वाढू लागले, तसतसे त्यांना नोकरदार वर्गाची गरज भासू लागली. इंग्रजांनी अनेक शैक्षणिक संस्थांची निर्मिती केली. वॉरन हेस्टिंग्ज यांनी १७८१ मध्ये कलकत्ता, मद्रास कॉलेजची स्थापना केली. जोनाथन डुकन यांनी १७९२ मध्ये बनारस संस्कृत कॉलेजची स्थापना केली. २४ नोव्हेंबर १८०० मध्ये कोलकत्ता येथे फोर्ट विल्यम कॉलेज स्थापन करण्यात आले. १८१३ च्या चार्टर ॲक्ट (Charter Act) अन्वये अन्य कॉलेजांची स्थापना झाली. ब्रिटिशकालीन भारतात विद्यापीठीय पातळीवर शिक्षणाची व्यवस्था १८५७ मध्ये कलकत्ता या विद्यापीठांच्या स्थापनेने झाली. त्याच वर्षी मुंबई आणि मद्रास विद्यापीठाची स्थापना झाली. ही तिन्ही विद्यापीठे लंडन विद्यापीठाच्या धर्तीवर स्थापन करण्यात आली होती. सुरुवातीच्या कालखंडात परीक्षांचे आयोजन करणे एवढेच कार्य ही विद्यापीठे करीत. या विद्यापीठांचे संघटन आणि व्यवस्थापन ब्रिटिश विद्यापीठीय पद्धतीनुसार होत असे. ही विद्यापीठे जरी १८५७ मध्ये स्थापन झाली असली तरी त्यांची ग्रंथालये



स्थापन होण्यात बराच काळ गेला. कलकत्ता विद्यापीठ ग्रंथालय १८७३ मध्ये, मुंबई विद्यापीठ ग्रंथालय १८७९ मध्ये तर मद्रास विद्यापीठ ग्रंथालय १९०७ मध्ये स्थापन झाले. १९०४ मध्ये इंडियन युनिव्हर्सिटी ॲक्ट (Indian University Act) झाल्यामुळे विद्यापीठ आणि महाविद्यालये यांत ग्रंथालयांना महत्त्व प्राप्त झाले. या ॲक्टनुसार विद्यार्थ्यांना ग्रंथ देवघेवीची सुविधा उपलब्ध झाली.

इ.स. १७८४ मध्ये कलकत्ता येथे एशियाटिक सोसायटीची स्थापना करण्यात आली. इ.स. १८०४ साली मुंबई येथे तिची शाखा निघाली. १८३६ मध्ये खाजगी व्यक्तींनी एकत्र येऊन कलकत्ता पब्लिक लायब्ररीची स्थापना केली. या ग्रंथालयाचे १८४४ मध्ये मेटकॉफ हॉलमध्ये स्थलांतर झाले. लॉर्ड मेटकॉफ यांनी पोर्ट विल्यम कॉलेजमधील ४६७५ पुस्तकांचा संग्रह कलकत्ता पब्लिक लायब्ररीस दिला. १८९१ मध्ये अन्य ग्रंथालयांचा संग्रह एकत्रित करून त्याचे इम्पिरियल लायब्ररीत रूपांतर करण्यात आले. इम्पिरियल लायब्ररी ३० जानेवारी १९०३ ला जनतेसाठी खुली करण्यात आली. इम्पिरियल लायब्ररीची ध्येये आणि उद्दिष्टे गॅझेट ऑफ इंडियामध्ये देण्यात आली आहेत. "It is intended that it should be a library of reference, a working place for students and a repository of material for the future historian of India, in which, so for as possible, every work written about India, at any time, can be seen and read."

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर इम्पिरियल लायब्ररीचे नाव बदलून त्याचे राष्ट्रीय ग्रंथालयात रूपांतर झाले. १९०१ ते १९०६ या कालावधीत जॉन मॅकफरलाने हे ग्रंथपाल होते, तर हरिनाथ डे हे पहिले भारतीय ग्रंथपाल होत. राष्ट्रीय ग्रंथालयाचे प्रथम ग्रंथपाल होण्याचा मान बी.एस. केशवन यांना मिळाला. केशवन हे १५ वर्षे राष्ट्रीय ग्रंथालयाचे ग्रंथपाल होते. इम्पिरियल लायब्ररी व राष्ट्रीय ग्रंथालयाचे ग्रंथपाल व त्याचा कार्यकाळ कोष्टक १ वरून स्पष्ट होईल.

**कोष्टक १ : इम्पेरियल लायब्ररी व राष्ट्रीय ग्रंथालयाचे ग्रंथपाल व कार्यकाळ**

| क्र. | ग्रंथपाल | कार्यकाळ |
|---|---|---|
| (१) | जॉन मॅकफरलाने | १९०१-१९०६ |
| (२) | हरिनाथ डे | १९०७-१९११ |
| (३) | जे.ए.चापमन | १९११-१९३० |
| (४) | के.एम. असादुल्ला | १९३०-१९४७ |
| (५) | बी.एस. केशवन | १९४८-१९६३, १९७०-७१ |

| क्र. | ग्रंथपाल | कार्यकाळ |
|---|---|---|
| (६) | वाय.एम. मुळे | १९६३-१९६७ |
| (७) | डी.आर. कालिया | १९६७-१९७० |
| (८) | टी.के. श्रीनिवास अय्यनगार | १९७१-१९८० |
| (९) | कल्पना दासगुप्ता | १९८३-१९९५ |
| (१०) | टी.ए.व्ही. मूर्ती | १९८६-१९८७ |
| (११) | डॉ. आर. रामचंद्रन | २००१ (PLIO-I) } आजतागायत |
| (१२) | एच. पी. गेडाम | २००६ (PLIO-II) } आजतागायत |

(स्रोत : नॅशनल लायब्ररी वेबसाईट http://www.nlindia.org/history.html )

१ फेब्रुवारी १९५३ ला राष्ट्रीय ग्रंथालय जनतेसाठी खुले करण्यात आले. मौलाना अबुल कलाम आझाद यांचे हस्ते उद्घाटन कार्यक्रम पार पडला.

२६ नोव्हेंबर १८०४ रोजी लिटररी सोसायटी ऑफ बॉम्बेची स्थापना झाली. १८०५ साली रॉयल एशियाटिक सोसायटीचे ग्रंथालय स्थापन करण्यात आले. फैजी समितीच्या शिफारशीप्रमाणे राज्य मध्यवर्ती ग्रंथालय संस्थेशी ते संलग्न करून टाऊन हॉलच्या इमारतीत ते स्थापन करण्यात आले. एशियाटिक सोसायटीचे सदस्य होणाऱ्या व्यक्तीला किंवा संस्थेला तिच्या ग्रंथालयातील ग्रंथ वाचनासाठी बाहेर नेता येतात. कोणाही नागरिकाला या ग्रंथालयात वाचनासाठी मुक्त प्रवेश देण्यात येतो. या काळात स्थापन झालेली अन्य महत्त्वपूर्ण ग्रंथालये म्हणजे कलकत्ता संस्कृत कॉलेज (सन १८२४), रूरकी इंजिनीयरिंग कॉलेज (१८४७), जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया (१८५१), अलाहाबाद पब्लिक लायब्ररी (१८६३), इंडियन असोसिएशन ऑफ कल्टिव्हेशन सायन्स (१८७६), खुदाबक्ष ग्रंथालय (१८९१) कोनमिरा पब्लिक लायब्ररी, मद्रास (१८९६) ही होत.

पेशवाईचा अंत झाल्यानंतर इंग्रज सरकारच्या पुढाकाराने महाराष्ट्रात नेटिव्ह जनरल लायब्ऱ्या स्थापन करण्यात आल्या. अहमदनगर (सन १८३६), नाशिक (१८४०), मुंबई (१८४६), पुणे (१८४८), कोल्हापूर (१८५०), सातारा (१८५२), सोलापूर (१८५२) या त्या नेटिव्ह लायब्ऱ्या होत. ठाणे येथील ग्रंथसंग्रहालय १८९५ मध्ये स्थापन करण्यात आले. त्यानंतर मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाची स्थापना झाली. एका बाजूने नेटिव्ह जनरल लायब्ऱ्यांची स्थापना इंग्रजांमार्फत होत असताना देशात समाजशिक्षणाच्या उद्देशाने अन्य ग्रंथालये स्थापन करण्यात येत होती.



## ग्रंथालय शिक्षण

सध्या आपल्या देशात असलेली प्रचलित शिक्षण पद्धती स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रज राज्यकर्त्यांनी घालून दिलेली आहे. प्रारंभी प्राथमिक शाळेचे वर्ग, त्यानंतर माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षण, महाविद्यालयातून मिळणारे पदवीपर्यंतचे शिक्षण व त्यापुढे जाऊन विद्यापीठीय पातळीवर मिळणारे पदव्युत्तर, संशोधन शिक्षण अशी ही सर्वसाधारण व्यवस्था होती. १९४७ नंतर या पद्धतीत वेळोवेळी बदल करण्यात आले. स्वतंत्र भारताचा नवा नागरिक उत्तम रितीने घडवला जावा यासाठी शिक्षण पद्धतीवर सर्वांगीण विचार करण्यासाठी वेळोवेळी उच्चाधिकार आयोग, समित्या यांची स्थापना करण्यात आली. या आयोग व समित्यांनी केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याचे शासनाने प्रयत्न केले. प्राथमिक स्तरावरचा दर्जा सुधारण्याचेही मोठ्या प्रमाणावर प्रयत्न झाले. १९८६ सालचे नवे शैक्षणिक धोरण हा त्याचाच एक भाग आहे. भारताच्या शिक्षणप्रणालीला आधुनिक आणि प्रगत स्वरूप देत असताना ग्रंथालयांना सर्व पातळ्यांवर महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे. ग्रंथ व ग्रंथालये ही आपल्या शिक्षणपद्धतीची अविभाज्य अंगे आहेत, याची आपल्या देशातील राज्यकर्त्यांना व शैक्षणिक विचारवंतांना चांगली जाणीव होती. डॉ. एस.आर. रंगनाथन यांनी भारतीय ग्रंथालय चळवळीत शासनाला मोलाचे मार्गदर्शन करून महाविद्यालयीन व विद्यापीठीय ग्रंथालये सक्षम करण्याचा अविरत प्रयत्न केला आणि ग्रंथालयांचे उच्च शिक्षणातील महत्त्व लक्षात आणून दिले. १९४७ पर्यंत आपल्या देशात २० विद्यापीठांची स्थापना झाली होती. आज जवळजवळ ५७५ विद्यापीठे व तत्सम संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत.

या विद्यापीठांच्या अंतर्गत ४५,००० महाविद्यालये कार्यरत असून महाविद्यालये व विद्यापीठातून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची व शिक्षकांची संख्या प्रचंड मोठी आहे. यावरून उच्च शिक्षणाच्या विस्ताराची कल्पना येते. शाळा, महाविद्यालये व विद्यापीठे यांच्या संख्येत वाढ होण्याचे कारण म्हणजे गेल्या शतकात झालेल्या शिक्षण प्रसारामुळे व लोकसंख्या वाढीमुळे शिक्षण घेणाऱ्यांच्या संख्येतही प्रचंड वाढ झाली आहे. नवीन विषय, नवीन विद्याशाखा, नवीन क्षेत्रे यांचा उदय होत गेला. सामाजिक व आर्थिक क्षेत्रात जी परिवर्तने झालीत त्याचा परिपाक म्हणून उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सातत्याने वाढत आहे. देशातील विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात जो बदल झाला त्याचा परिणाम म्हणून इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (आय.आय.टी.) अनेक कृषी विद्यापीठे, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, इन्सडॉक (INSDOC) (आता निसकेअर), निस्साट (NISSAT) अशा विविध संस्थांची निर्मिती झाली. दूरशिक्षणाच्या प्रसारासाठी मुक्त विद्यापीठांची स्थापना हा नवीन प्रयोग उत्कृष्ट परिणाम देणारा ठरू

पाहत आहे. उच्च शिक्षण कमालीचे महागडे झाल्यामुळे ही पद्धती पारंपरिक शिक्षण पद्धतीला पर्याय म्हणून पुढे येऊ पाहत आहे. उच्च शिक्षणाच्या संदर्भात विद्यापीठीय पातळीवर झालेला विस्तार आणि आधुनिक संकल्पना या पार्श्वभूमीवर सुसज्ज आणि अद्ययावत अशा विद्यापीठ ग्रंथालयांची उभारणी करण्यात आली. डॉ. एस. आर. रंगनाथन, डॉ. सी.डी. देशमुख यांसारख्या थोर पुरुषांनी स्वतंत्र भारताच्या शैक्षणिक विकासासाठी विद्यापीठ स्तरावरील ग्रंथालयांना आधुनिक व तंत्रशुद्ध स्वरूपातील उभारणीस सल्ला व साहाय्य दिले. माहिती व ज्ञान विज्ञानाच्या क्षेत्रातील बहुविध गरजांच्या पूर्ततेसाठी आता मोलाची जबाबदारी पार पाडावी लागते आणि त्यासाठी देशातील प्रत्येक विद्यापीठात आधुनिक सुविधा व साधनांची संपन्न अशी भव्य ग्रंथालये उभी राहिलेली आपणास दिसून येतात. अशी ग्रंथालये निर्माण करण्यामध्ये प्रशिक्षित ग्रंथालय सेवकांचे योगदान मोठे आहे. प्रशिक्षित ग्रंथालय सेवक उपलब्ध करून देण्यामध्ये ग्रंथालय शिक्षण उपयुक्त ठरले आहे; ठरत आहे.

## डॉ. एस.आर. रंगनाथन : भारतीय ग्रंथालय चळवळीचे जनक

डॉ. एस.आर. रंगनाथन यांनी भारतीय ग्रंथालय चळवळीस आकार प्राप्त करून दिला. मद्रास विद्यापीठात गणित आणि भौतिकशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम करत असतानाच त्यांना मद्रास विद्यापीठात 'ग्रंथपाल' पदाची नेमणूक मिळाली. ग्रंथालयशास्त्रातील प्रशिक्षण त्यांच्याकडे नसल्यामुळे व भारतात प्रशिक्षणाची सोय नव्हती म्हणून १९२४ मध्ये त्यांना इंग्लंडला पाठविण्यात आले. ग्रंथपालनाचे शिक्षण मिळावे, तसेच इंग्लंडमधील ग्रंथालयांचे कामकाज त्यांना बघता यावे हा त्यामागील हेतू होता. इंग्लंडमधील त्यांच्या नऊ महिन्यांच्या वास्तव्यात डॉ. रंगनाथन यांनी १०० पेक्षा जास्त ग्रंथालयांच्या कामकाजाचे निरीक्षण केले. ब्रिटिश ग्रंथालये ही समाजाभिमुख व सर्व स्तरावरील लोकांना समान व उत्तम ग्रंथालयसेवा देण्यास प्रयत्नशील होती. भारताच्या बाबतीत मात्र ही परिस्थिती वेगळी होती. भारतात सर्व ग्रंथालयांना समान तत्त्वे नव्हती व ती ग्रंथालये आपापल्या वैशिष्ट्यानुसार विकसित होत नव्हती. ही परिस्थिती बदलण्यासाठी सर्व ग्रंथालयांना मार्गदर्शक ठरतील अशी तत्त्वे अगर सूत्रे केली तर ते फायदेशीर ठरेल असा विचार डॉ. रंगनाथन यांनी केला व आपले 'Five Laws of Library Science' या पुस्तकात त्यांनी हे तत्त्वज्ञान मांडले. आज भारतातच नव्हे तर जगामध्ये ग्रंथालयशास्त्राच्या संदर्भात हे पुस्तक मार्गदर्शक ठरले आहे. हे पुस्तक १९३१ मध्ये प्रकाशित झाले. त्यानंतर १९३३ मध्ये कोलन क्लासिफिकेशन (Colon Classification) आणि १९३४ मध्ये क्लासिफाईड कॅटलॉग कोड (Classified Catalogue Code) ही त्यांची महत्त्वपूर्ण पुस्तकेही प्रकाशित झालीत.



## स्वातंत्र्यपूर्व काळातील ग्रंथालय शिक्षण

स्वातंत्र्यपूर्व काळात ग्रंथालय प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्याचा मान बडोद्यास जातो. १९११ मध्ये महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या संस्थानातील ग्रंथालये उत्तम चालावीत व ग्रंथालय प्रशिक्षणाची व्यवस्था व्हावी या दृष्टिकोनातून अमेरिकन ग्रंथपाल डब्ल्यू. ए. बार्डन यांना आमंत्रित केले. बॉर्डन यांनी बडोदे संस्थानात ग्रंथालय प्रशिक्षणाचा कार्यक्रम राबविला. १९२० मध्ये आंध्र (विजयवाडा) व १९२९ पासून मद्रास ग्रंथालय संघाने ग्रंथालय प्रशिक्षणाचे कार्यक्रम सुरू केलेत. विद्यापीठ पातळीवर पहिला शिक्षणक्रम पंजाबमधील लाहोर विद्यापीठात १९१५ मध्ये सुरू झाला. या विद्यापीठात अमेरिकन ग्रंथपाल व मेलविल ड्युईचे विद्यार्थी असा डॉन डिकिन्सन यांची नेमणूक करण्यात आली. डिकिन्सनने पंजाब विद्यापीठाची तालिका तयार करून तसेच संपूर्ण ग्रंथालय प्रशासनाची व्यवस्था पाहून विद्यापीठीय पातळीवरचा ग्रंथालयशास्त्राचा पहिला शिक्षणक्रम भारतात सुरू केला. विद्यापीठाअंतर्गत ग्रंथालयशास्त्राचे शिक्षणक्रम मद्रास विद्यापीठ (१९३१), आंध्र (१९३७), बनारस (१९४१), मुंबई विद्यापीठ (१९४४) मध्ये सुरू झालेत. हे शिक्षणक्रम प्रमाणपत्र स्वरूपाचे होते. मद्रास विद्यापीठाने १९३७ मध्ये प्रमाणपत्र शिक्षणक्रमाचे रूपांतर १ वर्षाच्या पदविका शिक्षणक्रमात केले. त्यानंतर मुंबई व बनारस विद्यापीठांनीही पदविका शिक्षणक्रम सुरू केलेत. मुंबई विद्यापीठाचा शिक्षणक्रम हा अर्धवेळेचा होता. त्यासाठी सेवेत असणाऱ्या ग्रंथालय सेवकांना प्रवेश देण्यात येई. कलकत्ता विद्यापीठ व दिल्ली विद्यापीठाने पदविका शिक्षणक्रम अनुक्रमे १९४६ व १९४७ ला सुरू केला. ग्रंथालयशास्त्र शिक्षणक्रमामध्ये शिकविण्यात येणाऱ्या पाठ्यक्रमात वर्गीकरण, तालिकीकरण, ग्रंथसूची, ग्रंथनिवड आणि संदर्भ सेवा, संघटन आणि सामान्यज्ञान या तात्त्विक भागांचा तर वर्गीकरण, तालिकीकरण, ग्रंथसूची व ग्रंथनिवड या प्रात्यक्षिक भागांचा समावेश होई. या शिक्षणक्रमासाठी प्रवेश घेण्याकरिता प्री-डिग्री किंवा मॅट्रिक उत्तीर्ण अशी प्रवेश-पात्रता ठेवण्यात आली होती.

## स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रंथालय शिक्षण

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर दिल्ली विद्यापीठाने १९४९ मध्ये एम.लिब. एस्सी व पीएच.डी. हे शिक्षणक्रम सुरू केलेत. त्यानंतर १९५१ मध्ये अलीगड मुस्लीम विद्यापीठ, अलीगड, १९५६ मध्ये एम.एस. विद्यापीठ, बडोदा व नागपूर विद्यापीठ, नागपूर तर १९५६ मध्ये विक्रम विद्यापीठ, उज्जैन यांनी ग्रंथालयशास्त्राचे शिक्षणक्रम सुरू केले आहेत. आजमितीस ८५ विद्यापीठांमधून ग्रंथालयशास्त्राचे प्रमाणपत्र, पदवी, पदव्युत्तर तसेच काही विद्यापीठांमधून पीएच.डी.चे शिक्षणक्रम देण्याची व्यवस्था झाली आहे.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर विद्यापीठांच्या विकासासाठी भारत सरकारने वेळोवेळी जे आयोग नेमले, त्यामुळे ग्रंथालयांच्या व ग्रंथालयशास्त्राच्या प्रगतीस मोठा हातभार लागला आहे.

### डॉ. राधाकृष्णन कमिटी

भारतात १९४८ मध्ये 'भारतीय शिक्षण आयोग' नेमला. डॉ. राधाकृष्णन हे या आयोगाचे अध्यक्ष होते. त्यामुळे डॉ. राधाकृष्णन आयोग या नावाने तो आयोग प्रसिद्ध झाला. स्वातंत्र्यानंतर शैक्षणिक विकास साधण्यासाठी या आयोगाची स्थापना झाली. डॉ. राधाकृष्णन यांनी भारतभर फिरून अनेक शैक्षणिक तसेच विशेष ग्रंथालयांना भेटी दिल्यात. त्यांच्या कामकाजाचे निरीक्षण केले आणि शिफारशी करणारा अहवाल तयार केला.

या अहवालात ग्रंथालयांबाबत पुढील शिफारशी करण्यात आल्या.

(१) विद्यापीठ ग्रंथालय हे विद्यापीठीय शिक्षणप्रणालीचे हृदय मानले आहे.

(२) उच्च शिक्षण, व्यवस्थापन व संघटन यांत ग्रंथालयाचे स्थान महत्त्वाचे मानले जावे.

(३) वाचकांच्या गरजा लक्षात घेऊन शैक्षणिक ग्रंथालयांनी वाचनसाहित्याचा संग्रह करावा.

(४) शैक्षणिक ग्रंथालयात काम करण्यासाठी शिक्षित व प्रशिक्षित मनुष्यबळ नेमावे.

अशा स्वरूपाच्या या शिफारशी विद्यापीठ ग्रंथालयांना मार्गदर्शक ठरल्यात.

## विद्यापीठ अनुदान आयोग (University Grants Commission)

१९५६ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाची कायद्यान्वये स्थापना झाली. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या स्थापनेमुळे उच्च शिक्षणाच्या वाढ आणि विकासास चालना मिळाली. सुरुवातीच्या काळापासून आयोगाने ग्रंथालयांचे उच्च शिक्षणातील महत्त्व लक्षात घेऊन पंचवार्षिक विकास योजनांमध्ये ग्रंथालयांच्या उपक्रमांना प्राधान्य दिले. वाचनसाहित्याचा संग्रह, इमारत, कर्मचारी, आधुनिकीकरण, इत्यादींसंदर्भात कमिटी, चर्चासत्राच्या स्वरूपात विकासाच्या दृष्टिकोनातून पावले उचलण्यात आली. विद्यापीठ अनुदान आयोगाचे प्रथम अध्यक्ष डॉ. सी.डी. देशमुख यांनी १९५७ मध्ये विद्यापीठ व महाविद्यालयीन ग्रंथालयांना सुव्यवस्थित कार्यरत ठेवता यावे यासाठी आयोगाला मार्गदर्शन करणारी 'ग्रंथालय समिती' स्थापन केली. या समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. एस.आर. रंगनाथन यांची नियुक्ती करण्यात आली. या समितीचा अहवाल १९६५ मध्ये प्रसिद्ध



करण्यात आला. डॉ. रंगनाथन यांनी ग्रंथालयातील प्रत्येक कामासाठी काही प्रमाणके (Standards) तयार करण्यासाठी खूप प्रयत्न केलेत. ग्रंथालयात कर्मचारी नेमणुकीसाठी मार्गदर्शक असा 'स्टाफिंग पॅटर्न' त्यांनी सुचविला व त्याबरोबरच व्यावसायिक कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक असणारी शैक्षणिक पात्रताही त्यांनी नमूद केली. डॉ. रंगनाथन कमिटीने ज्या शिफारशी केल्या त्याचा सारासार विचार करून शास्त्रीय पातळीवर त्या प्रमाण (Norms) म्हणून स्वीकारण्यात आल्यात. आजच्या संगणकयुगात ग्रंथालय सेवांचे स्वरूप बदललेले असले तरी हे प्रमाण (Norms) आजही धोरणे ठरविण्यासाठी वापरण्यात येत आहेत.

### एज्युकेशन कमिशन रिपोर्ट (कोठारी कमिशन)

१९६४ मध्ये डॉ. डी.एस. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली भारत सरकारने शिक्षणविषयक धोरणांसाठी एक समिती स्थापन केली. या समितीने आपल्या अहवालात ग्रंथालयासंबंधी खालील शिफारशी केल्या आहेत.

(१) ग्रंथालयावरील खर्च शिक्षण संस्थेच्या एकूण अंदाजपत्रकाच्या ६.५% ते १०% दरम्यान असावा.

(२) ग्रंथालयासाठी वार्षिक वित्त निर्धारित करीत असताना प्रत्येक विद्यार्थ्यामागे रु. २५ आणि प्रत्येक शिक्षकामागे रु. ३०० याप्रमाणे आकारणी करावी. विद्यार्थी आणि शिक्षक संख्या यांना अनुसरून पैशांची तरतूद असावी.

(३) शैक्षणिक ग्रंथालयातून प्रशिक्षित कर्मचारी वर्ग नेमलेला नसतो, त्यांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था व्हावी.

कोठारी कमिशन आणि त्याआधीचे आयोग यांमुळे उच्च शिक्षण क्षेत्रातील ग्रंथालयांना खूप साहाय्य झाले. ग्रंथालयांना अनुदान, स्टाफ फॉर्म्युला व सेवकांची वेतनश्रेणी या स्वरूपात विद्यापीठ अनुदान आयोगाकडून निश्चित निर्णय प्राप्त झालेत. पंचवार्षिक योजनांमधून ग्रंथालयांना भरघोस असे अनुदानही प्राप्त झाले.

### रंगनाथन कमिटी - ग्रंथालयशास्त्र शिक्षण

१९६० मध्ये ग्रंथालयशास्त्र शिक्षणक्रमाच्या संदर्भात अध्यापन आणि संशोधनाचा आढावा घेण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली. डॉ. एस.आर. रंगनाथन हे या समितीचे अध्यक्ष होते. Library Science in Indian Universities या नावाने विद्यापीठ अनुदान आयोगाने हा अहवाल १९६५ मध्ये प्रसिद्ध केला. या समितीची पहिली सभा १९६१ मध्ये तर दुसरी सभा १९६३ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या

कार्यालयात पार पडली. या समितीने एक प्रश्नावली तयार करून ग्रंथालयशास्त्र शिक्षणक्रमाच्या संदर्भात भारतीय विद्यापीठांमधील ग्रंथालयशास्त्र विभागात उपलब्ध सुविधांची माहिती गोळा केली. या समितीने तद्नंतर विद्यापीठ अनुदान आयोगास आपला अहवाल सादर केला. यामध्ये ग्रंथालयशास्त्र शिक्षणक्रमाची उद्दिष्टे, अभ्यासक्रम, प्रवेशपात्रता तसेच बी.लिब., एम.लिब. व पीएच.डी. शिक्षणक्रमासंदर्भातील अन्य शैक्षणिक बाबींचा विचार करण्यात आला.

या समितीने ग्रंथालयशास्त्र शिक्षणासंबंधित प्रश्नांचा विचार करून भारतातील ग्रंथालयशास्त्र शिक्षणाने खालील तीन कार्ये पार पाडावीत असे सुचविले.

(१) व्यावसायिक ग्रंथपालांना प्रशिक्षित करावे.

(२) व्यावसायिक कर्मचाऱ्यांना पदवी (B.Lib.Sc.) व पदव्युत्तर (M.Lib.Sc.) शिक्षणाची संधी उपलब्ध करून द्यावी.

(३) संशोधनाच्या संदर्भात व्यावसायिक कर्मचाऱ्यांना संशोधन करण्यासाठी प्रशिक्षण द्यावे.

हा अहवाल प्रसिद्ध झाला तेव्हा भारतात पाच विद्यापीठांमध्ये ग्रंथालयशास्त्राचा पदव्युत्तर अभ्यासक्रम, अकरा विद्यापीठांत पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम आणि फक्त दिल्ली विद्यापीठात पदव्युत्तर पातळीवरचा अभ्यासक्रम सुरू होता. मात्र या अभ्यासक्रमांमध्ये सुसूत्रता नव्हती. पीएच.डी. स्तरावरचे अभ्यासक्रम विद्यापीठांनी द्यावेत असे अहवालात सुचविण्यात आले आहेत. या अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थी-शिक्षक यांचे प्रमाणही निश्चित करण्यात आले होते. पदवीसाठी हे प्रमाण १०:१ तर पदव्युत्तर शिक्षणक्रमासाठी ५:१ असावे असे नमूद केले आहे. याबरोबरच पदव्युत्तर पदविकेची समकक्षता पदवीबरोबरच (B.Lib. Sc.) सुचविली असून संशोधनाबाबतचा तपशील स्वतंत्र प्रकरणात देण्यात आला आहे.

## ग्रंथालय शिक्षणक्रम : पुनर्रचना

दिल्ली विद्यापीठात १९७३ आणि १९७७ मध्ये ग्रंथालयशास्त्र शिक्षणावर आधारित कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेतील शिफारशींवर विचार करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या ग्रंथालय समितीने १९७९ मध्ये दोन दिवसांचे चर्चासत्र भरविले होते. या चर्चासत्रात ग्रंथालयशास्त्र शिक्षणक्रमाच्या पुनर्रचनेच्या संदर्भात चार महत्त्वपूर्ण शिफारशी करण्यात आल्या.

(१) बी. लिब. व एम.लिब. हे एक वर्षाचे शिक्षणक्रम उपयुक्त आहेत, तथापि दोन वर्षे कालावधीचा संकलित अभ्यासक्रम (एम.लिब.) असावा.



(२) ग्रंथालयशास्त्राच्या अभ्यासक्रमासाठी स्वतंत्र विभाग असावा व तो अन्य विभागांच्या समकक्ष असावा.

(३) ग्रंथालयशास्त्र शिक्षणक्रमाचे नाव 'ग्रंथालय आणि माहितीशास्त्र शिक्षणक्रम' असावे.

(४) ग्रंथालयशास्त्र विभागात संशोधनाची सुविधा असावी.

ग्रंथालयात संगणकाचा वापर, माहितीचा संग्रह आणि प्रतिप्राप्ती अशा स्वरूपाच्या विषयांचा समावेश करण्याबाबत समितीने शिफारशी केल्या.

विद्यापीठ अनुदान मंडळाच्या सहकार्याने नागपूर विद्यापीठात २३ ते २६ सप्टेंबर १९८३ च्या दरम्यान ''ग्रंथालय आणि माहितीशास्त्राचे राष्ट्रीय धोरण'' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केले. या चर्चासत्रात ग्रंथालय आणि माहितीशास्त्र शिक्षणाचा सर्वांगीण विचार होऊन योग्य त्या शिफारशी विद्यापीठ अनुदान मंडळास पाठविण्यात आल्यात. ऑक्टोबर १९८५ मध्ये भारत सरकारने प्रा. पी.टी. चट्टोपाध्याय यांच्या अध्यक्षतेखाली आणि डॉ. बी.पी. बरुआ सचिव असलेली समिती ग्रंथालय आणि माहितीशास्त्र व्यवस्थेचे राष्ट्रीय धोरण (National Policy on Library and Information System - CONPOLIS) ठरविण्यासाठी नेमली. यानंतर विद्यापीठ अनुदान आयोगाने याच अध्यक्षांच्या अधिपत्याखाली आणखी एक समिती नेमली. मार्च १९८८ मध्ये या समितीने ग्रंथालय आणि माहितीशास्त्र शिक्षणासंबंधी केंद्र शासनास शिफारशी केल्या.

## कौला कमिटी - ग्रंथालय आणि माहितीशास्त्र पाठ्यक्रम विकसन समिती

१९९० मध्ये प्रा. पी.एन. कौला यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठ अनुदान आयोगाने ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयासाठी पाठ्यक्रम विकसन समिती (Curricullum Development Committee) स्थापन केली. या समितीचा अहवाल १९९२ मध्ये "Report of the Curriculum Development Committee on Library and Information Science" या नावाने प्रसिद्ध झाला.भारतातील सर्व विद्यापीठांमध्ये समान अभ्यासक्रम सुरू होण्यास त्यामुळे मदत झाली. बी.लिब. व एम.लिब. शिक्षणक्रमातील अभ्यासक्रमांमध्ये सर्व विद्यापीठांत एकरूपता आली. या अहवालात दोन वर्षे कालावधीच्या एम.लिब. आय.एस्सी. चाही आराखडा सुचविण्यात आला आहे. दोन वर्षे कालावधी असलेल्या शिक्षणक्रमाचा आराखडा हा पदवी (बी.लिब.) आणि पदव्युत्तर पदवी (एम.लिब.) अभ्यासक्रमांचा एकत्रित विचार करून ठरविण्यात आला आहे. याशिवाय संशोधनासाठी अभ्यासक्रम उद्दिष्टे, गुणविशेष आणि

कार्यपद्धती सुचविली आहे. ग्रंथालय आणि माहितीशास्त्राच्या उजळणी वर्गाची (Refresher Course) उद्दिष्टे आणि कार्यप्रणालीही या अहवालात नमूद करण्यात आली आहे. राष्ट्रीय स्तरावर सुसूत्रता आणण्याचा हा पहिलाच प्रयत्न म्हणावा लागेल.

या अहवालानुसार पदवी शिक्षणक्रमासाठी (B.Lib.) खालील आठ अभ्यासक्रम (पेपर) सुचविण्यात आले.

(१) ग्रंथालय आणि समाज
(२) ग्रंथालय व्यवस्थापन
(३) वर्गीकरण तात्त्विक
(४) वर्गीकरण प्रात्यक्षिक
(५) तालिकीकरण तात्त्विक
(६) तालिकीकरण प्रात्यक्षिक
(७) संदर्भसाधने आणि संदर्भसेवा
(८) संगणकाचा ग्रंथालयात उपयोग

याशिवाय १६ ऐच्छिक अभ्यासक्रमांची (पेपर्स) यादी या अहवालात देण्यात आली आहे. विविध प्रकारच्या ग्रंथालयांचा अभ्यास या ऐच्छिक अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आला असून विद्यार्थ्यांना त्यातून आवश्यक ते अभ्यासक्रम निवडण्याची सुविधा उपलब्ध केली आहे.

पदव्युत्तर पदवीसाठी (एम.लिब.) पाच आवश्यक अभ्यासक्रम सुचविण्यात आलेत.

(१) माहितीशास्त्र आणि संप्रेषण
(२) ग्रंथालय आणि माहितीकेंद्रांचे व्यवस्थापन
(३) संगणक तंत्रज्ञान, ग्रंथालय संगणकीकरण व माहिती प्रणाली
(४) माहिती प्रक्रिया व प्रतिप्राप्ती
(५) संशोधन पद्धती व इन्फॉरमेटिक्स (Informatics)

ऐच्छिक अभ्यासक्रमात एकूण सहा पेपर सुचविण्यात आले आहेत.

(१) तौलनिक व आंतरराष्ट्रीय ग्रंथपालन
(२) उच्च शिक्षण व शैक्षणिक ग्रंथालये
(३) संप्रेषण, समूहसंपर्क साधने व सार्वजनिक ग्रंथालये
(४) ग्रंथ, ग्रंथनिर्मिती व ग्रंथसूचीय नियंत्रण (Bibliographic control)
(५) उपभोक्ता प्रशिक्षण व उपभोक्ता अभ्यास
(६) ग्रंथालय व माहितीशास्त्राचे शिक्षण



या सहा ऐच्छिक विषयांपैकी आवश्यक ते विषय निवडीचे स्वातंत्र्य देण्यात आले होते.

कौला कमिटीच्या अहवालात राष्ट्रीय स्तरावर प्रथमच प्रस्तावीत अभ्यासक्रमात सर्व पैलूंचा विचार करून वर्गीकरण, तालिकीकरण, संदर्भसेवा, व्यवस्थापन अशा महत्त्वाच्या बाबींवर भर दिल्यामुळे ग्रंथालयातील प्रत्येक कामाचे ज्ञान, ग्रंथालय पदवीधरास मिळणे शक्य झाले. प्रत्येक अभ्यासक्रमाची उद्दिष्टे स्वतंत्रपणे देऊन, आवश्यक त्या संदर्भपुस्तकांची शिफारस करण्यात आली आहे. या अहवालात काही उणिवाही दिसून आल्या आहेत. ऐच्छिक अभ्यासक्रमांपैकी किती अभ्यासक्रम निवडायचे हे सांगितले नसून प्रात्यक्षिक व तात्त्विक परीक्षा किती गुणांची असावी हे स्पष्ट करण्यात आलेले नाही. मात्र राष्ट्रीय पातळीवर सुसूत्रता आणण्याचा हा महत्त्वाचा प्रयत्न या अहवालाच्या रूपाने करण्यात आला आहे.

## करिसिद्दपा कमिटी

१९९७ मध्ये डॉ. सी.आर. करिसिद्दपा यांच्या अध्यक्षतेखाली ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अभ्यासक्रम विकसनासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने एक समिति नेमली (सीडीसी). विभागवार बैठका घेऊन, तसेच शिक्षणक्रम राबविणाऱ्या संस्थांकडून प्रश्नावलीच्या आधारे माहिती घेऊन आणि माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव लक्षात घेऊन एक अहवाल तयार करण्यात आला. या अहवालात ग्रंथालयशास्त्राचा पदवी (B.Lib & I.Sc.) आणि पदव्युत्तर (M.Lib. & I.Sc.) या द्विस्तरीय शिक्षणक्रमाऐवजी दोन वर्षे कालावधीचा एकत्रित पदव्युत्तर (Integrated M. Lib. & I. Sc.) शिक्षणक्रमाची शिफारस करण्यात आली. या समितीने सुचविलेला शिक्षणक्रम लवचीक (Modular) स्वरूपाचा आहे. या शिक्षणक्रमात स्थानिक परिस्थितीनुसार २०% बदल करण्याची मुभा देण्यात आली आहे. साधनसुविधेच्या संदर्भात प्रात्यक्षिकांसाठी वर्गीकरणाच्या सारणी (Classification Schedules), विषयशीर्षके यादी (Subject Headings Lists) आणि शब्दकुलकोश (Thesauri), इत्यादी दोन विद्यार्थ्यांस १ संच या प्रमाणात (२:१) ग्रंथालयशास्त्र विभागात उपलब्ध असावीत असे सुचविले आहे. ग्रंथालयात मुद्रित व अमुद्रित साहित्याचा चांगला ग्रंथसंग्रह असावा, संगणक प्रात्यक्षिकांसाठी माहिती तंत्रज्ञानाची सुसज्ज अशी कार्यशाळा असावी व पाच विद्यार्थ्यांसाठी एक संगणक असावा असे सुचविण्यात आले आहे. कौला कमिटीचा अहवाल आणि डॉ. रंगनाथन कमिटीचा अहवाल (१९६५) हा आधारभूत पाया धरून शिक्षकांची संख्या असावी असेही अहवालात नमूद करून माहिती-तंत्रज्ञानाच्या अनुषंगाने वाढीव मनुष्यबळाची गरजही प्रतिपादित केली आहे. माहिती-तंत्रज्ञानाचा अंगाने होऊ घातलेले बदल विद्यार्थ्यांपर्यंत

पोहोचविण्याच्या दृष्टिकोनातून असलेल्या उजळणी वर्गाची उद्दिष्टेही त्यानुसार ठरविण्यात यावीत अशी शिफारस करण्यात आली आहे.

सीडीसी चा हा अहवाल दूरशिक्षण देणाऱ्या संस्थांसाठीही लागू असून त्यांनी सुचविलेला अभ्यासक्रम एक वर्षाच्या बी.लिब. व एक वर्षाच्या एम.लिब. साठी स्वीकृत करण्यात यावा अथवा दोन वर्षांचा एकत्रित एम.लिब. शिक्षणक्रम सवडीनुसार तयार करण्यात यावा असे नमूद करण्यात आले आहे. दूरशिक्षण परिषदेने (DEC) १९९६ मध्ये ग्रंथालय आणि माहितीशास्त्र शिक्षणक्रमासाठी जी नियमावली तयार केली आहे ती थोड्याफार फरकाने जशीच्या तशी सीडीसीमध्ये स्वीकारण्यात आली आहे. या नियमावलीतील तरतुदी खालीलप्रमाणे आहेत.

(१) बी. लिब. प्रवेशाची पात्रता खालील प्राधान्यक्रमाने असावी.
   (क) पदवीधर आणि दोन वर्षांचा ग्रंथालयीन कामांचा अनुभव
   (ख) पदवीधर आणि ग्रंथालयशास्त्रातील पदविका / प्रमाणपत्रधारक
   (ग) व्यावसायिक पदवीधर (कायदा, औषधनिर्माण, अभियांत्रिकी)
   (घ) पदवीधर ५०% गुणांसह
(२) तात्त्विक व प्रात्यक्षिक भागांसाठी संमंत्रणसत्रे वाढवावीत.
(३) संगणक प्रात्यक्षिकांचा अंतर्भाव बी.लिब. व एम.लिब. शिक्षणक्रमांमध्ये सक्तीचा करावा.
(४) विद्यापीठ अनुदान आयोगाने तयार केलेला अभ्यासक्रम मुक्त विद्यापीठांनी / मुक्त शिक्षणसंस्थांनी अमलात आणावा.
(५) बी.लिब. शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी Internship असावी व विविध ग्रंथालयांना भेटी द्याव्यात.
(६) प्रात्यक्षिकांसाठी लागणारी साधन सुविधा (संगणक हार्डवेअर, सॉफ्टवेअर, संदर्भपुस्तके) अभ्यासकेंद्रावर व मुख्यालयात उपलब्ध असावीत.
(७) संमंत्रकांना ग्रंथालय माहिती क्षेत्रातील वर्तमान घटना माहीत होण्यासाठी मुक्त विद्यापीठांनी / मुक्त शिक्षणसंस्थांनी संमंत्रण प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करावे.

### (अ) सीडीसीनुसार ग्रंथालयशास्त्र शिक्षणक्रम संरचना (Module)

करिसिद्दपा कमिटीचा अहवाल २००१ मध्ये 'UGC Model Curriculum : Library and Information Science' या नावाने प्रसिद्ध झाला. हा अहवाल सीडीसी अहवाल म्हणून ओळखला जातो.

सीडीसीच्या अहवालात अभ्यासक्रमांची ७ प्रमुख विभागांत (Module) मांडणी



करण्यात आली आहे.

(१) ग्रंथालय आणि माहितीशास्त्राचा अधिष्ठान अभ्यासक्रम.
(२) ज्ञान व्यवस्थापन, माहिती प्रक्रिया व प्रतिप्राप्ती
(३) माहिती साधने - निर्मिती व सेवा
(४) ग्रंथालय आणि माहितीकेंद्रांचे व्यवस्थापन
(५) माहिती तंत्रज्ञान - प्राथमिक माहिती आणि उपयोजन
(६) संशोधन पद्धती आणि सांख्यिकीय तंत्रे
(७) ऐच्छिक : माहिती प्रणाली

वरील विभागाप्रमाणे (Module) ग्रंथालयशास्त्राचा शिक्षणक्रम पुढील चार पातळ्यांवर शिकवला जावा असे सीडीसीमध्ये सुचविण्यात आले आहे.

**कोष्टक २ : सीडीसीनुसार ग्रंथालयशास्त्र शिक्षणक्रम : प्रवेशपात्रता**

| क्र. | कालावधी | अभ्यासक्रमाचे नाव | प्रवेशपात्रता | पदवी |
|---|---|---|---|---|
| (१) | १०+२+३+१ | बॅचलर ऑफ लायब्ररी ॲण्ड इन्फर्मेशन सायन्स | कोणत्याही शाखेचा पदवीधर | बी.लिब. आय.एस्सी. |
| (२) | १०+२+३+१+१ | मास्टर ऑफ लायब्ररी ॲण्ड इन्फर्मेशन सायन्स | बी.लिब.आय. एस्सी. | एम.लिब.आय. एस्सी. |
| (३) | १०+२+३+१ | मास्टर ऑफ लायब्ररी इन्फर्मेशन सायन्स (एकत्रित) | कोणत्याही शाखेचा पदवीधर | एम.लिब.आय. एस्सी. |
| (४) | १०+२+३+१ | मास्टर ऑफ लायब्ररी इन्फर्मेशन सायन्स | कोणत्याही पदवीधर (ग्रंथालयशास्त्र ऐच्छिक विषय घेऊन) | एम.लिब.ॲण्ड आय.एस्सी. |

(स्रोत : UGC Model Curriculum : Library and Information science, 2001)

एकत्रित एम.लिब. चा अभ्यासक्रम हा १६ पेपरमध्ये ४ सत्रांत देण्यात आला

आहे. पहिल्या वर्षी ८ पेपर (२ सत्रे), व दुसऱ्या वर्षी ८ पेपर (२ सत्रे) असे त्याचे स्वरूप करण्यात आले आहे. दोन्ही वर्षं मिळून अंतर्गत मूल्यमापन व प्रात्यक्षिकांसाठी ५७० गुण तर तात्त्विक भागासाठी ४३० गुण मिळून एकूण १००० गुणांचा व ६४ श्रेयांकांचा शिक्षणक्रम देण्यात आला आहे. प्रत्येक अभ्यासक्रम हा ४ श्रेयांकांचा आहे. १०० गुणांच्या प्रबंधिकेचाही या अभ्यासक्रमात समावेश आहे.

सु.प्र. सातारकर यांनी त्यांच्या 'ग्रंथालय आणि माहितीशास्त्र पुनर्रचना २००२' या लेखात करिसिद्दपा समितीने सुचविलेल्या अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये व उणिवा नमूद केल्या आहेत. त्यानुसार या अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

(१) प्रात्यक्षिक कार्याकरिता अभ्यासक्रमात पुरेसे महत्त्व दिले आहे.
(२) अभ्यासक्रमामध्ये विविध प्रश्नपत्रिका व त्यांचे गुण प्रथमच दर्शविण्यात आले आहेत. त्यामुळे पाठनियोजन सोपे जाते.
(३) प्रत्येक प्रश्नपत्रिकेसाठी किती तास अध्यापन केले जावे ते दर्शविले आहे.
(४) नवीन तंत्रज्ञानाचा ग्रंथालयशास्त्रावर झालेला प्रभाव लक्षात घेतला आहे. त्यासाठी ४०० गुण आहेत.
(५) विद्यार्थ्याने एक छोटा प्रकल्प पूर्ण करावा असे सांगितले असून त्याला ५० गुण आहेत. त्यामुळे संशोधनाचा प्रत्यक्ष अनुभव घेणे शक्य होईल.
(६) प्रबंधिका अथवा प्रकल्प कार्याचा समावेश केल्यामुळे विद्यार्थी स्वतंत्रपणे विचार करण्यास व लिखाणास उद्युक्त होईल.
(७) ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागात माहिती-तंत्रज्ञानाची प्रयोगशाळा असावी असे सुचविल्यामुळे पारंपरिक ग्रंथालयांचा बदललेला चेहरा नागरिकांसमोर येणार आहे.
(८) दूरशिक्षणाद्वारे ग्रंथालयशास्त्राचे अध्ययन-अध्यापन करणाऱ्या संस्थांसाठी स्वतंत्र प्रकरणात चर्चा करण्यात आली आहे व उपयुक्त सूचनाही केल्या आहेत.
(९) ग्रंथालयशास्त्राचे शिक्षण विविध स्तरांवर उपलब्ध केले जावे ही अभ्यासक्रमातील सूचना स्वागतार्ह आहे.
(१०) सुचविलेल्या अभ्यासक्रमात २०% बदल करण्याची मुभा दिल्यामुळे अभ्यासक्रम लवचीक झाला आहे.

सातारकरांनी वर नमूद केलेली वैशिष्ट्ये लक्षात घेता उच्च आधुनिक तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करून ग्रंथालये समाजाभिमुख होण्यासाठीचा विचार सीडीसी अहवालात करण्यात आला आहे.



सातारकरांच्या मतानुसार सीडीसीने सुचविलेल्या अभ्यासक्रमात पुढील उणिवा आहेत.

(१) पारंपरिक ग्रंथपालनातील कामे जसे वर्गीकरण, तालिकीकरण अथवा संदर्भसेवा यांचे अभ्यासक्रमातील महत्त्व कमी करण्यात आले आहे.
(२) वर्गीकरण व तालिकीकरण प्रात्यक्षिक कामांचे गुण कमी केल्यामुळे ग्रंथपालनातील मूलभूत कार्याचा अनुभव विद्यार्थ्यांना कमी प्रमाणात मिळेल.
(३) माहिती-तंत्रज्ञानाच्या शिक्षणासाठी दिलेले महत्त्व अवास्तव वाटते.
(४) ग्रंथालय व्यवस्थापन, प्रत्यक्ष ग्रंथालयातील कामे यांसाठी एका प्रश्नपत्रिकेत केवळ एक घटक दर्शविला आहे. त्यामुळे ग्रंथालयातील प्रत्यक्ष कामकाजाची माहिती कमी प्रमाणात मिळेल.
(५) एम.लिब.आय.एस्सी. अभ्यासक्रम पूर्ण करणारे विद्यार्थी महाविद्यालयात, संशोधन संस्थांमध्ये ग्रंथपाल होऊ शकतात, परंतु या ग्रंथालयांची कार्यप्रणाली समजण्याकरिताचे घटक यात समाविष्ट नाहीत.
(६) बी.लिब.आय.एस्सी. व एम.लिब.आय.एस्सी. या द्विस्तरीय अभ्यासक्रमांऐवजी एकत्रित एम.लिब.आय.एस्सी. चा वर्ग चालविण्याची शिफारस सयुक्तिक वाटत नाही. ग्रंथालयातील कनिष्ठ पदांकरिता तसेच सार्वजनिक, शालेय ग्रंथालयांकरिता बी.लिब.आय.एस्सी. पदवीधारकांची गरज राहणार आहे.

उणिवांवर टिप्पणी करताना सातारकर म्हणतात,

''या अहवालाची वैशिष्ट्ये बघता नवीन माहिती-तंत्रज्ञानाचा वेध घेणारा अभ्यासक्रम विद्यापीठ अनुदान मंडळाने तयार करून दिला आहे. मात्र ग्रंथालयांची सध्याची परिस्थिती पाहता हे तंत्रज्ञान खऱ्या अर्थाने किती ग्रंथालयांमध्ये वापरले जाईल याचे उत्तर येणारा काळच देईल व त्यावरच या पुनर्रचनेची यशस्विता अवलंबून राहील.''

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सीडीसी अहवालातील सातारकरांनी वर नमूद केलेल्या उणिवा लक्षात घेता कनिष्ठ पातळीवर मनुष्यबळ उपलब्धीच्या संदर्भात सीडीसी अहवालात कोणताही विचार करण्यात आला नसून ग्रंथपालनाची तांत्रिक स्वरूपाची कार्ये तसेच व्यवस्थापकीय कार्ये यांवर भर देण्यात आलेला नसल्यामुळे प्रत्यक्ष कृती वा कामकाजाची माहिती विद्यार्थ्यांना फार कमी प्रमाणात मिळेल. अशा प्रकारचा अनुभव लक्षात घेऊन त्या संदर्भातील विचार पुढील पुनर्रचना करताना करणे गरजेचे आहे.

## सारांश

वाचनसाहित्याचा विकास हा सामाजिक, शास्त्रीय, शैक्षणिक, इत्यादी विकासाबरोबर होत गेलेला आढळतो. उदाहरणार्थ, पॅपिरसपासून सीडीरोमपर्यंत वाचनसाहित्याचे बदलते स्वरूप व वाचकांच्या बदलत्या गरजा यांना पूरक असे बदल ग्रंथालय व्यवस्थापनात होत गेले. बदललेल्या ग्रंथालयाचे व्यवस्थापन अधिक चांगल्या पद्धतीने करता यावे यासाठी चांगल्या प्रशिक्षणाची आवश्यकता निर्माण होत गेली. ही आवश्यकता पूर्ण करण्यासाठी ग्रंथालयशास्त्राच्या शिक्षणक्रमामध्ये वेळोवेळी योग्य ते बदल होत गेल्याचे वरील ऐतिहासिक आढाव्यावरून दिसून येते.

## संदर्भ


(१) Kumar, P. S. G. (2000). *Indian library chronology.* Ahmedabad : Allied Publishers, p. 1.

(२) Association of Indian Universities.(2002). *AIU handbook (29th ed.).* New Delhi : AIU, p. xii.

(३) India · Ministry of Information and Broadcasting. (2003). *India : a reference annual.* New Delhi : Publication Division, p. 91.

(४) नरगुंदे, रेवती. (२००२). *ग्रंथालये आणि सामाजिक विकास.* पुणे : युनिव्हर्सल प्रकाशन, पृ. २३- २४.

(५) Ranganathan, S. R. (1931). *Five laws of library science.* Bombay : Asia Publishing House, p. 449.

(६) Patel, Jashu and Kumar, Krishan. (2000). *Libraries and librarianship in India.* London : Greenwood Press, p. 3.

(७) India · University Grants Commission. (1948). Chariman : *S. Radhakrishnan, Report.* New Delhi : Govt. of India, 1950, p. 110.

(८) India · University Grants Commission. (1965). *University and college libraries containing the report of the library committee and the proceedings of the seminar.* New Delhi : UGC, p. 228.

(९) India Education Commission. (1964). Chariman : *D. S. Kothari, Report.* New Delhi : UGC, 1966, p. 287.

(१०) India · University Grants Commission. (1961). *Review Committee : Library science in Indian universities.* New Delhi : UGC, 1965, p. 86

(११) India · University Grants Commission. (1992). *Curriculum development committee in library and information science, Report.* New Delhi : UGC, p. 1-173.

(१२) India · University Grants Commission. (2001). *Curriculum development committee in library and information science, Report.* New Delhi : UGC, p. 1-147.

(१३) सातारकर, सु. प्र. (२००२). ग्रंथालय आणि माहितीशास्त्र पुनर्रचना - २००२. *ज्ञानगंगोत्री, ३(१),* पृ. २३-३२.


❑❑❑

# ई-लर्निंगचे ग्रंथालयातील स्थान

डॉ. प्रतिभा गोखले
विभाग प्रमुख व विद्यापीठ ग्रंथपाल, ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग,
मुंबई विद्यापीठ, मुंबई
pratibha_gokhale@yahoo.com

*शैक्षणिक परंपरेचा विचार करताना ज्ञान संपादन, त्याचे प्रकटीकरण, विस्तार व त्यातील देवाणघेवाण करण्याच्या प्रक्रियेचा धांडोळा घेणे अपरिहार्य आहे. जगभरात झालेल्या सामाजिक, आर्थिक स्थित्यंतराबरोबरच तंत्रज्ञानाने फार मोठी झेप घेतली. या साऱ्याचे प्रतिबिंब शैक्षणिक क्षेत्रात दिसून येणे स्वाभाविकच आहे. ग्रंथालये व शिक्षण यांचा अतूट संबंध अधोरेखित करताना या क्षेत्रात होणारे विविध बदल व त्या त्या वेळची सामाजिक गरज यांचा विचार होणे जरुरीचे आहे. प्रस्तुत लेखात ई-लर्निंगची संकल्पना, त्याचा पूर्व इतिहास, फायदा व मर्यादा यांचा ग्रंथालयीन क्षेत्राशी सांगड घालण्याचा प्रयत्न केला आहे.*

## प्रस्तावना

ज्ञान संपादन करण्याची प्रक्रिया जेव्हा विचारात घेतली जाते, तेव्हा सर्वप्रथम पारंपरिक शिक्षण पद्धतीतील वर्ग, फळा, खडू, वर्गातील मुले, शिक्षक, वगैरेचे चित्र आपल्या डोळ्यांसमोर येते. ज्ञानाचा स्रोत हा फार प्राचीन काळापासून अव्याहत, अखंडपणे विविध पद्धतीने व माध्यमांद्वारे आपल्यापर्यंत येऊन पोचतो. फार पूर्वी मेंदू हा ज्ञानामृत साठवून ठेवण्याचा कलश होता. आजकालच्या संगणकीय भाषेत Hard Disk Memory होती. श्रुती, स्मृतीद्वारे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ज्ञान प्रसारण होत असे. शिल्पकला, शिलालेख, चित्रलिपी, ताम्रपट, भूर्जपत्रे ही माध्यमे व साधने होती. कालांतराने कागदाचा शोध, लिखीत लिपीमधील सुधारणा (ब्राह्मी, खरोष्टी, देवनागरी),



भाषांमधील संस्करण (संस्कृत ते प्राकृत ते आधुनिक मराठी), छपाई यंत्राचा शोध, वगैरे टप्पे पार करता करता ग्रंथालये, ग्रंथ प्रकाशन या साऱ्याचाही विस्तार होऊ लागला व इतर ज्ञानशाखांचा त्यावरील परिणाम स्पष्ट होऊ लागला.

२० वे शतक हे विज्ञान व तंत्रज्ञानाचेच शतक होते असे म्हटले तर फारशी अतिशयोक्ती होणार नाही. सामाजिक, आर्थिक स्थित्यंतरांबरोबर तंत्रज्ञान, दळणवळणाची साधने, दृक-श्राव्य माध्यमांची झेप तर अचंबित करणारीच होती व या साऱ्यांचे शैक्षणिक क्षेत्रावर प्रतिबिंब पडणे स्वाभाविक किंबहुना अपरिहार्यच होते.

## ई-लर्निंग म्हणजे काय ?

शिक्षण घेणे अथवा शिकविण्याच्या प्रक्रियांचा अधिक विस्ताराने विचार करावयाचा झाल्यास प्रामुख्याने तीन घटक लक्षात घेतले जातात.

(१) स्वरूप : पारंपरिक, दूरस्थ, विशेष कौशल्य आत्मसात अथवा वृद्धिंगत करण्यासाठी, आत्मानंदासाठी

(२) माध्यम अथवा पद्धती : खडू-फळा पद्धत, दृक्-श्राव्य, संगणकाच्या सहाय्याने, इंटरनेटद्वारे, गुरुकुल पद्धत

(३) विद्यार्थी (उपभोक्ता) : कुशल, अर्धकुशल, प्राथमिक ज्ञान असलेला, संपूर्णतः अकुशल, सर्वसाधारण शिक्षित, उच्चशिक्षित या बरोबरच एक सर्वसमावेशक असा चौथा घटक वेगाने पुढे येऊ पाहत आहे आणि तो म्हणजे ई-लर्निंग - ज्यामध्ये वरील सर्व बाबींचा समावेश होतो. शैक्षणिक व सामाजिक बांधीलकी जपत तंत्रज्ञानाच्या साहाय्याने प्राप्त केलेले ज्ञान म्हणजेच ई-लर्निंग.

ई-लर्निंग म्हणजे फक्त संगणक किंवा इंटरनेट याचाच वापर करणे नसून वेगवेगळ्या तंत्रांचा एकत्रित किंवा सुटे-सुटेपणाने उपयोग करून घेणे. CD-ROM, DVD, Video tapes, इंटरॲक्टीव, T.V. यांसारख्या विविध इलेक्ट्रॉनिक अथवा साठवण माध्यमांचा उपयोग करून शैक्षणिक उद्दिष्टांची पूर्तता करणे, ज्यायोगे शिक्षण हे निव्वळ पुस्तकी न राहता 'प्रयोगशील' बनविण्यास उद्युक्त करते ते ई-लर्निंग. ई-लर्निंगची संकल्पना दूरस्थ व मुक्त अध्ययन पद्धतीला जवळची आहे.

## ई-लर्निंगचा इतिहास

ई-लर्निंगच्या इतिहासाचा मागोवा घेताना प्रसिद्ध इंग्रजी लेखक ई.एम. फोर्सटर यांचा उल्लेख केलाच पाहिजे किंबहुना या संकल्पनेचा तो जनक मानला पाहिजे. १९०४ साली त्याने The Machine या नावाची एक काल्पनिक लघुकथा लिहिली, ज्यात

त्याने Virtual community, Video conferencing, e-learning वगैरे संकल्पना मांडण्याचा प्रभावीपणे प्रयत्न केला.

त्यानंतर १९२० साली अमेरिकेतील ओहायो राज्यातील मानसशास्त्र विषयाचे प्राध्यापक सिडनी प्रेसे यांनी Teaching Machine या यंत्राचा शोध लावला व त्याच्या मदतीने विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरेल अशी वेगवेगळ्या विषयांवरची एक प्रश्नपेढी तयार केली.

१९६० च्या सुमारास स्टॅन फोर्ड विद्यापीठातील दोन प्राध्यापक Partick Suppes and Richard Atkinson यांनी लहान मुलांना संगणकाच्या साहाय्याने गणित विषय सोपा करून शिकविण्याच्या एक यशस्वी उपक्रम राबविला. १९६५ साली IBM या जगप्रसिध्द संगणक कंपनीने Course Writer या नावाची एक ऑनलाईन लर्निंग संगणक प्रणाली तयार केली. यामुळे शिक्षक, विद्यार्थी, अभ्यासक्रम तयार करणारे तज्ज्ञ या सर्वांमध्ये एक उत्तम दुवा साधण्याचा चांगला प्रयत्न सुरू झाला.

तत्पूर्वी अमेरिकेतील पेनिसिल्व्हिया विद्यापीठाने Computer Assisted Internet Lab (CAIL) या नावाची एक प्रयोगशाळा स्थापन केली. सत्तरच्या दशकात Computer Mediated Communication (CMC) च्या माध्यमातून ई-मेल, इन्स्टंट मेसेजिंग या संकल्पना उदयास आल्या.

१९७५ साली स्टीव्ह जॉब्स व स्टीव्ह वॉझनिॲक यांनी लावलेल्या पर्सनल कॉम्प्युटरच्या शोधामुळे ई-लर्निंगच्या कल्पनेला अधिक चालना मिळाली. ९० च्या दशकातील टीम बर्नर्स ली या ब्रिटिश तंत्रज्ञाने लावलेल्या World Wide Web (WWW) च्या अत्याधुनिक शोधामुळे तर या क्षेत्रात क्रांतिकारक बदल झाले.

## ई-लर्निंग प्रसारणाची साधने (Tools)

ई-लर्निंगमध्ये ज्ञान प्रसारण करण्यासाठी प्रामुख्याने दोन तऱ्हेची साधने वापरली जातात. ती म्हणजे - (१) ऑथरिंग टूल्स व (२) डिलीव्हरी टूल्स.

### (१) ऑथरिंग टूल्स

ही एक तऱ्हेची ॲप्लिकेशन सॉफ्टवेअर असतात ज्याच्या उपयोग प्रामुख्याने शिक्षणासाठी उपयोग केला जातो. उदाहरणार्थ, कशा रितीने अभ्यासक्रम लिहिला जावा. याचा पहिला प्रयोग १९८० साली प्रायोगिक तत्त्वावर न्यूयॉर्कमधील १२ शाळांमध्ये पीटर कोपेन या शास्त्रज्ञाने केला. त्याने मुलांसाठी अभ्यासाशी निगडित काही साहित्य तयार केले व नेटवर्कच्या व संगणकाच्या सहाय्याने या १२ शाळा एकमेकांशी जोडण्यात



आल्या. त्यायोगे विद्यार्थ्यांना वैचारिक देवाणघेवाण करण्यासाठी, एकमेकांचे प्रश्न समजून घेण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध झाले.

ऑथरिंग टूल्स ही HTML, XML किंवा DHTML प्रकारात उपलब्ध असतात. अतिशय आकर्षक व तंत्रशुद्ध साधने वापरून कल्पकतेने याचा वापर करता येतो. विद्यार्थ्यांना ज्या स्वरूपात, जसा हवा त्या पद्धतीने उदा. पुस्तकातील धड्यांप्रमाणे, ग्राफिक्स, चार्टस, आकृत्यांच्या साहय्याने समजेल अशा पद्धतीने अभ्यासक्रम तयार केला जातो. कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial intelligence) तंत्राचा विकास करून विविध विषयांवर Expert systems तयार केल्या गेल्या आहेत. उदा. विशिष्ट रासायनिक प्रक्रिया पुढे कशा पद्धतीने मार्गक्रमणा करेल यासाठी पूर्वी शास्त्रज्ञ तासन्‌तास प्रयोगशाळेत खर्च करीत असे. आता Modecular Modeling या तयार प्रणालीमार्फत हीच प्रक्रिया थोडक्या वेळात पूर्ण होऊ शकते. एखाद्या विशिष्ट आजारपणावर उपाय हवा असेल तर काही आज्ञावलींचा उपयोग करून योग्य तो उपाय चटकन सुचविला जाऊ शकतो. कुशल सर्जनच्या अनुपस्थितीत संगणकाद्वारे एखादी अवघड शस्त्रक्रियादेखील यशस्वीपणे पार पाडता येणे शक्य आहे. (थ्री इडियटसमधील प्रसंग आठवा) ही सारी प्रगत ई-लर्निंगचीच उदाहरणे आहेत. या साधनांना Course Management Systems म्हणूनही संबोधले जाते. या साऱ्यांची किंमत त्या त्या अभ्यासक्रमाच्या स्वरूपावर व गुंतागुंतीवर अवलंबून असते.

### (२) डिलीव्हरी टूल्स

उपभोक्ता विद्यार्थ्याला कुठल्या पद्धतीने अथवा साधनांद्वारे शिक्षण हवे आहे तसेच तो On line वा Off lime पद्धतीने शिक्षण घेणार आहे यावर Delivery tools चे स्वरूप ठरते. ऑडिओ टेप्स, व्हिडीओ टेप्स, संगणकीय फाईल्स, ई-प्रिंटस्, केबल टी.व्ही. वगैरेसारख्या माध्यम व साधनांद्वारे दूरस्थ पद्धतीने प्रगत संगणक आज्ञावली वापरून ई-लर्निंग द्वारा शिक्षण प्राप्त केले जाते.

### (अ) Synchronous Learning

यामध्ये विद्यार्थी व शिक्षक एकाच वेळी स्वतंत्रपणे दोन वेगवेगळ्या संगणकांद्वारे, नेटवर्कच्या साहाय्याने एकमेकांशी संवाद साधून चॅट रूम्स, टेलि कॉन्फरसिंग, व्हिडीओ कॉन्फरसिंग पद्धतीने परंतु Online संवाद साधत असतात. शेअर्ड व्हाईट बोर्डचा उपयोग करून एक शिक्षक एकाच वेळी अनेक विद्यार्थ्यांशी संपर्कात राहू शकतो.

## (आ) Asynchronous Learning

यामध्ये शिक्षकाने तयार केलेला अभ्यासक्रम विद्यार्थी स्वत:च्या सोयीने, आपल्या वेळात Off line पद्धतीने वेबफोरम्स, लीस्ट सर्व्हज्, ब्लॉग्ज, ई-मेल वगैरेद्वारा शिकू शकतो.

## ई-लर्निंग पद्धतीचे फायदे व मर्यादा

- विद्यार्थी केंद्रित शिक्षण पद्धती, विद्यार्थ्याला स्वत:च्या सोयीने वेळ, ठिकाण निवडण्याचे स्वातंत्र मिळते.
- शिक्षण पद्धती पुरेशी लवचिक आहे. एकाच वेळी स्वत:च्या आवडीचे वेगवेगळे विषय शिकण्याची विद्यार्थ्यांला मुभा असते.
- इंटरनेटचा वापर केल्यास Hyper linking द्वारे एकाच संगणकावरून, एकाच वेळी विविध तऱ्हेचे वाचन साहित्य उपलब्ध होऊ शकते.
- दृक्-श्राव्य माध्यमे प्रभावशाली असल्यामुळे अवघड विषय समजण्यास सोपा होतो. तसेच अवघड भागाचे परत परत पुनर्विलोकन करणे शक्य असते.
- प्रवासाचा वेळ, पैसा, पोस्टाच्या तसेच छापील पुस्तके विकत घेण्याऱ्या खर्चात बचत होऊ शकते.
- अतिशय उत्तम, प्रगत व खात्रीशीर संगणक व्यवस्था सतत उपलब्ध असणे अत्यंत जरुरीचे आहे. खंडित वीजपुरवठ्यामुळे यंत्रणा नादुरुस्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही.
- ई-लर्निंगसाठी उपयुक्त ठरेल अशा पद्धतीने अभ्यासक्रम लिहिणारे सक्षम मनुष्यबळ अत्यावश्यक आहे व तशा तऱ्हेचे प्रशिक्षण मिळण्याची सुविधा उपलब्ध होणे जरूरीचे आहे.
- ई-लर्निंग हे आर्थिकदृष्ट्या फायदेशीर असेलच असे खात्रीपूर्वक सांगता येणार नाही. ते खर्चीकही असू शकेल.

## ई-लर्निंगचे ग्रंथालयातील स्थान व भूमिका

एकविसाव्या शतकात प्रवेश केलेली ग्रंथालये जुनी 'कात' टाकून नव्या रूपात जगासमोर येत आहेत. शाळा, महाविद्यालयीन ग्रंथालये, विद्यापीठे, सरकारी व इतर लहान-सहान कार्यालये, अगदी दुकानांमध्येसुद्धा संगणकाचा वापर नित्याचा व अनिवार्य झाला आहे. त्याबरोबरच दूरसंचार नियंत्रित दळणवळण व इतर संपर्क साधनांद्वारे



अनेकविध सेवा सर्वसामान्यांच्या आटोक्यात आल्या आहेत आणि नेमका याचाच उपयोग ग्रंथालयांनी करून घ्यायचा आहे. यासाठी आवश्यक आहे ते योजनापूर्वक केलेले कालबद्ध नियोजन व योग्य अशी वातावरण निर्मिती.

खालीलपैकी काही उपक्रम ग्रंथालयांमध्ये राबविता येणे शक्य आहे.

- ई-लर्निंग साठी आवश्यक असणाऱ्या सुविधा उदा. पुरेशा संख्येने संगणक, त्यासाठी आवश्यक असणारे केबलिंग, नेटवर्कींग, वीज पुरवठ्याची सोय, ऑपरेटिंग सिस्टीम, सक्षम bandwidth वगैरे...
- वरील यंत्रणा सुयोग्य रितीने, कार्यक्षमतेने चालू ठेवण्यासाठी पुरेसे प्रशिक्षित मनुष्यबळ व अडचणी दूर करण्यासाठी यंत्रणेची उभारणी.
- इलेक्ट्रॉनिक माध्यमांमधील जी माहितीची तयार उत्पादने अथवा ज्यांना Born digital म्हणता येईल अशी उत्पादने कशी मिळवता येतील याचा मागोवा घेऊन ग्रंथपालांनी आपआपल्या ग्रंथालयांसाठी ती मिळविण्याचा प्रयत्न करावा.
  वरील उत्पादनांचे (Information products) योग्य तऱ्हेने तालिकीकरण, वर्गीकरण करून त्याला निर्देशनाची जोड द्यावी ज्यायोगे माहितीचा परतावा (Information retrieval) साध्य होईल.
- स्वत:च्या ग्रंथालयाचे home page करून त्याद्वारे इतर शैक्षणिक वेब साईटस् व वाचनसाहित्याशी जोडणी (Hyper linking) करण्याचा प्रयत्न केल्यास व त्याद्वारे अधिक विस्तृत साहित्य उपलब्ध करून दिल्यास वाचक वर्गाला निश्चितच त्याचा उपयोग होईल.
- वेगवेगळे विश्वकोष, शब्दकोष, संदर्भ ग्रंथ, पुस्तिका, औद्योगिक माहिती, सरकारी नियम, ॲक्टस, (उदा. माहितीचा अधिकार), कायदे, भौगोलिक माहिती, संशोधनपर अहवाल - असा असंख्य तऱ्हेच्या माहितीचा खजिना इंटरनेटच्या महाजालात उपलब्ध आहे. या साऱ्याची अथवा निवडक साहित्याची, आपल्या वाचकांच्या गरजेनुसार वर्गवारी करून त्या त्या Web sites ची एक संगतवार तयार यादी केल्यास, ग्रंथालय सेवेमध्ये ती एक उत्तम गुणात्मक वृद्धी (Value addition) होईल.
- ऑनलाईन शोध सेवेद्वारे निवडक माहितीचे संकलन करून त्याची एक तयार सूची करून वेळोवेळी ई-मेल द्वारे वाचकांपर्यंत नेण्याचे काम केल्यास ग्रंथालयाची प्रतिमा निश्चित उंचावण्यास मदत होईल.
- इंग्रजी, मराठी भाषेतील अभिजात साहित्य, उत्तमोत्तम ग्रंथसंपदेची माहिती आता संकेत स्थळांवर उपलब्ध आहे. तसेच कित्येक ग्रंथालयांच्या तालिका इंटरनेटवर

पाहता येतात. याविषयी सातत्याने, नवीन नवीन माहितीचा वेध घेऊन वाचकांनाही या प्रक्रियेत सामील करून घ्यावे. ज्यायोगे देवाण-घेवाण सुलभ होऊन सहकार्याची भावना वाढीस लागेल.

## उपसंहार

ई-लर्निंगचे महत्त्व व आधुनिक युगातील त्याचे स्थान अधोरेखित करताना ग्रंथालये महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. या शिक्षण पद्धतीला पूरक अशी एक पाठबळ देणारी यंत्रणा (Support system) या दृष्टिकोनातून पाहिल्यास ग्रंथालयांचे महत्त्व अबाधित आहे. शिक्षणाच्या सर्व घटकांना स्पर्श करणाऱ्या ग्रंथालयांचा आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेतदेखील तितकाच महत्त्वाचा वाटा आहे. परंतु यासाठी सर्व स्तरांवर एकत्रितपणे प्रयत्न होणे गरजेचे आहे. आवश्यक ती आर्थिक तरतूद, पायाभूत सुविधा, तांत्रिक बाबी, पुरेसे व प्रशिक्षित मनुष्यबळ, प्रोत्साहित करणारे वातावरण, प्रशासकीय यंत्रणेचे पाठबळ या बाबीसुद्धा तितक्याच महत्त्वाच्या आहेत. उद्याचा वाचकवर्ग मग ग्रंथालयांकडे ई-साहित्य, ई-लर्निंगचे धडे शोधण्यासाठी येईल यात शंका नाही.

## निवडक सूची


(१) Allan, Barbara : E-Learning and Teaching in Library and Information Services, London, Facet Publishing, 2002

(२) Ina, Fourie : How LIS Professionals can use Alerting Services, Oxford, Chandos, 2006

(३) Melling, Maxime (Ed) : Supporting E-Learning, A Guide for Library and Information Managers, London, Facet Publishing, 2005

(४) Nipp, D. : Innovative use of the Home Page for Library Instructions., Research Strategies, 16(2), 1998, p.93-102

(५) Electronic Courseware in Higher Education, www.firstmonday.com (accessed may 2007)


❑❑❑



# वाचकसंतुष्टीच्या पाऊलखुणा


श्री. आशुतोष गोपाळराव जोशी

व्यवस्थापक, ग्रंथागार, महिंद्रा अँड महिंद्रा कं. लि., सातपूर, नाशिक.

E-mail : joshi.ashutosh@mahindra.com



*वाचकसंतुष्टीच्या पाऊलखुणा अर्थात Customer satisfaction हा सध्याच्या जागतिकीकरणाच्या संदर्भात अत्यंत महत्त्वाचा भाग मानला जातो. ग्रंथालयांच्या बाबतीत ग्राहकांचे समाधान करतांना बदलत्या परिस्थितीशी जुळवून वाचकांना द्यावयाच्या सेवा परिणामकारकपणे देण्याकरिता सतत नाविन्याचा ध्यास घेणे आवश्यक ठरते. माहिती तंत्रज्ञानाधारित सेवांचा अंतर्भाव करून वाचनसाहित्य वाचकाभिमुख कसे करता येईल हे या लेखातून स्पष्ट होईल.*


## प्रास्ताविक

ग्रंथालयात वाचकांची अखंड वर्दळ असणे हीच त्या ग्रंथपालाच्या कार्याची पावती असते. आज समाजात ज्ञानसमृद्धता आणावयाची असेल तर असे वारंवार नव्हे अखंड घडणे आवश्यक आहे. पण वस्तुस्थिती नेमकी याच्या विपरीत आहे. आजकाल विद्यापीठ अनुदान आयोग आणि इतर शासकीय प्रवाहातून येणाऱ्या अनुदानातून वाचनालये श्रीमंत दिसू लागली आहेत. ती ग्रंथसमृद्ध आहेत. ज्ञानविचरणाच्या अत्याधुनिक सुविधांनी ती परिपूर्ण आहेत. परंतु देवालय जसे देवाविना अपूर्ण तसेच हे ज्ञानमंदिर वाचकाविना अपुरे असा प्रकार सर्वत्र घडतो आहे.

ही अवहेलना कशी टाळता येईल यासंदर्भात काही विचार येथे मांडले आहेत. आज ग्रंथालय व्यवस्थापन, संचालक आणि इतर ज्येष्ठ मंडळी यांच्यापुढे हा लाखमोलाचा प्रश्न उभा आहे की ग्रंथालय ग्रंथसमृद्ध आणि ज्ञानसमृद्ध याशिवाय अत्याधुनिक सुविधांनी परिपूर्ण असले तरी त्याच्याकडे साठोत्तरी काळात जी वाचकाची वर्दळ असायची ती दिवसेंदिवस कमीच होत चालली आहे. हा विरोधाभास कमी अथवा नाहीसा कसा करता येईल. या संदर्भातली कारणमीमांसा पुढीलप्रमाणे -

सगळ्यात महत्त्वाचे आणि पहिले कारण म्हणजे व्यावसायिक आणि प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता. कुठल्याही अनुदानित अथवा विना अनुदानित ग्रंथालयात जाऊन पाहा, तुम्हाला असे दिसेल की ग्रंथ, ग्रंथालयाची इमारत, तिथल्या सेवा सुविधांसाठी अमाप खर्च केला अथवा दाखविला जातो. पण या साऱ्याचे व्यवस्थापनही तितक्याच उच्च दर्जाचे असावे, याबाबत व्यवस्थापनाची भूमिकाही तितकीशी आग्रही नसते. ग्रंथालयशास्त्र शिक्षणाकडे आवड म्हणून येणाऱ्यांचे प्रमाण अत्यल्प आहे. सर्वसाधारणपणे अशा स्वरूपाचे मनुष्यबळ आज ग्रंथालयांतून आढळते. वाचकाने परत ग्रंथालयात पाऊलच टाकू नये असा (उच्च) अनुभव त्याला मिळावा अशाच तऱ्हेने ही मंडळी वागतात. वास्तविक ज्याच्या एका डुलकीमुळे एक पिढी झोपते आणि जागेपणामुळे अख्खी पिढी जागते असे म्हटले जाते ते समाजातले आदरणीय पद म्हणजे ग्रंथपाल. परंतु दुर्दैवाने आज ग्रंथपाल आणि मेंढपाळ यांची तुलना करावी असा वारंवार मोह होतो.

आज जगभर जे भारतीय शास्त्रज्ञ वैज्ञानिक, उद्योगपती आणि इतर मंडळी झळाळून उठली आहेत, त्या प्रत्येकाची ज्ञानपिपासा कुठल्या ग्रंथपालाने घडवली याचा उल्लेख ही मंडळी आदराने व अखंडपणे करीत असतात. अशा प्रकारचेच ग्रंथपाल घडवून, त्यांना उत्तम प्रशिक्षण देऊन ग्रंथालयाच्या व्यवस्थापनात त्यांचा सिंहाचा आणि मोलाचा वाटा असेल याची काळजी त्या-त्या व्यवस्थापनाने जर घेतली तर वाचकसंतुष्टी आपोआप वाढेल आणि पुन्हा ग्रंथालयातून वाचकांच्या वाढत्या पाऊल खुणा दिसू लागतील, मात्र यात शासनाचा, समाजधुराणींचा आग्रही सहभाग आवश्यक आहे.

याच अनुषंगाने अजून दोन उप-प्रश्न मांडता येतील ते असे- की वरील कारणांमुळे ग्रंथालय आणि तेथील उपलब्ध व्यवस्थांचे उत्तम आणि अखंड विपणन व्हायला हवे. ते त्या ग्रंथालयाच्या वाचकांपर्यंत पोहोचायला हवे. अन्यथा केवळ त्या ग्रंथालयात असलेल्या सेवा-सुविधांच्या अज्ञानामुळे वाचक तिकडे फिरकतच नाही. या गोष्टीचा प्रामुख्याने विचार व्हायला हवा. आणि केवळ ब्रिटिशकाळात केलेल्या ग्रंथालय नियमांना अनुसरून जी नियमबद्ध वाचनालय व्यवस्था पुरस्कारली जात आहे, ती टाळून नव्या वाचकांच्या जाणिवा लक्षात घेऊन उपयुक्त ग्रंथालय नियम व कायदे बनविले पाहिजेत. ठरावीक कालमर्यादेनंतर त्यांचा पुनर्विचार झाला पाहिजे. अन्यथा १९१२ साली असलेल्या घटनेनुसार वाचकाला २०१२ साली जर त्याच्या ज्ञानपिपासेपासून वंचित ठेवले ठरत तो वाचक परत इकडे फिरकेलच कशाला.

ही परिस्थिती बदलण्यासाठी, वाचकांना ज्ञानविचक्षण बनविण्यासाठी जो झटतो तो ग्रंथपाल. केवळ एखाद्या स्टोअरकीपरप्रमाणे वाचकाऐवजी ग्रंथ सांभाळण्याच्या सदैव



चिंतेत असेल त्याला ग्रंथपाल करू नये. अर्थात ही परिस्थिती बदलण्यासाठी काही तोडगे पुढीलप्रमाणे -

## पहिला तोडगा

वाचनालयाची रचना पुस्तकाच्या एखाद्या आकर्षक दुकानाप्रमाणेच वाचकांना परत परत आपल्या गरजेसाठी तिथे वारंवार जावे असे वाटेल. हल्ली आपण पाहतो त्या छोट्या मोठ्या शॉपिंग मॉलप्रमाणे जर तुमच्या ग्रंथालयाची रचना असेल तर वाचक तिथे रांगा लावल्याशिवाय राहणार नाहीत. त्याकरिता निरनिराळ्या वाचकवेधी युक्त्या सदैव करत राहाणे हे त्या ग्रंथपालाचे कर्तव्यच आहे. आकर्षक शेल्फ अथवा काचेच्या कपाटात वाचकवेधी पद्धतीनी मांडलेले ग्रंथ अथवा पसरून ठेवलेली नवीन मासिके याचा उपयोग निश्चितच वाढत्या वाचकसंतुष्टीकरिता होतो.

वाचकपरीक्षणे, अथवा समीक्षणाचे वाचकापर्यंत प्रसारण सूचना फलक अथवा इतर आकर्षक मार्गाने अखंड करीत राहाणे अशा युक्त्या-प्रयुक्त्या वापरल्या तर ग्रंथालयाकडे वाचक नक्कीच येत राहतील. ही वाणिज्यिक वृत्ती अंगात असणारे लोक या व्यवसायाकडे आकर्षित करण्याची जबाबदारी आता ग्रंथालय व्यवस्थापनावर पडलेली आहे.

निरनिराळ्या वर्तमानपत्रांतून येणारी वाचकपरीक्षणे वाचकापर्यंत पोहोचवून वाचकाला नित्य नव्या वाचनासाठी शिफारशी करणे उद्युक्त करणे, या गोष्टी अखंड करणे गरजेचे आहे तरच वाचकांचे पाय परत परत ग्रंथालयाकडे वळतील.

वाचनालयात उत्तम प्रकाश व्यवस्था आणि नैसर्गिक वातावरण राखण्याचा सदैव प्रयत्न होणे आवश्यक आहे. घरापासून कार्यालयापर्यंत सर्वत्र कृत्रिमत्तेचा ध्यास वाढत असताना, नैसर्गिक वातावरणाची ओढ वाचकाला आजही अनावर असते. गरज आहे ती ग्रंथालय व्यवस्थापनाने याचा सर्वांगीण विचार करून योग्य ते बदल असे करण्याची. असे केल्यास वाचकसंतुष्टीचा आलेख निश्चितच वाढेल शिवाय व्यवस्थापनाचे खर्च कमी होतील हा बोनस.

ग्रंथालयाची इमारत बांधतानाच हरितगृहाचा विचार झाल्यास हा लाभ वाचकांना आयुष्यभर मिळेल आणि याच वेगळ्या वातावरणाचा अनुभव घेण्यासाठी वाचक पुन्हा पुन्हा ग्रंथालयात प्रविष्ट होतील.

अंतर्गत आणि बाह्य रंगसंगती, अंतर्गत सजावट हीसुद्धा नैसर्गिकतेच्या जवळ जाणारी आणि हरित बांधकामाशी सुसंगत असल्यास वाचकसंतुष्टी आपोआप वाढते असा अनुभव आहे.

अंतर्गत सजावटीबरोबर ग्रंथरचना आणि देवघेवीनंतर त्यांची परत परत होणारी रचना यात जर सुसंगती असेल, तर वाचकसंतुष्टीत खूप वाढ होते असा अनुभव आहे. ग्रंथालय ही एक सामाजिक संस्था आहे. ती समाजाला काही देणे लागते या गोष्टीचे नुसते भान ठेवून चालणार नाही तर प्रत्यक्ष हा विचार कृतीत आणणे आवश्यक आहे. या दृष्टीने घडणाऱ्या स्थानिक घटना, जसे की साजरे होणारे विविध सण, दिन, उत्सव यांच्या अनुषंगाने ग्रंथालय व्यवस्थापनाने विचार करून निरनिराळे उपक्रम वर्षभर सुरू ठेवावयास हवेत.

केवळ सण, उत्सवच नव्हे तर आपण ज्या आस्थापनाशी निगडित आहोत तेथील संस्कृती, तिथला विचार, तिथला वाचक त्यांच्या आवडीनिवडी, आणि प्रामुख्याने त्यांच्या गरजा यांचा जर विचार केला तर वाचकसंतुष्टीचे उद्दिष्ट फार दूर असणार नाही.

अर्थात प्रत्येक आस्थापनानुसार, त्याच्या पालक संघटनेच्या संस्कृतीचा विचार करून जर ग्रंथालयाने आपल्यालाही त्या विचारांचा, संस्कृतीचा भाग बनवले तर वाचकसंतुष्टी वाढलेली आपोआप दिसेल. कारण ग्रंथालय ही संस्कृतिप्रसाराची महत्त्वाची केंद्रे आहेत. याचे भान आपणास विसरून चालणार नाही. ग्रंथालय व माहितीशास्त्रातील नवनव्या प्रवाहांचा शोध व बोध घेऊन तो अचूकपणे वाचकांपर्यंत पोहोचविणे ही एक महत्त्वाची गोष्ट वाचकसंतुष्टीच्या अंगाने करता येईल. या गोष्टीचा उपयोग जास्तीत जास्त वाचक संवादी करण्यासाठी करता येईल. बदलत्या समाज व्यवस्थेबरोबर ज्ञान भांडारांचे रूपही अखंड बदलते राहणे हीदेखील वाचकसंतुष्टीसाठी आवश्यक गोष्ट आहे.

केवळ भौतिक स्वरूपातील बदलच नव्हे तर वैचारिक अधिष्ठानातील अदृश्य बदलही वाचकांना आंतरिक सुख जाणवून देतो. त्यांचा बाह्य किंवा दृश्य परिणाम म्हणून ही वाचकसंतुष्टी वाढल्याचे निदर्शनास येते. ग्रंथालय हा ज्ञानाचा जिवंत झरा असून ते केवळ ज्ञानाचे भांडार नाही याची जाणीव ग्रंथालय व्यवस्थापनाने ठेवली तरीही वाचकसंतुष्टीचा आलेख वाढलेला दिसेल.

आपला अनेक वर्षांचा अनुभव आहे की, वाचकाला वाचनालयातील ग्रंथसंभाराची सर्वांगीण माहिती असत नाही. जो तो आपल्या कामापुरते वाचन करून परत जातो अशा वाचकांच्या ज्ञानसमृद्धतेची खोली वाढविण्याचा एक उत्तम उपाय म्हणजे विषयानुरूप एखाद्या घटनेला, दिवसाला अथवा विषयावर त्या विषयवार ग्रंथालयात असलेली सर्वांगीण माहिती एखाद्या प्रदर्शनाद्वारे सर्व वाचकासमोर प्रसारित करणे.

हा प्रकार अक्षरशः दर महिन्यालासुद्धा आयोजित केल्यास वाचकसंतुष्टीच्या वाढत्या खुणा आपल्या नजरेत भरतील. याचा अधिक फायदा म्हणजे वाचक प्रतिक्रिया अधिक मोकळेपणाने उमटतील.



या काळात आमच्या समोर आलेली महत्त्वाची प्रतिक्रिया म्हणजे वाचकांना ज्ञान समृद्ध करण्याची आपली इच्छा असली आणि वाचकांचीही असली तरी सध्याच्या स्पर्धात्मक जगात यासाठी लागणारा वेळ वाचकाजवळ अतिशय कमी असतो. मग यासाठी म्हणून ग्रंथालय संगणकीकरणाच्या एक प्रत्यक्ष परिणाम म्हणून ग्रंथालयाची वेबसाईट तयार करून ती वाचकांच्या संगणकावर पोहोचेल याची व्यवस्था करणे. जेणे करून वेळेचे बंधन टाळून वाचकज्ञान समृद्ध होऊ शकेल. प्रसंगी त्याला ग्रंथालयात येण्याची गरजच भासणार नाही. परंतु तो आपल्या वाचकसेवेचा उत्तम लाभ घेईल.

एकदा संगणकीकरण झाले की या अप्रत्यक्ष सेवेच्या असंख्य सुविधा आपण वाचकाला देऊ शकतो. जसे की सारांश सेवा, ई-प्रकाशन सेवा. ग्रंथालयाचे नियम सेवासुविधा इत्यादीची माहितीही इथे प्रकाशित करता येते आणि ग्रंथालयाच्या वेळेचे बंधन न पाळता वाचक त्याच्या सोयीनुसार या सेवांचा अचूक लाभ घेऊ शकतो. इथे ग्रंथपाल एखादे ई-दैनिक सुरू करून त्याच्या वाचकांना उपयुक्त माहिती सदासर्वकाळ पोचवू शकतो.

निवडक ताज्या घटना, घडामोडी आणि त्याचा वाचक वर्गावर होणारा दृश्य अथवा अदृश्य परिणाम यांचा विचार करून तद्नुरूप वाचक सेवेत बदल केले असता ही वाचक अभिवृद्धी होते असा अनुभव आहे. थोडक्यात काय तर ग्रंथालयाने आपली 'जरा हटके' ओळख टाळून ज्या समाजात आपण नाहीत त्याचा आभास जरी वाचनालय व्यवस्थेत आणला तरी वाचकसंतुष्टीत फरक पडलेला आपल्याला जाणवेल. किंबहुना ''गुंतुनी गुंत्यात साऱ्या पाय माझा मोकळा'', ''रंगूनी रंगात साऱ्या रंग माझा वेगळा'' अशी परकाया प्रवेशाची घेतलेली केवळ भूमिकाच वाचकसंतुष्टीचे पान तुमच्या पदरात टाकून जाईल.

वाचकांच्या गरजा आणि आवडी निवडी लक्षात घेऊन केलेली ग्रंथालय संरचना जर वाचकसंतुष्टीत वाढ करत असेल तर त्याकरिता अत्याधुनिक व्यवस्थापनाच्या सर्वेक्षण तंत्राचा वापर करून वाचनालयाची वाचक अभिवृद्धी घडवता येईल. ग्रंथालयात केलेली मंजूळ स्वरांची पखरण वाचकसंतुष्टीला एक नवे परिणाम देईल.

वाचकांच्या दर्जानुसार त्याच्या आवडीनिवडींची सर्वसमावेशकता ही एक महत्त्वाची गरज प्रस्थापित ग्रंथालय व्यवस्थापनाने सर्वोपरि मानणे आवश्यक आहे. अन्यथा या नवनवोन्मेषशाली व्यवसायाचा आनंद वाचकांना अथवा ग्रंथालय व्यवस्थापनाला मिळणार नाही.

निधी उपलब्ध नाही, व्यवस्थापनाचा पाठिंबा नाही, वाचकच येत नाहीत मग हा अट्टाहास कुणासाठी करायचा. केवळ पदवी किंवा पदव्युत्तर पदवी मिळवूनही वेतन

श्रेणी नाही अशा एक ना अनेक कारणांची सहस्त्र नामावली देऊन आणि ग्रंथपालन वर्गाचा कोर्स रंगीबेरंगी पेन्सिलीनी छापील प्रकल्प पूर्ण केल्याचे बिल्ले छातीवर मिरवण्यापेक्षा माझे ग्रंथालय अधिक वाचकवेधी कसे होइल याची चिंता केल्यास आपला देह आपली पुढची पिढी घडविण्याचे अलौकिक कार्य केल्याचा हा आनंद वेगळाच असेल.

सर्वकाही गुगल (google) वर मिळते मग आमच्याकडे कोण येणार ? आता ग्रंथालय संगणकीय झाले आहे तर वाचकाला ग्रंथालयात येण्याची गरजच काय असे म्हणून केवळ नोकरी आहे म्हणून आम्ही येतो, वाचक येत नाहीत ही त्याची चूक आहे किंवा सुशिक्षित वाचकांना सर्वकाही त्यांच्या संगणकावर मिळत असताना इकडे कोण येणार ? आता ग्रंथालय ही संस्थाच कालबाह्य झाली आहे त्याला आम्ही काय करणार, असे म्हणणाऱ्या अभागी लोकांना बदलत्या ग्रंथालय व्यवस्थेचे मर्मच कळले नाही असे म्हणावे लागेल.

पालक संस्थेचे आंतरिक सौंदर्य ग्रंथालयात दिसते, खुलते, याची जाणीव जर ग्रंथपालनाने व्यवस्थापनाला करून दिली तर जगाची ज्ञानसत्ता होण्याचा दिवस फार दूर राहणार नाही.

त्याकरिता नित्य ज्ञानविचरणासाठी विद्वानांची व्याख्याने व व्याख्यानमाला आयोजित करणे ही एक महत्त्वाची घडामोड आता ग्रंथालय व्यवस्थापनात अग्रभागी येत चालली आहे. या साऱ्या बदलत्या कारणांचा अभ्यास करून तदनुषंगिक बदल घडवल्यास वाचकसंतुष्टी वाढलेली दिसण्यास वेळ लागणार नाही.

कारण आता ग्रंथालयांच्या दृश्य भौतिक अवस्थेची जागा ज्ञान भांडार व्यवस्थापनाच्या अदृश्य अवस्थेने घेतली आहे.

हे घडविणाऱ्या ग्रंथपालास वेगळी देशसेवा करून भारताला ज्ञान महासत्ता घडविण्याचे स्वप्न साकार करण्यात आपला खारीचा वाटा उचलता येईल.

❑❑❑



# केवळ महत्त्व माहितीलाच (भाग ६) : बदलते समाजजीवन

डॉ. नागनाथ रा. रामदासी
ग्रंथपाल, सी-डॅक, पुणे

*'केवळ महत्त्व माहितीलाच' या मालिकेतील पाच भाग यापूर्वीच्या अंकांमध्ये प्रसिद्ध झालेले आहेत. संगणक, टॅबलेट पीसी, इंटरनेट, भ्रमणध्वनी यांसारख्या माहिती तंत्रज्ञानाधारित साहित्यामधून मोठ्या प्रमाणावर माहितीची उपलब्धी त्याचबरोबर देवाण-घेवाण होत असते. ही माहिती उपयुक्त असली तरी अतिरिक्त वापरामुळे काही अपरिहार्य परिणामही जाणवतात. एकूणच माहितीची उपयुक्तता, परिणाम, गुंतागुंत, तणाव निर्माण करणारी परिस्थिती या सर्व बाबींचा संप्रेषणाच्या दृष्टिकोनातून संदर्भात्मक विश्लेषण करणारा हा लेख.*

'मनुष्याची समाजप्रियता व समूहासोबत परस्परांसोबत राहण्याची आंतरिक सवय' हे नव्याने सांगण्याची आवश्यकता नाही. त्यातूनच मनुष्याचा जास्तीत जास्त वेळ सामाजिक देवाण-घेवाण, बांधीलकी तसेच विचारविनिमय यावर व्यतीत होतो. अर्थात हे सर्व घरी, कार्यालयात तसेच इतर सर्व स्तरांवर चालू असते. माहितीधिष्ठित अशा आजच्या समाजामध्ये माहितीची अतिरिक्त व मोठ्या प्रमाणावरील उपलब्धता व त्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा अतिरिक्त वापर वाढला आहे. हा वापर माहिती तंत्राधारित साधने, आयुधे, यंत्र (संगणकापासून ते टॅंबलेट पीसी तसेच भ्रमणध्वनी) यांद्वारे होतो. असा अतिरिक्त वापर व्यसन म्हटले तरीही चालेल इतका वाढला आहे व त्याचे अटळ आणि अपरिहार्य परिणाम समाजघटकांची विचारक्षमता व वर्तणूक यांवर दिसून येत आहेत. समाजघटकांचा परस्परसंवाद जोडणीद्वारेची देवाणघेवाण, त्याचा स्वत:कडे, परस्परांकडे तसेच जगाकडे बघण्याचा दृष्टिकोन या सर्व बाबींवर कसा परिणाम घडून येतो आहे या अशा क्लिष्ट किंवा गुंतागुंतीच्या प्रश्नांचा जगभरातील संशोधक पद्धतशीर अभ्यास करीत

आहेत व त्यातील बारकावे समजून घेत आहेत. याबाबत CACM या प्रख्यात संस्थेच्या Communication of ACM नियतकालिकामध्ये ऊहापोह करणारा लेख प्रसिद्ध झाला. (CACM - Living in a digital world october 2011)

त्यातील नोंदी व गोषवारा प्रस्तुत लेखात विशद केला आहे.

(१) वेस्टलाईन ओरलॅन्डो (अमेरिका) चे पत्रकार श्रीयुत सॅम्युगल ग्रीनभाई यांच्या मते, जगभरातून अदमासे २ बिलियन लोक इंटरनेटचा वापर करतात. साधारण ५ बिलियन लोक भ्रमणध्वनी वापरतात. गेल्या महिन्यात भारतामधील अशा वापराची आकडेवारी महाराष्ट्र टाईम्समध्ये देण्यात आली होती. उत्तरोत्तर अशा साधनांच्या वापरात वाढ होत आहे. दैनंदिन वापराच्या माहिती तंत्रज्ञानामध्ये नव-नव्या आयुधांची (साधनांची) भर पडते आहे. त्यातूनच प्रगत, वेगवान, सक्षम असे संगणक तसेच माहिती संप्रेषण शक्य होते आहे व वापरकर्तेही वाढत आहेत. एकट्या अमेरिकेमध्ये १३ ते १७ या वयोगटातील मुले-मुली दर दिवसाकाठी साधारण ११० लिखित संदेश पाठवितात.

(२) "The Man who lived to His Laptop : What Machines Teach Us About Human Relationship" या ग्रंथात Clefford NASS लिहितात, ''गरज म्हणून किंवा अनिवार्य आवश्यकता म्हणून माहिती तंत्रज्ञानांतर्गत विविध साधने प्रत्येकाच्या जीवनाचा अविभाज्य घटक बनत आहेत व त्याची वापराची निकड तसेच प्राथमिकताही वाढते आहे.''

(३) साउथर्न कॅलिफोर्निया विद्यापीठांतर्गत (Centre for the Digital Future) या केंद्राचे संचालक श्री मायकेल शुमन म्हणतात, ''माहिती-तंत्रज्ञान लोकांना एकत्र आणते. ही प्रक्रिया यापूर्वी कधीही झाली नाही इतक्या प्रभावीपणे घडून येते आहे. त्यातूनच दैनंदिन समाज जीवनामध्ये नव-नवे प्रश्न व गुंतागुंती निर्माण होत आहेत.'' माहिती-तंत्रज्ञानाच्या अतिरिक्त वापरामुळे मुलांच्या विश्व विचारक्षमता तसेच चिंतनशीलता या प्रक्रियांवरही परिणाम झाला आहे. क्रमागत तार्किक अथवा संयुक्तिक विचार करण्यासाठीचा पुरेसा प्रयत्न केला जात नाही. त्यासाठी योग्य वेळही दिला जात नाही. e-mail, त्वरित अक्षरसंवाद, इत्यादी साधनांमुळे वर्गांमधील व्याख्याने किंवा प्रशिक्षण यांच्याकडे त्यांचे दुर्लक्ष होते व सुविधांचा वापर तेच तेच प्रश्न विचारण्यासाठी करण्यात येतो. जेव्हा अशी साधने बंद असतात, तेव्हा एखाद्या विषयावरील किंवा कल्पनेवर सखोल विचार करण्याची क्षमता कमी झाल्यासारखी वाटते. सखोल अर्थपूर्ण विचार चिंतनशीलतेचे एक नवेच आव्हान विद्यार्थ्यांपुढे नकळत उभे राहते आहे.''



(४) Ericson या Telecommunication क्षेत्रातील दिग्गज कंपनीने २०११ मधील सर्वेक्षणांतीच्या वृत्तपत्रामध्ये i-phone व Android एकूण वापरकर्त्यांच्या ३५% वापरकर्ते बिछान्यामधून सकाळी बाहेर पडण्यापूर्वीच त्यांचे e-mail व facebook खात्यांना भेट देतात. ४०% वापरकर्ते रात्रौ झोपण्यापूर्वी त्यांचे भ्रमणध्वनी वापरून हेच काम करतात. सर्वसामान्य अमेरिकन नागरिक दिवसाकाठी २.५ - ३.५ तास माहिती तंत्रज्ञानाधारित सुविधेशी जोडला गेलेला असतो.

(५) नेल्सन महाशयांच्या मते सोशल नेटवर्किंग साधनांपैकी Online Games व e-mails हे वापरकर्त्यांच्या सर्वांत आवडीचे विषय आहेत.

(६) शेरी टकल या मॅसॅच्युसेटस इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी पैकी संस्थेमधील समाजशास्त्र विषयाच्या प्राध्यापिका आहेत. त्यांनी "Alone Together : Why we Expect More from Technology & Less from each Other" हा ग्रंथ लिहिला आहे.

''मानवाचा तंत्रज्ञानाच्या वापराचा हव्यास किंवा मोह यातूनच माहिती-तंत्रज्ञानाचा विळखा समाजास उत्तरोत्तर घट्टपणे सामावून घेत आहे. एकाकी व भयमुक्त मानसिकतेतून सहसंवेदनेसाठी सतत जोडलेले असणे व तसा आभास एकाकीपणाची भावना कमी करण्यासाठी आधार वाटतो व ती एक गरज बनते. अशी संगणकाद्वारे जोडलेली मैत्री केवळ जोडलेली असते. प्रत्यक्ष मैत्रीमधून येणारी मागणी किंवा अनिवार्यता ह्यात असत नाही. किंबहुना अशा दूरस्थ जोडणेपणातून परस्परांकडून सर्वच काही मागता येणे - घेता येणे शक्यही नसते व अशी सुरक्षितता व असे साधारण प्रमाण परस्परांना (उभयतांना) स्वीकाराहार्य असते.'' त्यापुढे शेरी टकल असेही म्हणतात, ''माहिती तंत्रज्ञानाचा सातत्यपूर्ण वापर व त्यातूनच एकंदर जोडले जाणे हे प्रत्यक्ष मैत्रीपेक्षा काहीसे वेगळे असते. बऱ्याचदा त्यातून व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करण्याची एकप्रकारची घाईच दिसून येते व क्वचित परस्परांच्या मनांचे अंतराळ जपणे जाणून घेणे होत असते. त्याऐवजी व्यवसायाशिवाय शिळोप्याच्या गप्पा, नवी माहिती, तसेच शब्दांद्वारेचा प्रणय बऱ्याचदा आढळतो. (प्रेमाबंधनातील मित्रांचा). 'व्याप्ती' व 'वेग' या दोन शब्दांना तंत्रज्ञानाच्या साहचर्यातून तक्रार न करता स्वीकारलेले आढळते. या सर्व बाबी रोजच्या सरावाच्या होतात. त्यांत साधेपणा, सोपेपणा असल्याने निश्चिंत मनाने या पार पाडल्या जातात. तक्रार राहते ही व्यस्तपणाची. विचार करण्यासाठीची व्यस्तता अथवा निर्माण प्रक्रियेसाठीची व्यस्तता ही सतत प्रत्ययास येते व आपण एकाकीच असतो.''

वरील सर्व बाबींना माहिती-तंत्रज्ञान प्रोत्साहन देत असते. त्यातून प्रत्यक्ष व्यक्तिगत संवादाऐवजी जोडणीद्वारे किंवा स्व-आवाजातील अथवा अक्षरसंवादाद्वारे निरोप ठेवण्याची

सुविधा वापरून आपण निश्चिंत राहतो. काहींच्या मते, दूरध्वनीपेक्षा अशा निरोप पद्धती वेळेच्या नियोजनासाठी व निश्चितीसाठी योग्य आहे. तात्पर्य, ''आपण अनेकांच्या संपर्कात, सहवासात काही वेळ घालण्याची एक सुखद भावना आपल्या मनात रुंजी घालत असते. आपणास वाटते नव्हे खात्री असते की, e-mail अथवा त्वरित अक्षरसंवाद सुविधेद्वारे वेळेचा प्रभावी वापर तसेच नियोजन करणे शक्य असते. तथापि असा निरोप किंवा संवाद प्रभावी ठरेलच असे नाही. त्याचे महत्त्वाचे एक कारण म्हणजे अतिरिक्त प्रमाणातील आलेले असे पुष्कळ निरोप किंवा मेसेजेस.

एक नवा सामाजिक शिष्टाचाराचा (रितीरिवाजांचा) प्रश्न ऐरणीवर येतो आहे. जेवणखाण इत्यादी अत्यावश्यक नैसर्गिक गोष्टी चालू असताना अशा संवादांची देवाणघेवाण करणे किंवा पाहणे / ऐकणे, महत्त्वाच्या बैठकांमध्ये, वर्गांमध्ये किंवा विविध व्यासपीठांवरील महत्त्वांच्या चर्चादरम्यान अनौचित्य वापरामुळे अशा तंत्रज्ञान वापरातून विषयाच्या चर्चेचे गांभीर्य कमी होते. इतरांच्या अवधानावर व्यत्यय येतो, व्यवधान निर्माण होते. समोरच्या व्यक्तीशी महत्त्वपूर्ण चर्चा चालू असताना तिचे अवधान नसणे, दचकून 'काय' असे विचारणे या नित्य अनुभवाच्या गोष्टी झाल्या आहेत. एकाच वेळी अनेक बाबींवर लक्ष असेल तर समोरच्या चालू प्रक्रियेवर पूर्णत: लक्ष केंद्रीत होत नाही. अभ्यासानुसार अष्टावधान असूच शकत नाही. प्रत्यक्षात आपण एकातून दुसऱ्या प्रक्रियेत (कामात) जलद गतीने सरावाहून प्रवेश करतो. खूप अवधानाने जपाव्या लागणाऱ्या व्यक्तीची दीर्घ स्मरण क्षमता कमी होते व विसराळूपणा वाढतो. काहींना ही अशी जीवनसरणी ''डिजिटल'' लाइफस्टाईल वाटते. या विश्वात वेळ व पैशाची सतत सलगी जोपासली जाते. सातत्याने नवे सुधारित तंत्रज्ञान अथवा उपकरण घेणे आवश्यक नव्हे तर अनिर्वाय ठरते. आयटी क्षेत्रातील कंपन्या किंवा संबंधित आस्थापना कर्मचाऱ्यांना साधनांच्या वापरासाठी अहोरात्र वेठीस धरतात व अष्टौप्रहर सेवेची अपेक्षा ठेवतात. अशा कर्मचाऱ्यांच्या काम करण्यावर एक तांत्रिक प्रहरी (तंत्रसुविधा) सतत लक्ष ठेवतात. ज्यामुळे कर्मचाऱ्याची कार्यक्षमता तपासली जाते व ही भीती सतत डोक्यावर असू शकते. यातूनच घर व कार्यालय यांच्यातील सीमारेषा नष्ट होत आहे. हे असे तणावाला आमंत्रण देणारे राहणीमान व कामकाज माणसाच्या स्वतंत्र वैयक्तिकतेवर अधिक्षेप करून खरोखरीच गुणवत्तापूर्ण जगण्याकडे नेते आहे काय असे वाटल्यास नवल वाटू नये. अभ्यासाअंती असे आढळले आहे की, तंत्रज्ञानाचा अतिवापर उत्तरोत्तर एकाकीपणा तसेच निराशेकडे घेऊन जातो. अमेरिका, युरोप या देशांनंतर भारतामधील चित्रही यास अपवाद ठरू नये. २०१० मध्ये साऊथ कॅरोलिना विद्यापीठातील समाजशास्त्राच्या प्राध्यापिका "Iring Stepanikova" यांनी 'माहिती-तंत्रज्ञानाधारित घरोघरीचा इंटरनेट वापर - एकाकीपणा व समाधान' यावर सर्वेक्षण केले. संशोधनाअंती त्यांना असे आढळले आहे की,

(१) घरगुती इंटरनेटचा वापर तसेच चॅटिंग यातून जास्त एकाकीपण येते व समाधान भंग पावते.

(२) e-mail च्या वापराचा वरील तुलनेत संतुलित प्रभाव जाणवतो.

(३) घरी - एकाकीपणामधून बाहेर येण्यासाठी कुटुंब घटकांशी, जगभरच्या मित्र-मैत्रिणींशी विविध विषयांवर संवाद साधण्याचे प्रभावी साधन हाताशी उपलब्ध असणे ही एक अत्यंत चांगली गोष्ट आहे. तथापि याचा अति प्रमाणावरील वापर / व्यसनामुळे प्रत्यक्ष समोरासमोरील कुटुंबाशी, समाजाशी किंवा त्यांच्या घटकांशी संवाद साधने, बोलणे, प्रत्यक्ष चळवळींशी जोडून घेणे, सांस्कृतिक व इतर उत्सव समारंभात सहभागी होणे, प्रत्यक्ष खेळण्यात आनंद घेणे, आरोग्यदायी दिनचर्येत सहभागी होणे प्रकर्षाने कमी होते आहे.

एकंदरच, माहिती-तंत्रज्ञानाचा मानवी सेवेसाठी प्रभावी वापर करून घ्यायचा की त्याचे गुलाम व्हायचे याचा विचार करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. माहितीधिष्ठीत समाजासाठी अति माहितीची उपलब्धता व साधने वापराची अतिक्षमता यांचा धोका समोर उभा आहे. मानवाच्या सुंदर एकाकी आयुष्याच्या वस्त्रहीन वीण उकलून आरोग्य, खाणपाण, शिष्टाचार, इत्यादी बाबींवर विपरीत परिणाम होऊ न देता, माहितीचा पद्धतशीर असा संयमित वापर करण्यासाठी गंभीरपणे विचार करणे आवश्यक ठरते आहे.

## वाचकांसाठी अधिक वाचन संदर्भ


(१) Amichai-Hambergd Y & Hayat, 7 The Impact of Internet On social lives of Users. A Reprentative sample, (Computers in Human Behaviour 27, 1, Jan 2011)

(२) Turkle S; Authenticiy in the Age of Digital Communtiction on (Interaction Studies 8,3,2007)

(३) Nie, N. H. & Hillyagus D.S. Where does Internet Time Come Frome ? (IT & Society, 1, 2, Fall 2002)

(४) Amichai - Hamberger Y & Vinitzky G. Social Network Use and Personality (Computers in Human Behaviour 26, 6, Nov.2010)


❑❑❑

# ग्रंथालय संगणकीकरण उपक्रम

श्री. नारायण बारसे
ग्रंथपाल व विभागप्रमुख, ग्रंथालयशास्त्र विभाग,
जोशी बेडेकर महाविद्यालय, ठाणे

*ठाणे येथील विद्याप्रसारक मंडळ यांच्या माध्यमातून सार्वजनिक त्याचबरोबर शैक्षणिक संस्थांच्या ग्रंथालयांचे संगणकीकरण करण्यासाठी कोहा (KOHA) या मोफत प्रणालीचा वापर करण्यासंदर्भात मार्गदर्शन आणि मदत करण्यात येत असून या प्रकल्पामध्ये सहभागी होणाऱ्या ग्रंथालयांचा डेटाबेस (तालिका) http://www.granthalaya.org या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला आहे. विद्याप्रसारक मंडळाचा हा स्तुत्य उपक्रम असून ग्रंथालय संगणकीकरण, वाचनसाहित्याची उपलब्धी रिसोर्स शेअरिंगच्या संदर्भात या प्रकल्पाची निश्चित अशी उपयुक्तता असणार आहे. इच्छाशक्तीच्या पाठबळावर माहिती-तंत्रज्ञानाची कास धरून ग्रंथालय संगणकीकरणाची चळवळ पुढे जाण्यासाठी उपयुक्त मार्ग आहे.*

## प्रास्ताविक

भारतामध्ये ग्रंथालयांची परंपरा प्राचीन असली आणि ग्रंथालय चळवळ सर्वदूर पोहचली असली तरी ग्रंथालयांच्या पारंपरिक स्वरूपात अमूलाग्र बदल झाला असल्याचे आपणास जाणवते. यासाठी माध्यमांतील फरक, माहिती संप्रेषण तंत्रज्ञानामधील नवनवीन शोध, पारंपरिक वाचनसाहित्याचे बदलले स्वरूप, इंटरनेटच्या माध्यमातून उपलब्ध झालेले माहितीचे महाजाळे (मायाजाल) गणपुस्तके (इ-बुक), इत्यादी नियतकालिके डेटाबेसचा (माहितीसंग्रहाचा) वापर इत्यादी घटकांचा प्रभाव ग्रंथालयांवर पडलेला आपणास दिसून येतो.



या सर्व घडामोडींमुळे ग्रंथालयाची उत्क्रांती पारंपरीक ग्रंथालयांपासून इलेक्ट्रॉनिक ग्रंथालये, डिजिटल ग्रंथालये (अंकीय ग्रंथालये) व्हर्च्युअल ग्रंथालये (आभाषी ग्रंथालये) अशी झालेली आपणास दिसून येते. माहिती संप्रेषण तंत्रज्ञानामध्ये होणाऱ्या बदलांचा प्रभाव ग्रंथालयांवर पडल्याचे दिसून येते. या बदलामुळेच वाचकांच्या ग्रंथालयाकडून असलेल्या अपेक्षामध्ये प्रचंड बदल झाला तर योग्य वाचकाला योग्य माहिती विनाविलंब देण्याची जबाबदारी ग्रंथालयावर आली. वाचकांना ग्रंथालय सेवा ते ग्रंथालयात न येतादेखील इंटरनेटच्या माध्यमातून मिळाव्यात असे वाटू लागले. या सर्व गोष्टींचा विचार करून ग्रंथालयाच्या आधुनिकीकरणामध्ये संगणकीय (ऑनलाईन) सेवांचा सध्या प्रामुख्याने विचार होऊ लागला आहे.

परंतु हे सर्व होत असतानाच ग्रंथालय संगणकीकरणाचा निर्णय घेणे हे सर्वच ग्रंथालयांना आवश्यक झाले आहे. सार्वजनिक ग्रंथालयेसुद्धा याला अपवाद असू शकत नाहीत. ग्रंथालय संगणकीकरणाचा विचार करताना प्रामुख्याने आवश्यक संगणक (हार्डवेअर) व ग्रंथालय संगणक आज्ञावली (सॉफ्टवेअर) यांचा प्रामुख्याने विचार करावा लागतो.

संगणक प्रणालीमध्ये सध्या मुक्तप्रणाली विश्वसंकेत (युनिकोड) या बाबींचा विचार प्रामुख्याने केला जातो. मुक्त संगणकप्रणालीचा वापर केला नाही तर अतिशय खर्चीक अशी संगणक प्रणाली ग्रंथालयांना विकत घ्यावी लागते. व त्याचबरोबर मायक्रोसॉफ्ट विंडोजसारख्या ऑपरेटिंग सिस्टमचेही रॉयल्टी ग्रंथालयांना सोसावी लागते. संपूर्ण संगणकीकरणाचा अंतिम टप्पा म्हणजे संपूर्ण ग्रंथालयाचा माहिती संग्रह परिपूर्ण स्वरूपात संगणक तालिकेच्या माध्यमातून वाचकांना उपलब्ध करून देणे होय. त्याचबरोबर ग्रंथालयाची संपूर्ण माहिती संकेत स्थळाच्या माध्यमातून जागतिक पातळीवर उपलब्ध करून दिली जाऊ शकते.

संगणकीकरणासाठी खर्च करण्यासाठीची आर्थिक तरतूद, कुशल मनुष्यबळ हे शाळा, महाविद्यालये, विद्यापीठ व इतर सरकारी अस्थापनामधील ग्रंथालयांकडे आहे. परंतु यासाठी होणारा अवाढव्य खर्च सार्वजनिक ग्रंथालयांना परवडणारा नाही. आणि म्हणूनच सार्वजनिक ग्रंथालयाच्या संपूर्ण संगणकीकरणाकडे होणाऱ्या वाटचालीत मोठा अडथळा निर्माण झाल्याचे आपणास दिसून येते. परंतु या सर्व अडचणींवर मात करता येऊ शकते. फक्त त्यासाठी इच्छाशक्तीची आणि थोडीशी मेहनत घेण्याची आवश्यकता आहे.

यातील आवश्यक आज्ञावलीविषयी योग्य ज्ञान मिळवून किंवा प्रशिक्षण घेऊन डाऊनलोड करता येते. परंतु याकरिता ग्रंथपालास किंवा त्याच्या सहकाऱ्याला संगणकाचे

ज्ञान असणे गरजेचे आहे आणि जर नसेल तर ते मिळविण्यासाठी तयारी असणे गरजेचे आहे. त्यानुसार विविध आज्ञावलीची माहिती मिळविता येते.

अशा प्रकारे ग्रंथालयात विविध आज्ञावलींचा वापर करता येऊ शकतो व त्याद्वारे RFID - Radio Frequency Identification चा वापर करून ग्रंथालयातील पुस्तकाची चोरी थांबवू शकतो, बारकोडचा वापर करून तात्काळ पुस्तकांची देवाण-घेवाण करू शकतो. त्याचप्रमाणे OPAC - Online Public Access Catalouge द्वारे ग्रंथालयातील उपलब्ध वाचन साहित्य कोणत्या कपाटात आहे ह्याची माहिती उपलब्ध करून देऊ शकतो. अशा प्रकारच्या विविध सेवा ग्रंथालयाद्वारे वाचकांना देऊन ग्रंथालय व्यवसायास आधुनिक रूप प्राप्त करून देता येईल. याकरिता सर्वांच्या योगदानाची गरज आहे.

### विद्याप्रसारक मंडळाचा उपक्रम

सार्वजनिक ग्रंथालयांना अशा प्रकारच्या मुक्त प्रणालीचा वापर करणे आर्थिक पाठबळ, साधनसामग्री व कुशल मनुष्यबळ यांच्या अभावामुळे शक्य होत नाही किंबहुना अवघड वाटते. दुर्दम्य इच्छाशक्ती असूनही बऱ्याच सार्वजनिक ग्रंथालयांना ग्रंथालयाचे संपूर्ण संगणकीकरण करणे जमलेले नाही आणि म्हणूनच ठाणे येथील विद्याप्रसारक मंडळ या शैक्षणिक संस्थेने सार्वजनिक ग्रंथालयांना संपूर्ण संगणकीकरणासाठी मदत करण्याच्या हेतूने www.granthalaya.org. या उपक्रमाची सुरुवात केली आहे. डॉ. विजय बेडेकर यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या या प्रकल्पांतर्गत महाराष्ट्रातील सर्व सार्वजनिक ग्रंथालये त्याचबरोबर शैक्षणिक ग्रंथालयांना संगणकीकरणाच्या संदर्भात मदत व मार्गदर्शन करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत महाराष्ट्रातील सर्व सहभागी सार्वजनिक व शैक्षणिक ग्रंथालयांची संगणकीकृत संघतालिका (Union Catalouge) - www. grantnalaya.org या संकेत स्थळांवर उपलब्ध करून देण्यात येत आहे.

२६ जानेवारी २००९ रोजी सुरू झालेल्या या उपक्रमामध्ये आतापर्यंत १८ ग्रंथालयांनी सहभाग घेतला असून या सर्व ग्रंथालयांमध्ये असलेल्या ७ लाख ८१ हजार ग्रंथाची एकत्रित संघ तालिका www.granthalaya.org या संकेत स्थळावर सध्या उपलब्ध आहे. या संघतालिकेमुळे जगातून कुठूनही या उपक्रमात सहभागी ग्रंथालयांपैकी कोणत्या ग्रंथालयात कोणता ग्रंथ आहे हे शोधणे शक्य झाले आहे. त्याबरोबरच एखाद्या विशिष्ट ग्रंथालयातील ग्रंथाचा शोध शीर्षक, ग्रंथकार, विषय, आय.एस.बी.एन. इत्यादी घटकांच्या माध्यमातून शोध घेता येतो.



सध्या या उपक्रमामध्ये डोंबिवली सार्वजनिक ग्रंथालय, जवाहर वाचनालय-कळवा, मराठी ग्रंथसंग्रहालय- ठाणे, नगरवाचन मंदिर-ठाणे, सार्वजनिक वाचनालय-कल्याण, सार्वजनिक वाचनालय-श्रीवर्धन, दादर सार्वजनिक वाचनालय, एस.व्ही. पाठक ग्रंथालय - विलेपार्ले, श्री छत्रपती प्रतापसिंग महाराज नगर वाचनालय-सातारा, न.चिं. केळकर सार्वजनिक ग्रंथालय - मुलुंड, रत्नागिरी नगर वाचनालय - रत्नागिरी, पुणे नगर वाचन मंदिर-पुणे, लोकमान्य ग्रंथसंग्रहालय - वाई, डी.बी.जे. महाविद्यालय - चिपळूण, प्राच्य विद्या संस्था - ठाणे, बेडेकर विद्यामंदिर-ठाणे, वा. ना. बेडेकर व्यवस्थापन संस्था - ठाणे इत्यादी मान्यवर ग्रंथालयाचा सहभाग आहे.

या प्रकल्पात भाग घेऊ इच्छिणाऱ्या ग्रंथालयांसाठी खालील प्रकाराची मदत विद्या प्रसारक मंडळाच्यावतीने करण्यात येते.

- ग्रंथालय संगणकीकरण करण्यासाठी KOHA ही मुक्त ग्रंथालय संगणकप्रणाली प्रस्थापित (Install) करून देणे.
- सहभागी ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांना KOHA ही संगणकप्रणाली वापरण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण देणे.
- जर सहभागी ग्रंथालयामध्ये अगोदर कोणत्याही स्वरूपात ग्रंथाचा संगणकीय माहिती संग्रह असेल तर तो KOHA मध्ये स्थलांतरीत करून देणे.
- सहभागी ग्रंथालयांची तयार झालेली संगणकीकृत तालिका www.granthalaya.org या संकेत स्थळावर उपलब्ध करून देणे व संकेतस्थळ अद्ययावत ठेवणे.

या सर्व कामांसाठी विद्याप्रसारक मंडळाने एका अभ्यास गटाची स्थापना करून KOHA या मुक्तप्रणालीमध्ये संशोधन करून सार्वजनिक ग्रंथालयात वापराच्या दृष्टीने आवश्यक ते बदल केले आहेत. KOHA या मुक्तप्रणालीबरोबरच LINUX ही Operating system ग्रंथालयांनी वापरावी यावरही विशेष भर देऊन जाणीवपूर्वक प्रयत्न केले जात आहेत. KOHA संगणकप्रणाली वापरण्यासाठी आवश्यक ते हार्डवेअर व नेटवर्क निर्मितीसाठी विनाशुल्क मार्गदर्शन या अभ्यासगटाच्या माध्यमातून ग्रंथालयांना पुरविले जाते. KOHA प्रस्थापित (Install) करण्याबरोबरच माहिती संग्रह निर्मितीसाठी आवश्यकता असल्यास आणि सहभागी ग्रंथालयाची विनंती केल्यास ग्रंथालयशास्त्रामध्ये प्रशिक्षित मनुष्यबळ, माहिती संग्रह निर्मितीसाठी त्याचबरोबर ग्रंथवर्गीकरण केलेले नसल्यास त्यासाठी मार्गदर्शन केले जाते.

मुक्त संगणकप्रणालीचा प्रचार आणि प्रसारासाठी त्याचबरोबर ग्रंथालय संगणकीकरण करण्यासाठी एकत्रितरित्या जाणीवपूर्वक प्रयत्न करणारा हा भारतातील पहिलाच प्रकल्प आहे असे वाटते.

विद्याप्रसारक मंडळाने ही माहिती सर्व ग्रंथालयांपर्यंत पोहचविण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न केले आहेत. इलेक्ट्रॉनिक व प्रिन्ट मिडियानेदेखील या उपक्रमाला बरीच प्रसिद्धी दिली अहे. सार्वजनिक ग्रंथालयाच्या परिषदा, सभा व अधिवेशनामध्ये या उपक्रमाची माहिती ग्रंथालयापर्यंत पोहचविण्याचे प्रयत्न झाले आहेत. परंतु दुर्दैवाने अजूनही या उपक्रमाला हवा तसा प्रतिसाद मिळत नसल्याची खंत डॉ. विजय बेडेकर यांना आहे.

www.granthalaya.org. या उपक्रमाचे अजून एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे मराठीत ग्रंथाविषयी संगणक प्रणालीमध्ये माहिती भरणे व शोध घेणे या दोन्ही गोष्टी सुलभपणे पार पाडण्याची व्यवस्था आहे. सहभागी ग्रंथालयामधील ग्रंथसंग्रहाची माहिती देण्याबरोबरच ग्रंथालयाच्या आणि वाचकांच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या अनेक महत्त्वाच्या जागतिक मान्यताप्राप्त व माहितीपूर्ण संकेतस्थळांना जोडणी दिलेली आहे.

ग्रंथालयाच्या संपूर्ण संगणकीकरणासाठी आवश्यक असणारा तांत्रिकदृष्ट्या अद्ययावत सर्वर (Server) विकत घेणे बऱ्याच सार्वजनिक ग्रंथालयांना शक्य होत नाही. म्हणून विद्या प्रसारक मंडळाने www.granthalaya.org या संकेत स्थळावर डेटा सेंटर्सची निर्मिती केली आहे. या डेटा सेंटरचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या ग्रंथालयाचा फायदा म्हणजे त्यांना त्यांच्या ग्रंथालयात ग्रंथालय संगणकप्रणाली प्रस्थापित (Install) करण्याची किंवा सर्वर मेन्टेंन करण्याची गरज नाही. त्यांच्याकडे फक्त इंटरनेट जोडणी असल्यास कोणत्याही वेब ब्राऊजवरच्या माध्यमांतून ते या डेटासेंटरला जोडले जाऊ शकतात. थोडक्यात, हे डेटा सेंटर म्हणजे सहकारी तत्त्वावर चालविलेला मोठ्या क्षमतेचा सर्वर आहे. यामध्ये सहभागी होणाऱ्या ग्रंथालयांना सर्वर ग्रंथालयात न ठेवताही साध्या संगणकावरून ग्रंथालयाची सर्व कामे जसे- व्यवस्थापन, देवघेव, शुल्क आकारणी, सभासद नोंदणी, ग्रंथनोंदणी, बारकोडिंग, ग्रंथपरिगणन, इत्यादी कामे करता येऊ शकतात.

या उपक्रमाचा पुढील टप्पा म्हणजे www.granthalay.org हे संकेतस्थळ ग्रंथालय व वाचकोपयोगी माहितीने समृद्ध करणे. जसे- प्रकाशकाची माहिती, ग्रंथविक्रेत्यांची माहिती, मराठी ग्रंथकाराविषयी माहिती, इत्यादी उपलब्ध करून देण्यात येईल. कॉपीराईट कायद्यांतर्गत नसलेले ग्रंथ डिजिटल स्वरूपात वाचकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. सध्या सानेगुरूजी, स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या साहित्याबरोबर विद्याप्रसारक मंडळाचा दिशा हा अंक व सतधर्म हा अंक संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. विद्याप्रसारक मंडळाच्या या उपक्रमात सहभागी होऊन ग्रंथालय संगणकीकरणाची चळवळ पुढे नेण्यास निश्चित स्वरूपाची मदत ग्रंथालयांना मिळेल यात शंका नाही.

❑❑❑



# साहित्यसूची : आशय विश्लेषण

स्नेहल सुनील जोशी
ग्रंथपाल, वसंतदादा पाटील दंत महाविद्यालय सांगली,
डॉ. नमिता खोत
शिक्षणक्रम संयोजक व ग्रंथपाल, विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर

*साहित्यसूची या नियतकालिकाचे आशय विश्लेषण करून वर्णनात्मक सारसूची तयार करून एम.फिल पदवीकरिता सादर करण्यात आलेल्या प्रबंधिकेवर आधारित श्रीमती स्नेहल जोशी यांचा लेख वाचकांकरिता सादर.*

## प्रस्तावना

दैनंदिन जीवनात अनेक मार्गांनी आपल्यापर्यंत ज्ञान/माहिती येत असते. ज्ञानाचा, माहितीचा स्फोट झाला आहे असे म्हणण्याइतपत माहितीची निर्मिती होत आहे. यामागे संशोधन हीच महत्त्वाची बाब आहे. कोणत्याही क्षेत्रात समस्या निर्माण झाली की संशोधनला सुरुवात होते. माहितीच्या संप्रेषणासाठी अनेक प्रकारची साधने आहेत. लिखित संप्रेषणाची साधने माहितीच्या स्फोटाचे स्वरूप लक्षात आणून देतात. नियतकालिके ही त्यापैकीच एक आहेत. नियतकालिकांत असणाऱ्या प्रचंड ज्ञानसाठ्यातील माहिती वाचकांच्या गरजेप्रमाणे प्रसारित करणे त्याचप्रमाणे नियतकालिकांच्या बांधीव खंडातून माहितीचा भूतलक्ष्यी शोध (Retrospective Search) ही महत्त्वाची कार्ये/ सेवा ग्रंथपालाकडून, ग्रंथालयाकडून अपेक्षित असतात.

प्रस्तुत संशोधकाने आपल्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयातील एम.फील अभ्यासक्रमांतर्गत संशोधन प्रकल्पासाठी ''साहित्यसूची मासिकाचे आशय विश्लेषण आणि प्रारंभापासूनच्या लेखांची वर्णनात्मक सारसूची'' हा विषय निवडला होता. या संशोधनाच्या साहित्यसूची मासिकाचे आशय विश्लेषण करणे आणि याआधारे

नियतकालिकाद्वारे देण्यात येणाऱ्या सेवांचे स्वरूप स्पष्ट करणे हा प्रमुख उद्देश असल्याने संशोधकाने सदर विषयाची संशोधन प्रकल्पासाठी निवड केली होती.

प्रस्तुत संशोधन प्रकल्पामधे पुढील पाच प्रकरणांचा समावेश आहे.

(१) प्रस्तावना
(२) आशय विश्लेषण आणि सूचिशास्त्र व सारलेखन
(३) साहित्यसूची मासिकाचे आशय विश्लेषण
(४) माहिती संकलन आणि सांख्यिकीय विश्लेषण
(५) निष्कर्ष आणि शिफारशी

## (१) संशोधन व संशोधन पद्धती

संशोधन म्हणजे संपूर्ण म्हणून जे ज्ञात आहे त्यामध्ये आणखी नवीन किंवा ते अद्यापही अज्ञात आहे ते शोधून काढण्यासाठीचे प्रयत्न होय. संशोधन पद्धती म्हणजे तर्कशुद्ध विचार करण्याचे तंत्र असून या तंत्राच्या आधारे समस्या सीमित केली जाते. समस्येसंबंधीची सर्व माहिती वस्तुनिष्ठपणे गोळा केली जाते, ती संकलित केली जाते आणि त्या माहितीच्या विश्लेषणानंतर संशोधक निष्कर्षापर्यंत पोहोचतो. संशोधनाच्या सुरुवातीला केलेल्या अनुमानाशी जर संशोधनाच्या शेवटी काढलेल्या निष्कर्ष जमला, तर शाश्वत असा सिद्धान्त किंवा सूत्र तयार होते. ही संशोधनाची प्रक्रिया आहे. संशोधन प्रक्रिया ज्या क्रमागत पायऱ्याद्वारे संपन्न केली जाते, ती संशोधन पद्धती होय.

## (२) संशोधन समस्या आणि समस्या सूत्रण

संशोधकास अनेक कारणे संशोधनास प्रवृत्त करतात. केवळ संशोधन विषय ठरवून संशोधनाची सुरुवात होत नाही. कारण संशोधनाच्या सामान्य विषयावरून संशोधनाची दिशा निश्चित होत नाही. सामान्य स्वरूपाच्या संशोधन विषयास विशिष्ट समस्येचे रूप दिल्यामुळे समस्या सूत्रण होते. समस्या सूत्रणामुळे संशोधनाची दिशा निश्चित होते. सदर संशोधनाचे समस्याविधान खालीलप्रमाणे आहे.

'साहित्यसूची' मासिकाचे आशय विश्लेषण आणि मासिकाच्या प्रारंभापासूनच्या लेखांची वर्णनात्मक सारसूची

'साहित्यसूची' हे सन १९८० पासून नियमित प्रकाशित होणारे मासिक आहे. यामध्ये मराठी वाङ्मयीन जगतातील घडामोडी, लेखक, प्रकाशक यांच्यासंबंधीच्या लेखांचा तसेच मराठी ग्रंथसूची, मराठी पुस्तकांच्या प्रकाशकांनी दिलेल्या जाहिरातींचा समावेश आहे.



## (३) संशोधनाचे महत्त्व आणि गरज

सदर संशोधन हे आशय विश्लेषण आणि सूचीशी संबंधित आहे. संशोधन व माहितीशास्त्रामध्ये संशोधनात ग्रंथपाल याचा वापर अनेक प्रकारे करतात. ग्रंथनिवडीपासून सारलेखनपर्यंत आशयविश्लेषणाचा वापर होतो. सूची ही महत्त्वाची गरज संशोधनास असते. विद्यार्थी, शिक्षक, संशोधक, अभ्यासक यांना नियतकालिकांच्या आशयविश्लेषणामुळे माहितीची प्रतिप्राप्ती होण्यात सुलभता येते. तसेच याचा प्रभावी वापर करता येऊ शकतो हे स्पष्ट होईल.

संशोधनामुळे समस्येचे निराकरण होते. प्रस्तुत विषय हा नियतकालिकाशी संबंधित आहे. सध्या प्रचंड प्रमाणावर नियतकालिके प्रकाशित होत आहेत. नियतकालिकांतून माहितीचा प्रचंड स्रोत असतो. अशा व्यापक स्रोतातून माहितीची प्रतिप्राप्ती करणे ही एक समस्या होऊ शकते. यावर हा संशोधन विषय हा एक मार्ग आहे.

## (४) संशोधनाची उद्दिष्टे

सदर संशोधनाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

(१) साहित्यसूची मासिकाच्या प्रारंभापासून म्हणजे फेब्रुवारी १९८० पासून जानेवारी २००९ पर्यंतच्या सर्व वर्षांतील प्रत्येक अंकाचा संक्षिप्त परिचय करून देणे.
(२) सन २००५ ते २००९ या कालावधीमधील मासिकातील ग्रंथपरिचय, विशेष ग्रंथस्वागत, नवं कोरं, इत्यादी सदरातील ग्रंथांची सूची तयार करणे. (प्रकाशन कालक्रमानुसार)
(३) प्रस्तुत मासिकातील सर्व लेखांचे सार काढून त्यांची वर्णनात्मक सारसूची तयार करणे. (ग्रंथकारानुसारी अकारविल्हे)
(४) मासिकातील लेखांचे विषयवार वर्गीकरण करून प्रत्येक विषयाच्या लेखांचे प्रमाण काढणे.
(५) मासिकातील सहभागी लेखकांची संख्या व त्यांचे प्रमाण काढणे.

## (५) संशोधनाची गृहीतके

(अ) नियतकालिकांच्या आशय विश्लेषणाच्या आधारे अनुक्रमाणिका यादी, सारसेवा, निवडक माहितीचे प्रसारण या सेवा प्रभावीपणे देता येतात.
(ब) नियतकालिकांच्या आशय विश्लेषणाच्या आधारे तयार केलेल्या वर्णनात्मक सारसूचीचा वापर संशोधक, अभ्यासक प्रभावीपणे करू शकतील.

## (६) व्याप्ती व मर्यादा

महाराष्ट्रात प्रकाशित होणाऱ्या नियतकालिकांची त्यातून मराठी मासिकांची संख्या मोठी आहे. 'साहित्यसूची' हे मराठी मासिक पंचवीस वर्षांहून अधिक काळ सातत्याने प्रकाशित होत आहे. ही या संशोधनाची व्याप्ती आहे आणि हीच मर्यादा आहे. संशोधनाच्या उद्दिष्ट क्रमांक ३ साठी २००५ ते २००९ ही कालमर्यादा आहे. या कालावधीतील प्रकाशित अंकांचा वापर यासाठी केला आहे.

## (७) संशोधन सारांश

विविध संप्रेषणाच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या आशयाचा (लिखित वा मौखिक) जनमानसावर गुणात्मक परिणाम होतो. या गुणात्मक तथ्यांचे सांख्यिकीय व वस्तुनिष्ठ तथ्यांत रूपांतर करण्यास 'आशय-विश्लेषण' या तंत्राचा वापर होतो. संशोधकाने आशय विश्लेषण हे अभ्यासतंत्र, सूचिशास्त्र व सारलेखनाच्या आधारे प्रस्तुत संशोधन प्रकल्प पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकास फेब्रुवारी १९८० च्या पहिल्या साहित्यसूचीच्या अंकापासून जानेवारी २०१० या कालावधीतील ३६० प्रकाशित अंकांपैकी ३४५ अंक उपलब्ध झाले. यातील दिवाळी अंक वगळून उर्वरित इतक्या अंकाचा संशोधन प्रकल्पात समावेश केला आहे.

### ७.१ प्रथम उद्दिष्टांनुसार संशोधकाने सदर सर्व अंकांचे वाचन करून त्यांचा परिचय करून दिलेला आहे. जसे-

**फेब्रुवारी १९८०**

साहित्यसूची मासिकाचा हा पहिला अंक आहे. यात संपादकांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. तसेच जाहिरातीविषयी अधिक माहिती आहे. या अंकांत गं. बा. सरदार यांचा 'लेखकाची बांधिलकी समाजाशी हवी' हा ५४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अधिवेशनातील अध्यक्षीय भाषणाचा संपादित भाग आहे.

**जून १९९०**

या अंकात काकासाहेब अवचट यांच्या आठवांच्या पारंब्या; कुणा एकाची लेखन गाथा - श्रीपाद काळे; लेखकाची कन्या प्रकाशकाची पत्नी - सुमती कुलकर्णी; आशय, रूप, कला - पद्माकर चितळे ; ललित साहित्यातून समाजसेवा करणारे भाऊ बावीसकर - गंगाधर महांबरे ; शेषंम कोपेन पुरयेत - विश्वेश्वर सावदेकर ; महाविद्यालयीन



विद्यार्थ्यांसाठी मध्ये ज्ञानेश्वरी एक नवलावो - व. दि. कुलकर्णी, बाळकृष्ण अनंत भिडे - सु. रा. चुनेकर ; म्हणोनि संवादाचा सुवावो ढळे - वा. पु. गिडे ; रससिद्धांताचे प्रमुख मराठी चर्चाकार : एक विहंगमावलोकन - शकुंतला आठवले आदी लेखांचा समावेश आहे. खेरीज वाढदिवस शुभेच्छा, गेल्या महिन्यात असं घडलं, नवीन पुस्तकाविषयी थोडेसे, ऐसी रसिके अक्षरे आदी सदरांचा समावेश आहे.

### ७.२ संशोधनाच्या दुसऱ्या उद्दिष्टानुसार सन २००५ ते २००९ या कालावधीत विविध ग्रंथपरिचयात्मक सदरातील ग्रंथांची सूची केली आहे.

सदर सूची नोंदीतील घटक पुढीलप्रमाणे असून त्या प्रकाशन कालक्रमानुसार आहेत.

ग्रंथकार ; ग्रंथनाम ; प्रकाशनस्थळ ; प्रकाशक ; एकूण पृष्ठे ; मूल्य.

लेखाचे शीर्षक ; ग्रंथपरिचय करून देणारा लेखक ; पृष्ठ क्रमांक

उदा.

असलेकर, प्रशांत ; चित्रलेखा ; वर्ष २६, अंक ६, ऑगस्ट २००५, पृ. ६४

### ७.३ संशोधनाच्या उद्दिष्टानुसार साहित्यसूचीच्या सर्व उपलब्ध अंकांतील लेखांचे वाचन करून त्या लेखातील आशयाच्या विषयानुसार २३ विषयांत वर्गीकरण केले आहे.

**साहित्यसूची मासिकातील लेखांचे वर्गीकरण व त्यांचे प्रमाण**

| क्र. | लेखविषय | संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|
| (१) | अन्य भाषा | २८ | १.१ |
| (२) | आकाशवाणीवरील भाषणे | ९ | ०.४ |
| (३) | काव्य | ७६ | २.९ |
| (४) | ग्रंथपरिचय | ३३० | १२.४ |
| (५) | ग्रंथालयशास्त्र | १२९ | ४.९ |
| (६) | जन्मशताब्दी | ३६ | १.४ |
| (७) | नियतकालिके | २१ | ०.८ |

| क्र. | लेखविषय | संख्या | प्रमाण |
|---|---|---|---|
| (८) | पुरस्कार | २६ | १.० |
| (९) | प्रकाशन | ९२ | ३.५ |
| (१०) | बालसाहित्य | २१ | ०.८ |
| (११) | भाषा-साहित्य | १२६ | ४.७ |
| (१२) | महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी | ४२० | १५.८ |
| (१३) | लेखक | ३७३ | १४ |
| (१४) | लेखिका | १२८ | ४.५ |
| (१५) | विदेशी लेखक | २४ | ०.९ |
| (१६) | विज्ञान साहित्य | ७३ | २.७४ |
| (१७) | शब्द | ३३ | १.२४ |
| (१८) | श्रद्धांजली | २५८ | ९.७ |
| (१९) | संकीर्ण | ९९ | ३.७२ |
| (२०) | संत साहित्य | ४४ | १.७ |
| (२१) | संमेलन | १०१ | ३.८ |
| (२२) | संस्था | ४५ | १.७ |
| (२३) | स्मरण | १७३ | ६.८ |
| | एकूण | २६६५ | १०० |

लेखांचे विषय व त्यांचे प्रमाण दर्शविणारी ही सारणी आहे. सर्वाधिक लेख हे 'महाविद्यालयीन विद्यार्थ्यासाठी' या विषयातील आहेत व सर्वात कमी लेख हे आकाशवाणीवरील भाषणे या विषयातील आहेत. ही सारणी शंकालेखामध्ये मांडली आहे.

प्रत्येक विषयातील लेखांची संख्या व त्यांचे एकूण संख्येशी असलेले प्रमाण काढले आहे. एकूण २६६५ लेख आहेत. विषयांचा अनुवर्णाप्रमाणे क्रम लावून, प्रत्येक लेखाचे सार काढून त्याची नोंद लेखकानुसार अकारविल्हे केली आहे. जर एका लेखकाचे एकापेक्षा अधिक लेख असल्यास ते प्रकाशनकालानुसार नोंदविले आहेत जसे, अन्य भाषाविषयक लेख.



**(१) बोल्ली, लक्ष्मीनारायण ; तेलुगु मराठीचा परस्परसंबंध, वर्ष १७ अंक, ८ सप्टेंबर १९९६; पृ. २४-२९**

तेलुगु व मराठी भाषेचा परस्परसंबंध स्पष्ट करताना भाषेची उत्पत्ती, साहित्याचा उगम, उभयभाषेतील कवी परंपरा व साम्यस्थळे, मराठी प्रदेशात यादव काळात तेलुगु शिकण्यासाठी असणारी विद्यापीठ केंद्रे, लिपी, मराठी भाषिक तेलुगु साहित्यिक ; तेलुगु भाषिक मराठी साहित्यिक, तेलुगु रंगभूमीवर मराठीचा प्रभाव या मुद्यावर चर्चा आहे.

**(२) बोल्ली, लक्ष्मीनारायण ; तेलुगूच्या वेलीवर मराठी फुले ; वर्ष २६, अंक ३, एप्रिल २००५, पृ. २८-३१**

लेखकाची मातृभाषा तेलुगु आणि गात्रभाषा मराठी आहे. तेलुगू भाषेचा परिचय येथे करून देताना, या भाषेची उत्पत्ती, अर्थ, साहित्याचा इतिहास, साहित्य संमेलने, त्यांचे स्वरूप याबरोबरच सर्व तेलुगू साहित्यिक, ग्रंथ आणि लेखकाच्या अनुवादित ग्रंथाविषयी माहिती आहे. आपण केलेल्या अनुवादाविषयी माहिती आहे.

७.४ साहित्यसूची मासिकातील लेखांप्रमाणे लेखमालांची वर्णनात्मक सारसूची केली आहे. या लेखमालेतील लेखांची संख्या ३६५ इतकी आहे. तसेच प्रत्येक लेखमालेतील लेखांची संख्या दर्शविणारी सारणी केली आहे आणि त्याचा स्तंभालेखही काढला आहे.

७.५ साहित्यसूची मासिकातील सहभागी लेखकांची संख्या १०२४ इतकी आहे. या सर्व लेखकांची सूची केली आहे. या सूचीत लेखकाच्या नोंदीसमोर त्यांनी लिहिलेल्या लेखांची संख्या नमूद केली आहे. सर्वाधिक लेख लिहिणाऱ्या लेखकांची स्वतंत्र सारणी केली आहे. तसेच या सारणीचा रेखालेखही काढला आहे.

## (८) गृहीतकाची पडताळणी

प्रस्तुत संशोधन प्रकल्पाच्या आरंभी प्रतिपादिलेली गृहीतके प्रकल्पाच्या अंती सत्य ठरली आहेत. संशोधकाने नियतकालिकांच्या आशय विश्लेषण तंत्राच्या आधारे विविध संदर्भसेवा प्रभावीपणे देता येतात आणि याआधारे संकलित केलेल्या वर्णनात्मक सारसूचीमुळे संशोधक व अभ्यासक यांना आवश्यक माहिती अल्प वेळात व अचूकपणे प्राप्त होते.

## (९) संशोधनातील निष्कर्ष व शिफारशी

या संशोधनातील निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

(१) साहित्यसूची मासिकाचे प्रकाशन नियमित आहे.

(२) साहित्यसूची मासिकाने आपला ग्रंथप्रसाराचा उद्देश कायम ठेवला आहे.

(३) मासिक ग्रंथप्रसार करते आणि ग्रंथनिवडीसाठी साहाय्यभूत होते.

(४) मासिकाने मराठी साहित्याच्या अधिकाधिक पैलूंना स्थान देण्याचा प्रयत्न केला आहे.

(५) ग्रंथ व्यवहाराशी संबंधित विविध मजकुरामुळे हे मासिक ग्रंथपालांना उपयुक्त आहे.

(६) मुख्यत: मराठी साहित्यिकांचे विविध पैलू मांडणारे लेख या मासिकात प्रसिद्ध होत असल्याने एखाद्या लेखकाचा समग्र अभ्यास करणे शक्य आहे.

(७) देशी तसेच विदेशी साहित्य, साहित्यव्यवहार व साहित्यिकांचा परिचय करून देणारे लेख या मासिकात समाविष्ट असल्याने साहित्याचा तुलनात्मक अभ्यास करणे संशोधकांना शक्य आहे.

(८) 'महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी' या सदराखालील माहितीपूर्ण लेखामुळे सर्व स्तरांवर मराठी भाषा शिकणाऱ्या विद्यार्थ्यांस साहित्यसूची हे उपयुक्त मासिक ठरले आहे.

## (१०) शिफारशी

(१) साहित्यसूची मासिकातून विविध प्रकारच्या सूची प्रसिद्ध होतात. दरवर्षी त्या त्या वर्षात प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांची सूचीही प्रसिद्ध होते. ही सूची साहित्यप्रकारानुसार असते, त्याचबरोबर ती सूची अनुवर्णानुसार असावी.

(२) साहित्यसूची मासिकात मराठी साहित्याशी संबंधित विविध विषयांवरील लेख विविध लेखकांनी लिहिले आहेत. परंतु विज्ञान साहित्य व बालसाहित्य या विषयात सर्वांत कमी लेखक सहभागी आहेत. या प्रकाराचे लेखन करणारे लेखक समाविष्ट व्हावेत.

(३) साहित्यसूची मासिकाने दलित साहित्य व ग्रामीण साहित्य हे प्रकार हाताळलेले नाहीत. या साहित्यप्रकारांचा समावेश मासिकात असावा.

(४) साहित्यसूची मासिकातील सहभागी लेखकांत लेखिकांची संख्या कमी आहे. ती वाढली जाण्याची शिफारस आहे.



## (११) भविष्यवेध

साहित्यसूची मासिकाच्या अंकांचा प्रारंभापासून जानेवारी २०१० पर्यंतचा अभ्यास केल्यानंतर संशोधकाला अभ्यास करण्यास योग्य अशा अन्य विषयांची जाणीव झाली. संशोधकाला खालील विषयांत अधिक अभ्यास करण्यास वाव असल्याचे जाणवले.

(१) साहित्यसूची मासिकातील ग्रंथविषयक जाहिरातींचा अभ्यास करता येईल.

(२) साहित्यसूची मासिकातील लेखाशिवायच्या सदरांचा स्वतंत्रपणे अभ्यास करता येईल.

(३) साहित्यसूची मासिकातील सहभागी प्रकाशकांचे उत्तरदायित्व या विषयाचा अभ्यास करता येईल.

(४) साहित्यसूची मासिकातील साहित्यिक घडामोडींची माहिती देणाऱ्या सदरांचा अभ्यास करता येईल.

(५) साहित्यसूची मासिकातील एक वा अनेक सहभागी लेखकांच्या कर्तृत्वाचा आढावा घेता येईल.

(६) साहित्यसूची मासिकातील विविध विषयांतील लेखांच्या उलट संदर्भीय नोंदीची सूची करता येईल.

(७) साहित्यसूची मासिकातील प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांची सूची साहित्यप्रकारानुसार ग्रंथकारानुसार, प्रकाशकानुसार, शीर्षकानुसार संकलित करता येईल.

(८) साहित्यसूची मासिकातील लेखांची निर्देश सूची करता येईल.

(९) साहित्यसूची मासिकाच्या दिवाळी अंकांचा स्वतंत्रपणे अभ्यास करता येईल.

## संदर्भसूची

(१) कऱ्हाडे, बी. एम. शास्त्रीय संशोधन पद्धती, २०००, नागपूर, पिंपळापुरे प्रकाशन, पृ. ३१९

(२) भांडारकर पु. ल. सामाजिक संशोधनपद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती भांडार, नागपूर, १९८१, पृ. २३३

(३) आगलावे प्रदीप, संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे, नागपूर, विद्या प्रकाशन, २०००, पृ. ३६१

(४) Websters 3rd New International Dictionary Vol I. pg.492

(५) हिंगवे, कृ. शं., भाषा व साहित्य संशोधन खंड २, संपा. डॉ. वसंत जोशी व डॉ. गं. ना. जोगळेकर, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, १ली आ. १९८५

(६) चुनेकर सु. रा. आनंद साधले, साहित्यसूची संकलन, उमा दादेगांवकर, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, १९८९, पृ. १८
(७) देव सदाशिव, कोश वाङ्मय विचार आणि व्यवहार, सूपर्ण प्रकाशन, पुणे, २००२, पृ. १९८-२४६
(८) देव सदाशिव, कोश वाङ्मय विचार आणि व्यवहार, सूपर्ण प्रकाशन, पुणे, २००२, पृ. १९८-२४६
(९) भट शरद गोपाळ, प्रलेखन परिचय, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर, १९७६, पृ. १००
(१०) थोरात एल.एन., ग्रंथालय माहितीशास्त्र, डायमंड पब्लिकेशन, पुणे, पृ. १७१

❑❑❑



# उच्च शिक्षण आणि शोध संस्था दक्षिण भारत हिंदी प्रचार सभा, हैद्राबाद ग्रंथालयातील संदर्भसेवा विभाग : एक परिचय

प्रा. संतोष कांबळे
ग्रंथपाल, उच्च शिक्षण आणि शोध संस्था
दक्षिण भारत हिंदी प्रचार सभा, हैद्राबाद

*राष्ट्रपिता म. गांधींनी दक्षिण भारतात हिंदी भाषेच्या प्रचारार्थ दक्षिण भारत हिंदी प्रचार सभेची स्थापना केली. ते दक्षिण भारत हिंदी प्रचार सभेचे संस्थापक अध्यक्ष होते. सन १९६४ मध्ये संसदीय अधिनियम १४ द्वारे दक्षिण भारत हिंदी प्रचार सभेस 'राष्ट्रीय महत्त्व प्राप्त संस्था' म्हणून घोषित करण्यात आले. या संस्थेच्या संदर्भसेवा विभागाचा परिचय या लेखातून होणार आहे.*

## प्रस्तावना

सदर ग्रंथालयाचा संदर्भसेवा विभाग हा संशोधक आणि अभ्यासकांची माहितीची अंतिम पायरी होय. हा विभाग म्हणजे हिंदी भाषेतील संशोधकांची प्रयोगशाळाच होय. अद्ययावत संदर्भसाधने, अभ्यासू विनम्र व कार्यतत्पर कर्मचारी वर्ग या सर्व बाबी संशोधनाची गुणवत्ता व संशोधनास लागणारा कालावधी कमी करण्यास मदत करतात.

प्रस्तुत लेखात दक्षिण भारत हिंदी प्रचार सभा, उच्च शिक्षण आणि शोध संस्था, हैद्राबाद ग्रंथालयातील संदर्भसेवा विभागाचा परिचय करून दिली आहे. संदर्भ विभागातील विविध व वैशिष्ट्यपूर्ण ग्रंथसंग्रह, संग्रह विकास, सेवा, भौतिक साधनांची उपलब्धता, कर्मचारी वर्ग व अडचणी यांची सविस्तर ओळख करून दिली आहे. दक्षिण भागात हिंदी प्रचार सभा, उच्च शिक्षण आणि शोध संस्थान, हैद्राबाद या ग्रंथालयाचा संदर्भसेवा विभाग ग्रंथालय स्थापनेसोबतच अस्तित्वात आला आहे. सुरुवातीस या विभागाचे स्वरूप

मर्यादित होते. पण जसजसा संदर्भसाधनांचा संग्रह वाढत गेला तसतसे विभागाला विशेष स्वरूप प्राप्त झाले. सध्या हा विभाग मुख्य इमारतीच्या पहिल्या मजल्यावर कक्ष क्रमांक एकमध्ये अस्तित्वात आहे.

## (२) लेखाची उद्दिष्टे

(१) संदर्भसेवा विभागाची ओळख करून देणे.
(२) संदर्भसेवा विभागातील विविध संदर्भ साधनांची माहिती देणे.
(३) संदर्भसेवा विभागाची वैशिष्ट्ये नमूद करणे.
(४) संदर्भ विकासाची चर्चा करणे.
(५) संदर्भसेवा विभागाच्या गुण-दोषांचे विवेचन करणे.

## (३) संदर्भसेवा विभागातील वाचनसाहित्य

सदर ग्रंथालय अजूनही शिशू अवस्थेत आहे. इतर विद्यापीठांप्रमाणे प्रत्येक वाचन-साहित्याच्या प्रकारानुसार वेगवेगळे विभाग निर्माण केले गेलेले नाहीत. संदर्भसेवा विभागात पाच प्रकारचे वाचन-साहित्य उपलब्ध आहे.

**तक्ता क्र. १ : संदर्भसेवा विभागातील वाचन-साहित्य**

| क्र. | वाचनसाहित्याचे प्रकार | संख्या |
|---|---|---|
| (१) | संदर्भ ग्रंथ | १,७१८ |
| (२) | प्रबंध | ३८० |
| (३) | अहवाल | ९१ |
| (४) | नकाशे, ग्लोब्ज | १७ |
| (५) | सी.डी., फ्लॉपी, कॅसेटस | ४१ |

तक्ता क्र. १ पाहता ग्रंथालयात संग्रहित केलेल्या एकूण वाचन-साहित्यापैकी ३३% संदर्भग्रंथ, २७% प्रबंध, २०% अहवाल, १३% सी.डी., फ्लॉपी, कॅसेटस तर ७% नकाशे आणि ग्लोब्ज आहेत.

## ३.१ संदर्भग्रंथ

संदर्भसेवा विभागातील हा महत्त्वाचा घटक आहे. यामध्ये हिंदी, इंग्रजी, तेलुगू, आणि तमिळ भाषेतील संदर्भग्रंथांचा समावेश आहे. १७०० च्यावर संकीर्ण विषयांचे संदर्भ ग्रंथ या विभागात उपलब्ध आहेत. यामध्ये कोठारी कमिशन आयोग अहवाल,



भारतीय विद्यापीठांत सादर झालेल्या प्रबंधांची सूची, हिंदी, इंग्रजी, तेलुगू आणि तमिळ भाषेतील ज्ञानकोश, शब्दकोश यांसह अनेक वैशिष्ट्यपूर्ण संदर्भग्रंथ वाचकांना उपलब्ध आहेत.

### ३.१.१ संदर्भग्रंथांची भाषानिहाय विभागणी

संदर्भसेवा विभागात विविध भाषांतील संदर्भग्रंथांचा संग्रह संकलित करण्यात आलेला आहे. भाषानिहाय संदर्भग्रंथांची संख्या तक्ता क्र. २ मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता क्र. २ : संदर्भग्रंथांची भाषानिहाय विभागणी**

| क्र. | भाषा | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| (१) | हिंदी | १,४७९ | ८६% |
| (२) | इंग्रजी | ११३ | ०७% |
| (३) | तेलुगू | १०७ | ०६% |
| (४) | तमिळ | १९ | ०१ |
| | एकूण | १७१८ | १००% |

तक्ता क्र. २ पाहता असे लक्षात येते, की हिंदी भाषेतील संदर्भग्रंथांची संख्या सर्वांत जास्त म्हणजे ८६% आहे. त्यानंतर इंग्रजी, तेलुगू आणि तमिळ असा क्रम लागतो.

### ३.१.२ संदर्भग्रंथांची प्रकारानुसार विभागणी

वाचकांच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी संदर्भसेवा विभागामध्ये विविध संदर्भग्रंथांचा संग्रह केलेला आहे. प्रकारानुसार संदर्भग्रंथांची संख्या तक्ता क्र. ३ मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता क्र. ३ : संदर्भग्रंथांची प्रकारानुसार विभागणी**

| क्र. | संदर्भग्रंथांचा प्रकार | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| (१) | ज्ञानकोश | ९७८ | ५७% |
| (२) | शब्दकोश | २१७ | १३% |
| (३) | स्थलवर्णन कोश | १७ | ०१% |
| (४) | चरित्र कोश | ४३ | ०२% |
| (५) | सूची | १४ | ०१% |

| क्र. | संदर्भग्रंथांचा प्रकार | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| (६) | मार्गदर्शिका | २७ | ०२% |
| (७) | हॅंडबुक्स | ६८ | ०४% |
| (८) | अहवाल | ०१ | ०५% |
| (९) | इतर | २६३ | १५% |
| | एकूण | १७१८ | १००% |

### ३.२ प्रबंध

दक्षिण भारतात हिंदी प्रचार सभेस सादर झालेली पीएच.डी. चे प्रबंध संशोधकांस पदवी घोषीत झाल्यानंतर प्रबंधाची एक प्रत संदर्भसेवा विभागात ठेवली जाते. हिंदी भाषेतील ३८० हून अधिक प्रबंध सध्या उपलब्ध आहेत. सदर संस्थेतीलच नव्हे तर आंध्र प्रदेशातील तसेच महाराष्ट्रातील इतर विद्यापीठे व महाविद्यालयातील अनेक संशोधक प्रबंध विभागाचा फायदा घेतात.

### ३.३ अहवाल

भारतातील विविध संस्था, विद्यापीठे व शासनाचे अहवाल या कक्षात संकलित करण्यात आले आहेत. वार्षिक किंवा इतर अहवालांबरोबरच यु.जी.सी. आणि एन.सी.ई.आर.टी.च्या विविध विषयांच्या अभ्यासक्रम विकास समितीचे अहवाल उपलब्ध आहेत. या अहवालांचा फायदाही वाचक मोठ्या प्रमाणावर घेताना आढळतात.

## (४) संदर्भसेवा

संदर्भसाहित्याची केवळ उपलब्धताच नव्हे तर योग्य वाचकांपर्यंत पोहचविणे हे संदर्भसेवा विभागाचे कार्य असते. त्यास अनुसरून खालील सेवा या विभागात देण्यात येतात.

### ४.१ संदर्भग्रंथांची ओळख

या विभागात नव्यानेच आलेल्या वाचकांना या विभागातील ग्रंथसंग्रहाविषयी माहिती दिली जाते. त्यांना हवा असलेला ग्रंथ उपलब्ध आहे किंवा नाही, त्यांना अपेक्षित विषयाचे संदर्भसाहित्य ज्ञात करून देणे, ग्रंथ शोधण्यासाठी मदत करणे, संदर्भग्रंथ कसा पाहावा याबद्दल माहिती दिली जाते.



### ४.२ प्रतिलिपी सेवा

वाचकांना संदर्भग्रंथातील आवश्यक तेवढी माहिती मिळविण्यासाठी प्रतिलिपी सेवा दिली जाते. परंतु संदर्भसेवा विभागातील विविध विषयांच्या उपलब्ध असलेल्या प्रबंधांची प्रतिलिपी काढण्यास ग्रंथालय समितीच्या व ग्रंथालय नियमानुसार परवानगी दिली जात नाही. विभागात बसूनच लेखन करण्यास परवानगी दिली जाते.

### ४.३ रेफरल सेवा

संदर्भसेवा विभागामध्ये वाचकांच्या गरजांची पूर्तता होत नसेल तर त्यांना आवश्यक ती माहिती कुठे मिळेल याविषयी मार्गदर्शन या विभागाकडून केले जाते. या सेवेलाच रेफरल सेवा असे म्हटले जाते.

### ४.४ कात्रण सेवा

हिंदी भाषा आणि हिंदी साहित्यिकांविषयी जेव्हा एखादा लेख वर्तमानपत्रामध्ये प्रकाशित होतो, तेव्हा अशा प्रकाशित होणाऱ्या लेखांचे कात्रण काढून संग्रह केला जातो आणि वाचकांना ही कात्रण सेवा दिली जाते.

### ४.५ थेसिस ऑफ दि मंथ कात्रणसेवा

भारतातील विद्यापीठांनी घोषित केलेल्या पीएच.डी. प्रबंधांची माहिती असोशिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीच्या 'युनिव्हर्सिटी न्यूज' या नियतकालिकात प्रसिद्ध होते. हिंदी विषयाशी संबंधित कात्रणाच्या फाईल्स अद्ययावत ठेवल्या आहेत. संशोधनासाठी विषय निवड व निवडलेल्या विषयावर यापूर्वी काही संशोधन झाले आहे का ? हे जाणून घेण्यासाठी या सेवेचा उपयोग संशोधक आणि मार्गदर्शक मोठ्या प्रमाणावर घेताना आढळतात.

### (५) वाचकवर्ग

सदर ग्रंथालयाच्या संदर्भसेवा विभागात विद्यार्थी, अध्यापक, संशोधक नियमितपणे अभ्यासासाठी येतात. मातृसंस्था परिसरातील वाचकांबरोबरच शहरातील इतर विद्यापीठांशी संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थी, अध्यापक, संशोधक संदर्भासाठी या विभागास भेट देतात. या विभागास भेट दिलेल्या वाचकांची संख्या दर्शविणारी माहिती तक्ता क्र. ४मध्ये दिली आहे.

**तक्ता क्र. ४ : वाचकांची संख्या**

| क्र. | वर्ष | प्रासंगिक वाचकांची संख्या | नियमित वाचकांची संख्या | एकूण |
|---|---|---|---|---|
| (१) | २००५-२००६ | ९८ | १०८ | २०६ |
| (२) | २००६-२००७ | १९० | १४८ | ३३८ |
| (३) | २००७-२००८ | १३९ | १०१ | २४० |
| (४) | २००८-२००९ | १६७ | १०३ | २७० |
| (५) | २००९-२००१० | १७८ | ११७ | २९५ |

तक्ता क्र. ४ वरून असे निदर्शनास येते की, या विभागात बसून अभ्यास करणाऱ्या वाचकांच्या संख्येत नियमित वृद्धी होत आहे.

### (६) भौतिक सुविधा

या ग्रंथालयाचा संदर्भसेवा विभाग ग्रंथालयाच्या सुरुवातीलाच आहे. या विभागाचे क्षेत्रफळ ७४० स्केअर फूट असून वाचकांना बसण्यासाठी २६ खुर्च्या, ७ टेबल उपलब्ध आहेत. पंखे, लाईट, इत्यादींची व्यवस्था आहे. वाचकांसाठी मुक्तद्वार प्रवेश पद्धती असून वाचक हवा तो ग्रंथ घेऊ शकतात.

### (७) कर्मचारी वर्ग

सदर ग्रंथालयात ग्रंथपालाचे एकच पद असून त्यांच्याकडे संदर्भसेवा विभागाचा पदभार आहे. एका कर्मचाऱ्याच्या साहाय्याने ते इतर ग्रंथालयीन कामकाजाबरोबरच संदर्भसेवा विभागाचे काम पाहतात.

### (८) संदर्भसेवा विभागाची वैशिष्ट्ये

हिंदी, इंग्रजी, तेलुगू आणि तमिळ भाषेतील अद्ययावत व महत्त्वाच्या संदर्भसाधनांचे विपुल संकलन, चांगली आसन व्यवस्था, प्रसन्न व स्वच्छ विभाग, संदर्भग्रंथ आणि प्रबंधांची वेगळी मांडणी, अभ्यास कर्मचारी वर्ग, व्यक्तिगत मदत व मार्गदर्शन, विद्यार्थी व संशोधक उपयोगी संदर्भग्रंथांचा पुरेसा साठा, इत्यादी वैशिष्ट्ये या विभागाची सांगता येतील.



### (९) अडचणी

(१) संसदेने जरी 'राष्ट्रीय महत्त्व प्राप्त संस्था' म्हणून घोषित केले असले तरी ग्रंथपाल आणि कर्मचाऱ्यांना मिळणारे वेतन अत्यल्प आहे.
(२) अपुरा कर्मचारी वर्ग
(३) प्रकाश व्यवस्थेचे योग्य नियोजन नाही.
(४) संशोधकांना बसण्यासाठी क्युबिकल्सची गरज आहे.
(५) संगणकीकरण झालेले नाही आणि इंटरनेटची सुविधा नाही.
(६) मुद्रित तालिकेचा अभाव

## सारांश

उपलब्ध कर्मचारीवर्गाच्या साहाय्याने उपलब्ध ज्ञानसाधनांचा संदर्भसेवा विभाग अविरत सेवा देण्यासाठी प्रयत्नशील आहे. भविष्यात या विभागाचा विकास होण्याच्या दृष्टीने ग्रंथपालांची काही योजना आहेत. त्या फलद्रूप होण्यासाठी त्यांना आर्थिक मदतीची आवश्यकता आहे. संबंधित विभागाने त्यांना साहाय्य केल्यास संदर्भसेवा विभागाचा कायापालट होण्यास वेळ लागणार नाही.

## संदर्भग्रंथ

(१) राजगोपाल कृष्णय्या, उ., आपटे, भा., शारंगापणि रा., संपा. १९५७, हिन्दी प्रचार का इतिहास (आंध्र) विजयवाडा, आंध्र राष्ट्र दिनी प्रचार संघ
(२) Dubey, C., 1997, Status of B.Ed. degree awarded by Dakshin Bharat Hindi Prachar Sabha, Madras, Sabha Press.
(३) कुलकर्णी, ज.एन., मोरे, वि.एन., देवरेकर, एस. आर., आणि सिद्दी की खा., मार्च-मे २००९, 'स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ ग्रंथालयातील संदर्भसेवा विभाग : एक परिचय, ज्ञानगंगोत्री, वर्ष ९ वे, अंक ४, पृ.क्र. २७-२३.

❑❑❑

# राष्ट्रीय विज्ञान संप्रेषण आणि सूचना संसाधन परिषद

श्री. आशुतोष गोपाळराव जोशी
व्यवस्थापक, ग्रंथागार, महिंद्रा अँड महिंद्रा कं. लि., सातपूर, नाशिक.
E-mail : joshi.ashutosh@mahindra.com

*भारताला २०२० मध्ये जागतिक महासत्ता म्हणून पुढे येण्याची संधी चालून आली आहे. ती सध्याच्या त्याच्या शैक्षणिक, सामाजिक प्रगतीमुळे. अर्थात या सुवर्णसंधीच्या मागे अनेक अदृश्य हात कार्यरत आहेत. कै. डॉ. रंगनाथन, डॉ. माशेलकर, यांच्यासारख्या आपल्या आयुष्यातच दंतकथा बनलेल्या महनीय व्यक्तीच्या बरोबरच त्यांच्या प्रेरणेतून आणि शासकीय व्यवस्थेतून तितक्याच तोलामोलाच्या संस्था जसे की, डीआरटीसी (DRTC)बंगळुरू, इन्सडॉक (INSDOC) किंवा सध्याची (NISCAIR) वगैरे. या संस्थांची कार्यपद्धती, यंत्रणा व इतर माहिती प्रत्येक माहितीशास्त्राच्या विद्यार्थ्याला असणे आवश्यक आहे. या संस्थेचा अधिक परिचय तपशिलाने व्हावा म्हणूनच हा लेखप्रपंच. राष्ट्रीय विज्ञान संप्रेषण आणि सूचना संसाधन परिषद वेबसाईटचा पत्ता - www.niscair.res.in*

## पूर्वरंग

स्वातंत्र्योत्तर काळात भारत ज्ञानमग्न व्हावा या विचाराने, त्या काळच्या नेहरू, देशमुख आदि नेत्यांना भारले होते. त्यामुळेच स्वातंत्र्योत्तर भारतात व्यक्तिविकास, मागे सारत संस्था विषयाची कास धरली गेली. परिणामी, देश बांधणीसाठी देशाच्या संस्थात्मक विकास झाला पाहिजे, तरच जगात देश अग्रेसर राहील हे त्या काळच्या धुरीणांनी ओळखले होते. म्हणूनच देवदेवता, तीर्थक्षेत्रांचा विकास बाजूला ठेवून धरणे, कारखाने, इत्यादीच्या निर्मितीचा ध्यास घेतला गेला आणि हे सर्व सुरळीत पार पडावे, त्याला लागणारे कार्यकौशल्य इथेच उपलब्ध व्हावे म्हणून भारताच्या संस्थात्मक बांधणीचा



तपशीलवार विचार झाला.

डॉ. रंगनाथन यांच्या सारखी अनेक मंडळी उपलब्ध असल्याने व शासनात विज्ञान व तंत्रज्ञानाचे वेगळे खाते असल्यामुळे या गोष्टींचा अतिशय तपशीलवार विचार होऊन अनेक संस्था जन्माला आल्या.

अर्थात या सर्व संस्था एकतर दिल्ली किंवा हैदराबाद येथेच स्थापित झाल्या. बंगळुरू किंवा पुण्याला अशी परंपरा उशिरा किंवा कमीच लाभली. या दोन्ही शहरांनी स्वत:च्या कर्तृत्वावरच जे काही मिळवायचे ते मिळवले. कुणाचा आशीर्वाद घेऊन ही शहरे उभी राहिली नाहीत. आता नाशिकही तीच वाट चालत आहे. तर संस्थात्मक परिचयाच्या या मालिकेत आज आपण निसकेअर किंवा राष्ट्रीय विज्ञान संप्रेषण आणि सूचना संसाधन परिषदे विषयीमाहिती घेऊ.

## उपोद्घात

भारतीय शासनाने, विज्ञान व तंत्रज्ञान खात्यांची विशेष निर्मिती केल्यानंतर, विज्ञान व तंत्रज्ञानाच्या लोकप्रियता वाढीसाठी अनेक उपक्रम हाती घेतले. त्यात विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाबरोबर उच्च शिक्षण मंत्रालय, मानव संसाधन विकास मंत्रालय, याच्या सहकार्याने राष्ट्रीय विज्ञान व औद्योगिक संशोधन परिषदेची (CSIR) स्थापना केली आणि विज्ञानात देश अग्रेसर रहावा म्हणून अनेक योजना सुरू केल्या. जसे की राष्ट्रीय विज्ञान व तंत्रज्ञान माहिती परिषद (NISSAT). ती जवळजवळ २००२ पर्यंत कार्यरत होती.

दरम्यानच्या काळात माहिती तंत्रज्ञानाचा चहुअंगांनी झालेला विकास पाहून त्या तंत्रज्ञानाचा फायदा घेऊन अधिकाधिक जनतेपर्यंत जाण्यासाठी व उपलब्ध तंत्रज्ञानाचा अधिकाधिक फायदा होण्यासाठी 'राष्ट्रीय विज्ञान संप्रेषण आणि सूचना संसाधन परिषद' स्थापन झाली.

भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान खात्याच्या अखत्यारीत असलेल्या विज्ञान व औद्योगिक विकास विभागाने, हा अत्याधुनिक उपक्रम सादर करताना यापूर्वी ग्रंथालयशास्त्राच्या वैज्ञानिक व संस्थात्मक वाढीसाठी ज्या दोन संस्था स्थापन केल्या होत्या. त्यापैकी एकीचे कार्य व योजना या परिषदेत समाविष्ट केले. त्याचा तपशील असा -

ग्रंथालय व माहितीशास्त्राच्या विद्यार्थ्यांना माहिती-तंत्रज्ञानाचे उच्च शिक्षण देऊन त्याचा उपयोग भारताच्या वैज्ञानिक प्रगतीसाठी करावयाचे स्वप्न डॉ. रंगनाथन यांनी पाहिले व १९५७ साली परदेशातून परत आल्यावर, बंगळुरू येथे बंगळुरू डॉक्युमेंटेशन

रिसर्च ट्रेनिंग सेंटर - DRTC ही संस्था दक्षिण भारतात स्थापन झाल्यानंतर उत्तर भारतातही अशाच प्रकारची संस्थात्मक बांधणी INSDOC इन्सडॉक, भारतीय राष्ट्रीय प्रलेख परिषद दिल्ली येथे स्थापन करण्यात आली होती.

या इन्सडॉक म्हणजेच भारतीय राष्ट्रीय प्रलेख परिषद व भारतीय राष्ट्रीय विज्ञान संप्रेषण परिषद (निसकॉम) यांच्या एकत्रीकरणातून निसकेयर - भारतीय राष्ट्रीय विज्ञान संप्रेषण व सूचना संशोधन परिषदेचा जन्म ३० सप्टेंबर २००२ साली झाला.

भारताने उदारीकरणाची नीती अंगीकारल्यानंतर ग्रंथालयशास्त्राच्या उच्च शिक्षणासाठी जी नवी झेप घेतली त्याचे हे फलित होय.

निस्कॉम व इन्सडॉक या दोन्ही संस्था भारत सरकारच्या विज्ञान व औद्योगिक संशोधन परिषदेच्या महत्वपूर्ण घटक होत्या व त्या दोन्ही संस्था वैज्ञानिक व तंत्रज्ञानाच्या माहितीचे प्रलेखन व प्रसारण करण्यात अग्रेसर होत्या.

निस्कॉम म्हणजेच भारतीय राष्ट्रीय विज्ञान संप्रेषण परिषद गेल्या सहा दशकांपासून कार्यरत होती. सुरुवातीला भारत सरकारच्या विज्ञान व औद्योगिक संशोधन परिषदेच्या प्रकाशन विभागाचे दोन वेगवेगळे विभाग म्हणून कार्यरत असणारी ही दोन प्रकाशन कार्यालये, १९९६ मध्ये, प्रकाशन व माहिती संचालनालय म्हणून अस्तित्वात आली.

काळाच्या ओघात निस्कॉमचा चहुअंगानी विस्तार झाला. त्यांनी अनेक कार्य प्रकल्पांना प्रारंभ करून अनेकानेक माहिती सेवाचा प्रारंभ केला. त्यात अनेक संशोधन व लोकप्रिय विज्ञान प्रकाशने, ज्ञानकोशात्मक प्रकाशने, पुस्तके, प्रलेख व इतर अनेक माहिती सेवांचा समावेश होतो. यामुळेच विज्ञान व संशोधन क्षेत्रातल्या प्रगतीची माहिती संपूर्ण भारतातल्या वैज्ञानिकाना, संशोधकांना विद्यार्थ्यांना, उद्योजकांना उद्योगपतींना, कृषितंत्रज्ञाना आणि नियोजन आराखकांना नित्य मिळत राहिला. सर्वसामान्य माणसांपर्यंत ही ती नित्यनियमाने पोहोचत होतीच. तर असा हा निस्कॉमचा पसार मोठा होता.

इकडे आपल्या अधिक परिचयाची संस्था म्हणजे इन्सडॉक तीही काही कमी नव्हती. मागे सांगितल्याप्रमाणे १९५१ साली स्थापन झालेली ही संस्था विज्ञान व तंत्रज्ञान माहितीच्या व प्रलेखनाच्या अनेकविध सेवा भारतीयांना देत होती. तिच्या सारांश व सूचीकरण सेवांचा विशेष बोलबाला होता.

विज्ञान व तंत्रज्ञानाच्या दृष्टीने भारताला आवश्यक अशा माहितीच्या साठ्यांची आरेखन व निर्मिती, भाषांतर व इतर प्रलेखन सेवा, ग्रंथालय संगणकीकरण व स्वयंचलीकरण हा इन्सडॉकच्या कार्याचा गाभा होता. तर आंतरराष्ट्रीय माहितीच्या स्रोतांना भारतातून वैज्ञानिकासाठी सहज उपलब्ध करून देणे, त्यासाठी लागणारी



मानवसंसाधन निर्मिती व अत्याधुनिक ग्रंथालय उभारणीसाठी, सल्ला व सेवा देणे या आणखी काही सेवा इन्सडॉक देत असे.

राष्ट्रीय विज्ञान ग्रंथालय व दक्षिण आशियाई देशसंघटनेच्या माहिती साठ्यांचे यजमान पदही ओघानेच इन्सडॉककडे आले होते.

आता ३० सप्टेंबर २००२ पासून, जशी निसकेयर अस्तित्वात आली तसे या दोनही संघटनांचे बहुअंगी बहुढंगी कार्य एकत्र येऊन एका नवीन संघटनेचा / संस्थेचा उदय झाला. जी माहिती तंत्रज्ञानाच्या आधारावर अवघ्या भारतीय समाजाला मार्गदर्शन व प्रेरणा देऊ शकेल तसेच अत्याधुनिक माहिती व तंत्रज्ञानाची पातळी गाठून अतिशय प्रभावीपणे विज्ञान संप्रेषणातल्या व विज्ञान व तंत्रज्ञान माहिती सेवेच्या अनेकविध प्रकल्पना ती स्थान देईल. पण तरीसुद्धा सर्वमान्यपणे, निसकेयर विज्ञान व तंत्रज्ञानक्षेत्रातील माहिती गोळा करणे, साठवणे आणि ही माहिती सुयोग्यपणे प्रसारित, प्रकाशित करण्याची जबाबदारी समर्थपणे पेलेल नव्हे तर हाच निसकेयरच्या कार्याचा गाभा असेल.

हे करताना, पारंपरिक व आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य मेळ घालून समाजाच्या जास्तीत जास्त तळापर्यंत जाण्याचे ध्येय निसकेयरने ठेवले आहे.

## निसकेयरची कार्यक्रम व सेवा

निसकेयरचा महत्त्वाचा कार्यक्रम म्हणजे उपलब्ध माहितीचे साठे नियमित, परिपूर्ण व अद्ययावत ठेवणे. पण त्याहीपेक्षा महत्त्वपूर्ण व अंगीकृत कार्य म्हणजे विज्ञान संप्रेषण, प्रसारण. विज्ञान व तंत्रज्ञान माहिती व्यवस्थापन पद्धती व सेवा देण्यासाठी अत्याधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा वापर व त्याचे देशात उपायोजन व समायोजन करण्याची जबाबदारी ही निसकेयर महत्त्वाची सेवा असेल.

प्रामुख्याने विज्ञान व तंत्रज्ञानाच्या संदर्भातील माहिती नियमित अद्ययावत व परिपूर्ण करून त्याच्या उपयोग जनसामान्यासाठी करण्याचे कार्य हे निसकेयरचे अंगीकृत कार्य आहे. यासाठी निसकेयर साहित्य संशोधनापासून विज्ञान व तंत्रज्ञान प्रकाशनांची संपूर्ण निर्मिती आणि छपाईची जबादारी निसकेयरने स्वत:वर घेतली आहे. याशिवाय इन्सडॉक यापूर्वी चालवीत असलेला ग्रंथालयशास्त्रातील प्रतिष्ठेचा प्रशिक्षण अभ्यासक्रम आता निसकेयरचा मानवसंसाधन विकासाचा प्रशिक्षण कार्यक्रम म्हणून कार्यरत होणार आहे. त्याचा उपयोग ग्रंथालय व माहितीशास्त्र, प्रलेखन शास्त्र, विज्ञान संप्रेषण आणि या क्षेत्रांतील अनेक आस्थांच्या पुनरुज्जीवनाकरिता होईल.

इतर शासकीय व औद्योगिक आस्थापनासाठी निसकेयर संपूर्ण प्रकल्पांची जबाबदारी घेणार आहे. यात माहितीच्या साठ्यांचे आरेखन व निर्मिती, त्यांचे

संगणकीकरण, स्वयंचलीकरण, ग्रंथालयांचे आधुनिकीकरण, विविध ग्रंथांचे संपादन, अनेक लोक नियतकालिकांचे प्रकाशन, संम्मेलन अहवालाचे व वार्षिक अहवालाचे प्रकाशन, इत्यादी गोष्टींचा समावेश आहे.

**निसकेयरच्या इतर सेवा पुढीलप्रमाणे -**

(१) एकस्व (पेंटट) आरेखन व कच्चा आराखडा यांची निर्मिती.
(२) एकस्व माहिती साठा व सेवा व प्रलेखन सेवा व माहितीसेवा
(३) एकस्व प्राथमिक माहिती संकलन
(४) एकस्व संपादन
(५) माहिती मुद्रण व संपादन आणि प्रसारण
(६) भाषांतर सेवा
(७) प्रशिक्षण व भेट योजना
(८) ग्रंथ प्रदर्शने
(९) सल्लागार सेवा
(१०) बिब्लियॉमॅट्रिक सेवा

याशिवाय राष्ट्रीय विज्ञान ग्रंथालय सेवेच्या विद्यमाने, निसकेयर पुढील सेवा संचालित करते.

(१) सारांश, प्रतिलिपी व घटक निरीक्षण सेवा
(२) माहिती प्रतिलिपी पुरवठा सेवा
(३) साहित्य संशोधन सेवा
(४) वाचक सेवा
(५) प्रतिलिपी सेवा
(६) आंतर ग्रंथालय देवघेव सेवा
(७) आंतरराष्ट्रीय मानक नियतकालिक क्रमांक
(८) इ-जर्नल्स सेवा
(९) संपादन

निसकेयरच्या संपादकीय विभागात या क्षेत्रातले अतिविशिष्ट उच्च विद्याविभूषित संपादक उपलब्ध असून ते त्याच्या संपादकीय सेवा, संमेलन अहवाल, विद्वत्तापूर्ण पुस्तके, लोकप्रिय वैज्ञानिक पुस्तके यासाठी तासिका पद्धतीने उपलब्ध आहेत. संपादन साहाय्यात कच्चा खर्डा तयार करून त्याला शैलीदार पद्धतीने सजवणे ते मुद्रणप्रत तयार करून त्याच्या नियोजित संचालकांकडे सुपूर्त करणे. येथपर्यंत निसकेयर सेवा पुरवते. यासाठी



असणारे दर आकर्षक असून ग्राहकाच्या गरजेनुसार ते बदलत असतात.

निसकेयर केवळ स्वत:ची नियतकालिके, पुस्तके संपादित व प्रकाशित करीत नसून ते याच पद्धतीची सर्व राष्ट्रीय विज्ञान व औद्योगिक संशोधन परिषदेची संशोधन पत्रिकेसह कामे करतात व करून देतात.

CSIR च्या बहुतेक घटक संस्था जसे की, DRDO, DST, DSIR, INSA, ICAR, IIT-DELHI, CAG, IMD, DISM, NBPGR इत्यादी सर्व नामांकित राष्ट्रीय संशोधन संस्थाची गरज भागवण्याचे महत्त्वपूर्ण काम ते करतात.

हल्ली त्यांनी रॅनबॅलसी प्रयोगशालेचेही काम स्वीकारून पूर्ण केले आहे. किरकोळ डाटा एंट्री पासून ते उच्च दर्जाच्या आरेखन, निर्मिती व मुद्रणाची कामे निसकेयर अतिकुशलतेने करते.

ग्राफिक डिझाईनिंग, डेस्कटॉप पब्लिशिंग या नव्या जमान्यातल्या संप्रेषण सेवा निसकेयर सहजतेने पुरवते.

आंतरराष्ट्रीय मानक नियतकालिक क्रमांक ही एक प्रतिष्ठेची जागतिक सेवा सर्व ग्रंथालये, त्यांचे पुरवठादार, संयुक्त सूचीकरणकार, प्रकाशक, बार कोड पद्धती निर्देशक या साऱ्यांना आवश्यक असते. या सेवेचा पूर्वभार, भारतापुरता ''निसकेयर'' वर सोपविलेला आहे. या संस्थेचे मुख्य कार्यालय पॅरिसमध्ये असून भारतीय राष्ट्रीय केंद्राचा मान निसकेयरला मिळाला असून हा बहूमान निसकेयरच्या शिरपेचाला मानाचा तुरा आहे.

## बिब्लियॉमॅट्रिक सेवा

या सेवा संशोधन क्षेत्रातील नवनवीन क्षेत्राचा उदय, वाढ व प्रसार यांबाबत माहिती देतात. तसेच प्रभावी लेखक, विशेष प्रावीण्य क्षेत्रे याबाबत अधिक माहिती प्रदान करतात. या सेवा विशेष करून विभाग प्रमुखांना व संशोधन नियोजनकारांना, वैज्ञानिकांना व नीतिनियम निर्मात्यांना अतिशय महत्त्वाच्या व उपयोगी असतात. या सेवेची विश्वासार्हता निसकेयरने चांगलीच जपली आहे.

याशिवाय साहित्य संशोधन आणि विदेशी भाषांतर सेवा या महत्त्वाच्या सेवा निसकेयर देते. ग्राहकांच्या गरजेनुसार विविध वैज्ञानिक क्षेत्रातील ग्रंथसूची सेवा व भाषांतर सेवा हाही एक निसकेयरच्या सेवांचा महत्त्वाचा भाग आहे.

परदेशी भाषातून भारतीय भाषांत केल्या जाणाऱ्या भाषांतराप्रमाणेच आजकाल एतदेशीय भाषांतून परकीय भाषांत भाषांतराचा ओघ व गरज वाढत चालली आहे. तर

याही क्षेत्रात निसकेयर आग्रेसर आहे. जपान, जर्मनी, रशिया, फ्रेंच, स्पॅनिश, पोर्तुगीज, हंगेरी, स्वीडन, रुमेनिया, नॉर्वे, इत्यादी देश व भाषांशी निसकेयर अवगत असून उपरिनिर्दिष्ट भाषातून इंग्रजीत व विरुद्ध दिशेने भाषांतरांची असलेली सोय हा निसकेयरचा विशेष वर्चस्वाचा भाग आहे. या क्षेत्रातले निसकेयरचे प्रकल्प पुढीलप्रमाणे -

(१) प्रथम भारत-अमेरिका कार्यशाळा अहवाल विषय-निर्विष रसायनशास्त्र

(२) भारतीय संपदा

(३) भारतीय एकस्व कोश

(४) भारतीय औषधी वनस्पती कोश

(५) भारतीय औषधी वनस्पती प्रलेख

## निसकेयरचे नुकतेच पूर्ण झालेले प्रकल्प

### (१) प्राथमिक निसकेयर नियतकालिक मुक्तद्वार प्रणाली

मुक्तद्वार संगणक प्रणालीच्या साहाय्याने नुकतीच सर्व प्राथमिक नियतकालिके सर्व सभासद ग्रंथालयांना संगणकावर उपलब्ध करून देण्याचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम निसकेयर राबवला असून त्याला वाचकसंस्थांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. जवळजवळ १७ नियतकालिके या पत्त्यावर (http:\\nopr.niscair.res.in) उपलब्ध असून २००२ पासून पुढे प्रसिद्ध झालेले नियतकालिकांचे सर्व अंक संगणकावर मागे दिलेले पत्त्यावर उपलब्ध आहेत.

विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात या प्रकल्पाला खूप मागणी असून त्याची लोकप्रियता वाढतच आहे.

### (२) राष्ट्रीय ज्ञानस्रोत सहयोजना (NKPC)

पूर्वी जी CSIR ची e-journals सहयोजना उपलब्ध होती ती आता वरील नावाने उपलब्ध असून सर्व राष्ट्रीय वैज्ञानिकांना त्यांच्या संगणकावर त्वरित उपलब्ध झालेली आहे. या योजनेसाठी ब्लॅकवेल, जॉन वायली, स्प्रिंगर व इतर जागतिक प्रकाशकांचे सहकार्य उपलब्ध झाले असून ही योजना निसकेयरची महत्त्वाची योजना म्हणून उपलब्ध आहे.

❑❑❑



# ग्रंथालय सहकाराची कार्यक्षेत्रे

सी. यु. के. राजोबा, ग्रंथपाल
शि. म. डॉ. बापूजी साळुंखे कॉलेज, मिरज

भारतीय ग्रंथालय संस्थेने महात्मा गांधींचे एक वचन शिरोधार्य मानले आहे. म्हणूनच ते कोलकाता येथील राष्ट्रीय ग्रंथालयांच्या प्रवेशद्वारावर सुवर्णाक्षरात कोरले आहे. मूळ इंग्रजीत असणाऱ्या या वचनाचा मराठीतील भावार्थ असा आहे की,

''माझ्या घराभोवती तटबंदी नसावी, खिडक्या नेहमी खुल्या असाव्यात, साऱ्या भूमंडळातील सुगंध मुक्तपणे या परिसरात मिळावा. मात्र या सुगंधी वाऱ्याने मी उडून जाणार नाही याची दक्षता मी घेऊन!''

ग्रंथालयाच्या सामाजिक अस्तित्वास व कार्यास हे विधान चपखलपणे लागू होते. ग्रंथालय म्हणजे 'एक वास्तू' नसून सर्व ज्ञान, विज्ञान, धर्म, विचार, पंथ, कल्पना, इतिहास यांची जपणूक करणारी व मानवी सहसंबंधाचे दृढीकरण करणारी 'एक संस्था' आहे. 'वाचक' ही नामाधि घेऊन ग्रंथालयात प्रवेश करणाऱ्यांसाठी कोणतीही तटबंदी असू नये. सर्व ज्ञानसाधनांचा व ज्ञानाच्या आदान-प्रदानाचा मुक्तपणे वावर व्हावा. मात्र ग्रंथालयाच्या मूळ अस्तित्वाला बाधा न आणता ज्ञानाचा सुगंध मुक्तपणे वाहत ठेवण्याचे कार्य मी करीन, असे अभिवचन हृदयाशी बागळून ग्रंथालयीन सेवकांनी काम केले तर व्यावसायिक कार्यातून सामाजिक कार्य केल्याचे समाधान मिळू शकेल. तसेच 'ग्रंथालय सेवा' या शब्दाला खरा अर्थ प्राप्त होईल. ग्रंथालय सेवकांनी परस्पर सहकार्याने विविध प्रकारच्या ग्रंथालय उपक्रमांचे व कार्यक्रमांचे आयोजन करणे व 'विना सहकार नाही उद्धार' या तत्त्वाने सामाजिक विकास साधण्यासाठी परस्परांना सहकार्य करणे म्हणजे ग्रंथालय सहकार होय.

## ग्रंथालय सहकाराचा इतिहास

ग्रंथालय सहकार ही संकल्पना फार प्राचीन आहे. इ.स. २०० साली अलेक्झांड्रिया ग्रंथालयाने परगॅमन ग्रंथालयाशी नाते जोडून सहकाराचा पाया घातला. इ.स. १९३१

मध्ये यु.के.तील राष्ट्रीय मध्यवर्ती ग्रंथालय हे आंतरग्रंथालयीन देवघेवीचे केंद्र बनले होते. आंतरराष्ट्रीय सहकाराची सुरुवात अमेरिकेत इ.स. १९३९ मध्ये झाली. जागतिक स्तरावर ग्रंथालय सहकाराची आवश्यकता व शक्यतेबाबत औपचारिक प्रयत्न इ.स. १९५० च्या सुमारास सुरू झाले. सहकारी तत्त्वावर ग्रंथालयीन कार्ये व कर्तव्ये सक्षमतेने करता येतील याची प्रखर जाणीव इ.स. १९७० च्या सुमारास झाली.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात अमेरिकत इतर सर्वच क्षेत्रांप्रमाणे ग्रंथालयांनादेखील आर्थिक, तसेच भौतिक साधने व मनुष्यबळाची कमतरता भासू लागली. त्याच वेळी सामाजिक व भौतिक विकास साधण्यासाठी नवीन संशोधन व प्रगत माहितीसेवेची गरज भासू लागली. त्यावेळी प्रिन्सेटन विद्यापीठाच्या ग्रंथपालांनी सुचविले की, ग्रंथालयांनी परस्परांशी स्पर्धा न करता आपल्याकडील साधनांचा उपयोग सर्वांसाठी सहकार तत्त्वावर करावा. त्याचे मूर्त रूप म्हणजे आंतरराष्ट्रीय स्तरावरील ग्रंथालय सहकाराची सुरुवात इ.स. १९४२ मध्ये Framington Plan च्या रूपाने झाली. याचा मुख्य हेतू अमेरिकेतील संशोधन ग्रंथालयांना जगात कोठेही प्रकाशित होणारा ग्रंथ मिळवून देणे हा होता. त्याचे मुख्य कार्यालय हार्वड कॉलेजच्या ग्रंथालयात होते. या ग्रंथालयाने नियुक्त केलेले परदेशस्थ एजंट तेथील नवीन ग्रंथ खरेदी करून सहभागी ग्रंथालयांना पाठवीत असत. इ.स. १९५३ च्या कोरियन युद्धानंतर युरोपमधील ग्रंथ मिळेनासे झाले. त्यामुळे सहकारी ग्रंथखरेदीचे कार्य हळूहळू बंद होऊन इ.स. १९७२ ला पूर्णपणे बंद झाले.

एकविसाव्या शतकातील तंत्रज्ञान व सामाजिक बदलाचा परिणाम ग्रंथालयीन कार्यावर झाला. अमेरिकेतील विद्यापीठ ग्रंथालयाची संघटना AMICAL (American International Consortium of Academic Libraries) ची स्थापना इ.स. २००४ साली झाली. त्यांनी RESPDND (Resource Sharing Project for Network Discovery) या पायलट प्रोजेक्टच्या माध्यमातून Web based Service देण्यात सुरुवात केली. भारतात संपर्क व माहिती संप्रेषण विभागातर्फे ग्रंथालय भागीदारी कार्यपद्धती सुरू केली आहे. त्यांचे मुख्य उद्देश भारतात अंकीय व इ-ग्रंथालय निर्माण करणे, ग्रंथालयातील साधनांचा सहभागी उपयोग करणे, वाचकांना इ-सुविधा देणे, शासकीय ग्रंथालय जाळे निर्माण करणे हे आहेत. त्यासाठी इ-ग्रंथालय हे सॉफ्टवेअर ग्रंथालयासाठी व News NIC हे सॉफ्टवेअर वर्तमानपत्राच्या कात्रण संग्रहासाठी विकसित केले आहे. तसेच इ-ग्रंथालय हे सॉफ्टवेअर सर्व ग्रंथालयांना विनामूल्य देण्यात येत आहे. याशिवाय सहभागी ग्रंथालयाची संयुक्त तालिका तसेच ग्रंथालय सेवकांना ई-ग्रंथालय आज्ञावली प्रशिक्षण हे उपक्रमही चालू आहेत.



## ग्रंथालय सहकार पद्धत

आधुनिक काळात 'एकाकी व स्वतंत्र ग्रंथालय' ही संकल्पना रद्द होऊन ग्रंथालयीन साधनांचा सहभागी उपयोग (Resource Sharing) ग्रंथालय जाळे (Network), आंतर ग्रंथालय देवघेव (Interlibrary loan), भागीदारी तत्त्व (Consortium), इत्यादी कल्पना व उपक्रम प्रत्यक्षात आले. हे उपक्रम ग्रंथालय संस्थेत सहकार तत्त्व रुजविणारे आहेत. दोन किंवा त्यापेक्षा अधिक ग्रंथालये परस्पर सहकार्याने समान उद्देशाच्या पूर्ततेसाठी एकत्र आली तर ग्रंथालय जाळे तयार होते. त्यातील सहभागी ग्रंथालयांचे सर्व साधने व वाचन साहित्य सर्व वाचकांना खुले करून देणे म्हणजे साधनसंपत्तीचा सहभागी उपयोग होय. या वाचन साहित्याची, माहितीची देवघेव दुसऱ्या ग्रंथालय वाचकांसाठी करणे म्हणजे आंतरग्रंथालय देवघेव होय. भागीदारी तत्त्वावर ग्रंथालयीन कामकाज करण्यासाठी सर्व सहभागी ग्रंथालयाने आपली जबाबदारी व सहकार्य देणे म्हणजे ग्रंथालय भागीदारी होय. ग्रंथालय सहकार ही मूलतः सामाजिक व व्यावसायिक संकल्पना आहे. दोन संस्था एकच व्यावसायिक उद्दिष्ट साध्य करण्यासाठी एकत्र येतात, साधनसंपत्तीची गुंतवणूक करतात व त्यातील फायदा वाटून घेतात. साधनसंपत्ती म्हणजे वस्तू, पैसा, व्यक्ती, कृती, तंत्र किंवा साहित्य की ज्यामुळे व्यक्तीच्या गरजा पूर्ण होतात. ग्रंथालयातील वाचनसाहित्य, तेथील साहित्य, कार्यपद्धती, सेवक व आर्थिक घटक म्हणजे ग्रंथालयीन साधनसंपत्ती होत. या साधनसंपत्तीच्या वापरामुळे व्यक्तीचा पर्यायाने समाजाचा बौद्धिक, सामाजिक व आर्थिक विकास होतो. या साधनसंपत्तीचे सहकारी तत्त्वाने वाटप किंवा देवघेव करणे म्हणजे सामाजिक मालकी मान्य करणे होय. म्हणजेच आपल्या तसेच इतर सहभागी ग्रंथालयांतील सर्व प्रकारची साधनसंपत्ती एका संस्थेच्या मालकीची नसून ती सर्वांच्या मालकीची आहे, हे तत्त्वतः मान्य करावयास हवे. तसेच आपल्या जवळील साधने दुसऱ्यास उपलब्ध करून देण्याची मानसिकता हवी. परस्पर सहकार्याची भावना व त्यासाठी केलेले कार्य म्हणजेच साधनांचा सहभागी उपयोग होय.

It is a mode of action by which the library functions are shared in a common system by two or more libraries.

## ग्रंथालय सहकार्याची गरज

शैक्षणिक ग्रंथालयापुढे आज आव्हानात्मक परिस्थिती उभी आहे. ग्रंथालयास मिळणारा निधी, प्रशिक्षित सेवक, पुरेशी जागा, आवश्यक तंत्रज्ञान व साधने यांची कमतरता भासत आहे. ॲलन कॅन्ट म्हणतात, 'आपल्या ग्रंथालयात सर्व साहित्य खरेदी

करण्यासाठी जास्त पैसा उपलब्ध करून देणे हा यावर उपाय होऊ शकत नाही. त्यासाठी साधनांच्या सहभागी उपयोगासाठी पैशाची सोय करून अन्य ग्रंथालयांशी देवघेव करावी.' सामाजिक विकास साधण्यासाठी ग्रंथालयानी सहकार तत्त्वावर परस्परांच्या साधनसंपत्तीचे वाटप करणे आवश्यक आहे. तसेच कोणतेही ग्रंथालय त्यांच्या वाचकांसाठी परिपूर्ण असू शकत नाही. म्हणूनच प्रत्येक ग्रंथालयास दुसऱ्या ग्रंथालयाची मदत घ्यावी लागते. प्रत्येक ग्रंथालयाची आर्थिक क्षमता, प्रशिक्षित सेवक व वाचकांच्या गरजा भिन्न-भिन्न असतात. वाचकांच्या अगणित गरजा भागविण्यासाठी परस्पर सहकार्य व एका नियोजनबद्ध कार्यप्रणालीची गरज भासते. त्यामुळे आपल्या वाचकांची मागणी पूर्ण होते, या सर्व प्रकारच्या साहित्याची खरेदी करावी लागत नाही व अन्य कामे समान तत्त्वाने वाटून घेतली जात असल्यामुळे कामाचा ताण काही प्रमाणात हलका होतो. सामाजिक संबंध प्रस्थापित होतात. सहकार्याचे सहसंबंध निर्माण होतात. लोटका यांच्या सिद्धांताप्रमाणे कमीत कमी परिश्रमात जास्तीत जास्त उद्देश सफल होतात.

## ग्रंथालय सहकाराचा उद्देश

ग्रंथालय सहकार तत्त्वावरील कार्यप्रणालीचा मुख्य उद्देश जास्तीत जास्त वाचकांना जास्तीत जास्त माहिती सेवा कमीत कमी किमतीत-वेळेत व जास्तीत जास्त क्षमतेने उपलब्ध करून देणे हा होय. या मुख्य हेतूसाठी खालील छोटे उद्देश पूर्ण करावे लागतात.

(१) सहभागी ग्रंथालयातील सर्व साधनसंपत्तीचा उपयोग सर्व वाचकांसाठी अधिक कार्यक्षमतेने करणे.
(२) ग्रंथालयाच्या संपूर्ण कार्यपद्धतीची प्रभावी अंमलबजावणी परस्पर सहकार्यातून करणे.
(३) सहभागी ग्रंथालयाच्या सर्व वाचकांच्या सर्व प्रकारच्या वाचनविषयक व माहितीविषयक गरजा पूर्ण करणे.
(४) वाचन साहित्य प्राप्तीचे मार्ग, पद्धती, देवघेव, संस्करण, संग्रहण, इत्यादी कार्यातील द्विरुक्ती टाळणे.
(५) ग्रंथालयीन कार्यात समन्वय साधने.

## सहकाराचे कार्यक्षेत्र

ग्रंथालयातील सहकारातून ग्रंथालयीन साधनांचा सहभागी उपयोग, ग्रंथालय जाळे, आंतर ग्रंथालय देवघेव, भागीदारी कार्यपद्धतीने उपलब्ध साधनसंपत्तीचा पुरेपूर वापर खालील कार्यासाठी करता येतो.



### सहकारी तत्त्वावर

(१) सर्व वाचकांना ग्रंथालय सेवा देणे.
(२) वाचनसाहित्य खरेदी करणे.
(३) वाचनसाहित्याचे संस्करण करणे.
(४) वाचनसाहित्याचे संग्रहण करणे.
(५) मनुष्यबळ, आर्थिक व तांत्रिक साधनांचे केंद्रीकरण करणे.
(६) माहिती व माहितीसाधनांचा संचय करणे.
(७) ग्रंथालय संलग्नीकरण करणे.
(८) ग्रंथालय निधी निर्माण करणे.

सहकारी पद्धतीचे उत्तम उदाहरण म्हणजे मलेशियातील वाचक प्रबोधन होय. कौलांलमपूर येथील सर्व ग्रंथालयांतील सेवकांनी सामूहिकपणे वाचक प्रबोधनाचा उपक्रम चालू केला. त्यासाठी ते नागरिकांच्या घरी जाऊन वाचन साहित्याचे उत्कृष्ट नमुने दाखवून वाचनाचे महत्त्व सांगतात. याचा परिणाम असा झाला की इ.स. २००५ मध्ये वर्षभरात किमान पाच पुस्तके वाचणारे नागरिक इ.स. २००९ पर्यंत १२ पुस्तके वाचू लागली व हे प्रबोधन अद्यापि चालूच आहे. भारतीय राष्ट्रीय कृषी ग्रंथालय व माहिती केंद्रात सहकारी तत्त्वावर Inter library loan, Union catalogue, Free distribution unwanted documents, Photocopy service, Sharing in retrieval services, Common directory of duplicate and of equipments, Sharing specialist services, Professional training, co-operative procurement and processing, इत्यादी कार्य यशस्वीपणे होत आहेत.

## सहकाराचे नियोजन

प्रत्येक सहभागी ग्रंथालयाने प्रथम आपल्याला काय हवे आहे व आपण काय देऊ शकतो याचा विचार करावा. सद्यःस्थितीतील स्वतःच्या ग्रंथालयातील साधनसंपत्ती, वाचकांच्या गरजा, दिल्या जाणाऱ्या सेवा व ग्रंथालय कार्यपद्धती यांचा सखोल अभ्यास करून तेथील जमेच्या बाजू व उणिवांची नोंद करावी. त्यानंतर उपरोक्त कार्यक्षेत्रांपकी कोणते कार्यक्षेत्र सहकारासाठी योग्य आहे, त्यांची निवड करावी. परस्पर सहकारातील स्वतःची भूमिका व स्थान निश्चित करावे. आपल्या ग्रंथसंग्रह विकासाचे दीर्घकालीन धोरण लिखित स्वरूपात तयार करावे. वाचकांच्या गरजांचे व त्यांच्या पूर्ततेचे मार्ग शोधावेत. एकूणच प्रत्येक घटक ग्रंथालयाने स्वतःच्या कार्यपद्धतीचा व गरजांचा सखोल

अभ्यास करावा. त्यानंतर सर्व घटक ग्रंथालयांनी एकत्रित सहकारी पद्धतीच्या एका कार्यक्षेत्राची निवड करून-

(१) उद्दिष्टे निश्‍चित करणे.

(२) एकापेक्षा अधिक कार्यपद्धतीचा मसुदा तयार करणे.

(३) सर्वानुमते एका कार्यपद्धतीची निवड करणे.

(४) त्या कार्यपद्धतीचा अवलंब करणे, इत्यादी पायऱ्यांचा लेखी करारनामा केला जावा.

आवश्यक गोष्टी -

यासाठी सहभागी ग्रंथालयांनी खालील घटकांची पूर्तता कणे आवश्यक आहे.

(१) वाचनसाहित्याचा व माहितीस्रोताचा डेटाबेस

(२) सहभागी उपयोग करण्याची मानसिकता

(३) उपभोक्त्यांची मागणी व गरजांचा अभ्यास

(४) कायमस्वरूपी कार्यान्वित राहणारी योजना

(५) नेटवर्कसाठी आधुनिक साधने व तंत्रे

(५) कार्यक्षम व प्रशिक्षित सेवक

## कार्यपद्धती

सहभागी ग्रंथालयांनी परस्पर सहकार्यासाठी निवड केलेल्या कार्याची जबाबदारी स्वीकारावी. उदाहरणार्थ, सहकारी तत्त्वावर ग्रंथ व नियतकालिक खरेदी हे कार्यक्षेत्र निवडले असेल तर प्रत्येक सहभागी घटकात खालीलप्रमणे जबाबदारी उचलावी.

(१) वाचकांच्या गरजांच्या प्राधान्यक्रमानुसार प्राथमिक, द्वितीय व तृतीय स्तरावरील विषय, ग्रंथ व नियतकालिकांची यादी करावी.

(२) स्वतःच्या ग्रंथालयासाठी प्राथमिक व द्वितीय स्तरावरील साहित्याची खरेदी करावी.

(३) तृतीय स्तरावरील जे विषय, त्यांचे ग्रंथ व नियतकालिके अन्य ग्रंथालयात प्राथमिक किंवा द्वितीय स्वरूपाचे असतील तर त्यांची खरेदी करू नये.

(४) अशा प्रकारे सर्वांच्या तृतीय स्तरावरील शिल्लक राहिलेले विषय, ग्रंथ व नियतकालिके सर्वांनी समान वाटून घ्यावेत व त्यांची खरेदी करावी.

याचप्रमाणे 'ग्रंथसंग्रहन' हे कार्यक्षेत्र स्वीकारले असेल तर एका मध्यवर्ती ग्रंथालयाची व तेथे स्वतंत्र कक्षाची निवड करावी. अनेक ग्रंथालयांत काही प्रलेखाचा उपयोग फार कमी होतो. जागेची समस्या सोडविण्यासाठी सहभागी ग्रंथालयातील उपयोगात नसलेले संदर्भ पुस्तके, नियतकालिकांचे बांधीव अंक, दुर्मिळ पुस्तके, हस्तलिखिते, अहवाल,



सरकारी प्रकाशने ही सर्व मध्यवर्ती दालनात एकत्रित ठेवावीत. या वाचनसाहित्याची देवघेव न करता फक्त संदर्भासाठी उपलब्ध करून घ्यावेत. हे मध्यवर्ती दालन सर्वांसाठी खुले ठेवावे. तेथील कामकाज सर्वांनी क्रमाक्रमाने पाहावे. प्रत्येक ग्रंथालयात सामायिक तालिका व मध्यवर्ती ग्रंथालय तालिका ठेवावी. याच पद्धतीने अन्य कार्यक्षेत्रातदेखील सहकारी तत्त्वावर कार्य करता येईल. त्यापैकी एक महत्त्वाचे कार्यक्षेत्र म्हणजे आंतरग्रंथालय देवघेव सेवा होय.

## आंतरग्रंथालयीन देवघेव सेवा

ग्रंथालय सहकार तत्त्वाचा मुख्य हेतू सहभागी ग्रंथालयाच्या वाचकांना हवा असणारा ग्रंथ, संदर्भ किंवा माहिती उपलब्ध करून देणे हा आहे. सर्वच ग्रंथालयांतून सर्व बहिस्थ वाचकांना माहिती सेवा किंवा संदर्भ सेवा खुली असते. तथापि घरी वाचनासाठी देवघेव करता येत नाही, त्यामुळे प्रत्येक ग्रंथालयातून दुसऱ्या (बहिस्थ) वाचकांना किंवा ग्रंथालयांना देवघेव करणे म्हणजे आंतरग्रंथालय देवघेव होय. आपल्या वाचकाला हवा असणारा ग्रंथ कोणत्या ग्रंथालयात उपलब्ध आहे याचा शोध घेऊन उसनवारीने तो ग्रंथ आपल्या ग्रंथालयात आणणे, आपल्या वाचकाला देणे व त्यांचे काम होताच परत करणे म्हणजे आंतरग्रंथालय देवघेव होय. त्यासाठी एक समान नियमावली तयार करणे, देवघेवी योग्य ग्रंथांची यादी करणे, ग्रंथ देवघेवीची कार्यपद्धती उदाहरणार्थ, फॉर्म, मुदत, पोस्टेज, संपर्क, इत्यादी ठरविणे, ग्रंथपरतीची हमी किंवा नुकसानभरपाई, तसेच अन्य खर्च, इत्यादींचे करारनामे तयार करणे या सर्व नियमांचे पालन घटक ग्रंथालयाने करावयास हवे.

आंतरग्रंथालय देवघेव सेवा ही पारंपरिक व पारखून घेतलेली पद्धत आहे. ऑनलाईन सुविधेमुळे व नेटवर्कमुळे सहभागी ग्रंथालयांना ग्रंथशोध घेता येतो. तरीही देवघेव करताना दोन ग्रंथालयांतील अंतर, दळणवळणाचा खर्च व वेळ, सेवकांची कमतरता, इत्यादींमुळे गरजू वाचकाला ग्रंथ उपलब्ध करून देण्यास विलंब होतो. यामध्ये योग्यवेळी ग्रंथपरतीची हमी व ग्रंथांची सुरक्षितता याबाबत साशंकता राहते.

## आंतरग्रंथालय वाचक सुविधा

आंतरग्रंथालय देवघेव पद्धतीमध्ये वाचकांपेक्षा ग्रंथालयाची जबाबदारी जास्त आहे. त्यामुळे ज्याला गरज आहे, त्या वाचकालाच दुसऱ्या ग्रंथालयाची सेवा उपलब्ध करून दिली तर ते अधिक सोयीचे होईल. त्यासाठी सर्व ग्रंथालयांच्या वाचकांसाठी समान असे

आंतर-ग्रंथालय सभासद कार्ड छापून घ्यावेत. या कार्डच्या मागील बाजूवर सहभागी ग्रंथालयाची नावे, पुढील बाजूवर कार्ड देणाऱ्या ग्रंथालयाचे व कार्ड घेणाऱ्या वाचकांचे नाव व पत्ता असावा. ज्या वाचकांना आंतरग्रंथालय सेवा आवश्यक आहे. त्याच्याकडून अनामत रक्कम व वार्षिक फी घ्यावी. कार्ड देणाऱ्या ग्रंथालयाने याची नोंद ठेवावी. या कार्डवर त्या वाचकांला सर्व सहभागी ग्रंथालयांतून ग्रंथ घेता येईल. ग्रंथ देणाऱ्या ग्रंथालयाने प्रत्येक सहभागी ग्रंथालयासाठी केलेल्या ग्रंथ देवघेवीची नोंद ठेवावी. मुदत संपताच मूळ ग्रंथालयाने कार्ड जमा करून घ्यावे. हे ग्रंथ देवघेवीचे नियम सर्वांसाठी समान असावेत. सभासद कार्ड देताना त्या नियमांची माहिती व हमीपत्र भरून घ्यावे. ज्या ग्रंथालयाचे वाचक अन्य ग्रंथालयांचा लाभ घेतात, त्या ग्रंथालयाने दुसऱ्या ग्रंथालयास देवघेव प्रमाणानुसार वर्षाच्या शेवटी फी द्यावी. या पद्धतीत वाचकच देवघेव करीत असल्यामुळे संपर्क साधनाचा खर्च वाचतो. तसेच फी व अनामत रक्कम घेण्यामुळे ग्रंथ गहाळ होण्याची किंवा जमा न करण्याची शक्यता नसते, वाचकाची सर्व माहिती मूळ ग्रंथालयाकडे उपलब्ध असल्यामुळे वाचक संपर्क साधता येतो व वाचकाला एकदा कार्ड मिळाल्यास सोयीनुसार हव्या त्या ग्रंथालयातून सोयीच्या पद्धतीने ग्रंथ प्राप्त होतो. अशा प्रकारे आंतरग्रंथालयीन देवघेवीपेक्षा आंतर-ग्रंथालय वाचक पद्धत अधिक सोयीची आहे असे वाटते.

## ग्रंथालय जाळे

ग्रंथालयीन साधनांचा सहभागी उपयोग करण्यासाठी ग्रंथालय जाळे म्हणजेच माहितीचे जाळे हा ग्रंथसूचीय नियंत्रणासाठी व माहिती संप्रषणासाठी प्रभावी मार्ग आहे. ज्ञानाचा विस्फोट, माहितीची वाढती गरज, पैसा व कर्मचारी यांच्या मर्यादा, ग्रंथालय साधने, तंत्रे व संपर्क साधनांची कमतरता यामुळे सहकारातून अनेक मार्ग विकसित झाले. संगणकाच्या माध्यमातून ग्रंथालय जाळे निर्माण केल्यामुळे ऑनलाईन माहितीची देवघेव करता येते. भागीदारी तत्त्वावर महागडी तसेच ई-नियतकालिके व अंकीय वाचनसाहित्य खरेदी करून सहकारी तत्त्वावर सहभागी ग्रंथालयांना सेवा देता येते. दुसऱ्या महायुद्धानंतर अनेक देशांत ग्रंथालय जाळे कार्यरत झालेली आहेत. भारतात INFLIBNET, CALIBNET, DELNET, BONET, PUNENET, इत्यादी अनेक नेटवर्क पद्धतीतून सहकारी कार्यपद्धती अवलंबली जात आहे. Medlars हे वैद्यकीय महाविद्यालय ग्रंथालयांचे आंतरराष्ट्रीय नेटवर्क आहे.



## ग्रंथालय सहकारातील समस्या

प्रत्येक ग्रंथालयात बहिस्थ वाचकांना व अन्य ग्रंथालयांच्या वाचकांना विविध पद्धतीने स्थानिक स्तरावर ग्रंथालय सेवा दिल्या जातातच. तरीही अशा स्वतंत्र आंतरग्रंथालय देवघेवीची गरज आहे का ? असा प्रश्न प्रत्येक ग्रंथालय सेवकाला सतावतो. कारण ग्रंथाच्या सुरक्षिततेची अंतिम जबाबदारी त्यांचीच असते. त्यांच्यापुढे अनेक अडचणींची मालिका असते. मुख्य म्हणजे प्रत्येक ग्रंथालय अद्यापि प्राथमिक अवस्थेत आहेत. त्यांच्याच वाचकांना सेवा देताना अनेक अडचणी येतात. प्रत्येकाला त्याचा स्वतंत्र ग्रंथसंग्रह व त्याची सुरक्षितता महत्त्वाची वाटते. त्याशिवाय प्रत्येकास ग्रंथालय साधनांची, प्रशिक्षित सेवकांची, वरिष्ठांच्या मदतीची कमतरता भासते. त्याशिवाय स्थानिक स्वातंत्र्यावर आघात, संपर्क साधनांचा अभाव, दोन ग्रंथालयांतील अंतर, नेतृत्व गुणाचा अभाव, जादा कामाचा बोजा, परस्पर हेवा किंवा वितुष्ट इ. अनेक कारणांमुळे सहकारी तत्त्व रुजू शकत नाही. E-Books, E-Journals, Internet Computerization, Reprography, इत्यादीमुळे आंतर ग्रंथालय सहकार्य सहज साध्य होत आहे. But the major barriers are concerned with the people and not with technology or procedures. आज खरी गरज आहे ती ग्रंथपालांच्या व त्यांच्या सहकार्यांच्या इच्छाशक्तीची व शाखा प्रमुख्यांच्या मदतीची ! ग्रंथपालांच्या व्यावसायिक संघटना, तंत्र व अनुभवी ग्रंथपालांचे मार्गदर्शन, इत्यादीमुळे ग्रंथपालन क्षेत्रात सहकारी चळवळ रुजण्यास मदत होईल. प्रत्येकाने त्याग करण्याची व स्वतःची गैरसोय समजून घेण्याची मानसिकता ठेवावी. नवीन तंत्रान व त्याचा उपयोग करण्याची कला साध्य करावी. मानसिक तयारी व आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करण्याची क्षमता प्राप्त झाली की सर्व गोष्टी फारच सोप्या आहेत. ग्रंथालय नेटवर्कमुळे दूरवरच्या वाचकांशी संवाद साधता येतो. संवादाचे रूपांतर सुसंवादात करण्यासाठी परस्परात सहभागीदारी म्हणजे भागीदारी व सहकारी पद्धतीचा एकत्रित उपयोग करणे आवश्यक आहे.

आजच्या युगात माहितीसाधने, त्यांचे प्रकार व तंत्रज्ञान यांमध्ये वेगाने बदल होत आहे. माहितीची विस्फोट, नित्य नवीन संशोधन, नियतकालिकांच्या वाढलेल्या वर्गण्या, मर्यादित निधी, तांत्रिक व तज्ज्ञ मनुष्यबळाची कमतरता, इलेक्ट्रॉनिक व अंकीय माहिती साधने, अचूक व तत्पर सेवेची गरज, इत्यादींमुळे ग्रंथालयांना भागीदारी व सहकारी तत्त्वावर कार्य करणे अपरिहार्य ठरत आहे. एकविसाव्या शतकातील आव्हाने पेलण्यासाठी व प्रगत तंत्रज्ञानाच्या स्पर्धेत टिकण्यासाठी सर्व ग्रंथालयांनी सहभागीदारी (cooperation) ही व्यापारी पद्धती स्वीकारली पाहिजे. यातील स्पर्धा (competition), सहकार

(cooperation) व (consortium) भागीदारी ही समान फायदा मिळविण्यासाठी असते. ग्रंथालयांची स्पर्धा ही वाचकांना तत्पर व अचूक सेवा देण्याची आहे. विशेषतः इलेक्ट्रॉनिक प्रकाशने व इंटरनेटवरील अमर्याद माहितीसाठी योग्य वाचकापर्यंत पोहोचविण्यासाठी सहकार व भागीदारी ही तत्त्वे आवश्यक आहेत.

आपल्या देशातील ग्रंथालये लवकरच भविष्यातील ज्ञानसाधन केंद्रे होतील. शैक्षणिक ग्रंथालयांपुढे देशाची सुजाण व ज्ञानी पिढी घडविण्याचे आव्हान आहे. अंकीय माहिती साधने, अचूक व तत्पर सेवेची गरज, इत्यादीमुळे ग्रंथालयांना भागीदारी व सहकारी तत्त्वावर कार्य करणे अपरिहार्य ठरत आहे. आपण सहकार्यातून आपल्या वाचकांसाठी निश्चितच दर्जेदार सेवा देऊ शकतो. तेव्हा ग्रंथालय संसाधननिर्मितीसाठी सहकारी तत्त्वावर ग्रंथालयीन साधनांचा सहभागी उपयोग, आंतरग्रंथालय देवघेव, आंतरग्रंथालय वाचक सुविधा, ग्रंथालय जाळे, ग्रंथालय भागीदारी, इत्यादी उपक्रमांचे प्रभावी आयोजन करणे आवश्यक आहे.

ग्रंथालयांनी आपले विशिष्ट वाचक, विशिष्ट सेवा, विशिष्ट साधने या सीमारेषा ओलांडून अन्य वाचक व ग्रंथालयांसाठी आपली संसाधने खुली केली पाहिजेत. भागीदारी तत्त्वावर माहितीसाधने खरेदी करून व सहकारी पद्धतीने सेवा दिल्यास सहभागीदारी व्यापारी पद्धती यशस्वी होईल. यासाठी सर्वानुमते एक पद्धती स्वीकारणे, एकत्र काम करणे, कालांतराने त्या पद्धतीचे मूल्यमापन करून सुधारणा करणे, इत्यादी पोषक अभिवृत्तीचा स्वीकार केल्यास भागीदारी व सहकारी तत्त्व यशस्वी ठरेल.

संदर्भ पुस्तके


(१) Krishana, Kumar : (1991), Library Organization, New Delhi, Vikas Publishing House Pvt. Ltd.

(२) कोन्नुर, एम. बी. (संपा.) : (२००८), ग्रंथालय आणि माहितीशास्त्रकोश, पुणे, डायमंड प्रकाशन.

(३) महाजन, शां. ग. : (१९९५), ग्रंथालय आणि माहितीशास्त्र, पुणे : डायमंड प्रकाशन.

(४) मराठे, ना. वा. : (१९७९), भारतीय ग्रंथालय इतिहास, मुंबई अभिनव प्रकाशन.

(५) Mudda, Sara : (June 2009), Library Co-operation in 21st Century, in OCLC News Letter.

(६) नरगुंदे, रेवती : (२००२), ग्रंथालये आणि सामाजिक विकास, पुणे, युनिव्हर्सल प्रकाशन.





(७) Ojha, D.C.C. : (1989), Resource Sharing in Agricultural Libraries, in Advances in Library & information Science, Vol. 2, Jaipur, RBSA Publishers.

(८) फडके, द. ना. : (२००७), ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण, पुणे, युनिव्हर्सल प्रकाशन.

(९) Sharma, C. K. : (2005), Library Management, New Delhi, Atlantic Publication.

(१०) Coopetition : http//www.wikipedia.the free dictionary.


❑❑❑

# ग्रंथपरिचय

प्रकाश बर्वे
सहायक ग्रंथपाल, ग्रंथालय आणि माहितीस्रोत केंद्र
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
Email : prakash_barve123@rediffmail.com

**पुस्तकाचे नाव** : ग्रंथालयांतून गहाळ होणारी पुस्तके
(Loss of Books in Libraries)
**लेखक** : डॉ. शां. ग. महाजन
**प्रकाशक** : युनिव्हर्सल प्रकाशन
**प्रकाशन वर्ष** : २०११
**आवृत्ती** : पहिली
**पृष्ठे** : ४८
**किंमत** : रु. ७५/-
**ISBN** : 978-81-87552-22-2

पुणे विद्यापीठाचे नामवंत ग्रंथपाल डॉ. शां. ग. महाजन यांच्या प्रदीर्घ अनुभवावर आधारित 'ग्रंथालयांतून गहाळ होणारी पुस्तके' हा ग्रंथ ग्रंथपाल, ग्रंथालयशास्त्राचे विद्यार्थी आणि संबंध वाचकवर्ग यांच्यासाठी सिद्ध झाला आहे. ग्रंथालयांमधून पुस्तके गहाळ होण्याचे प्रमाण परदेशात तसेच भारतातही मोठ्या प्रमाणावर आहे. पुस्तके वाचली जातात ही त्यातली निश्चितच आनंदाची बाब आहे असे म्हणता येईल. डॉ. महाजन यांनी आपल्या पुस्तकाच्या पहिल्या प्रकरणामध्ये ग्रंथालय चालक, ग्रंथपाल यांची बाजू मांडलेली आहे. पुस्तके हरवू नयेत यासाठी घ्यावयाची खबरदारी, उपाय, वाचकांना मार्गदर्शन, ग्रंथालय सेवकांची जबाबदारी, ग्रंथयोजना याबाबतची माहितीही याच प्रकरणात आहे. दुसऱ्या प्रकरणात भारतातील सद्यःस्थितीबाबत तज्ज्ञांची मते देण्यात आली आहेत. तिसऱ्या प्रकरणात इंग्लंड व अमेरिकेतील पुस्तके गहाळ होण्यासंदर्भातील स्थिती आणि तेथील ग्रंथालय संघांशी केलेला पत्रव्यवहार दिलेला आहे. पुढील प्रकरणात शासन, विद्यापीठ व युजीसी यांच्याकडील परिपत्रकांवर आधारित माहिती देण्यात आली



आहे. वाचनसाहित्य संग्रह पडताळणीच्या पद्धतीही शेवटच्या प्रकरणात दिलेल्या आहेत. पुस्तके गहाळ होण्याच्या संदर्भातील काही रोचक अनुभवांचे वर्णन डॉ. महाजन यांनी केलेले आहे. साधारणपणे पुस्तके का चोरली जातात त्यामागे काही मानसशास्त्रीय कारणे असतात. त्यांचा शोध घेतल्यास ग्रंथालय सेवा अधिक परिणामकारक करता येणे शक्य होईल.

---

**पुस्तकाचे नाव** : महाराष्ट्राच्या ग्रंथालय चळवळीचे शिल्पकार
**लेखक** : डॉ. शां. ग. महाजन
**प्रकाशक** : युनिव्हर्सल प्रकाशन
**प्रकाशन वर्ष** : २०११
**पृष्ठे** : १०४
**किंमत** : रु. १०४/-
**ISBN** : 978-81-87552-2-15

महाराष्ट्रातील ग्रंथालय चळवळीत ज्यांनी मोलाचे योगदान दिलेले आहे, अशा उल्लेखनीय कार्यकर्त्यांची व्यक्तिचित्रे या ग्रंथामध्ये देण्यात आली आहेत. इ. स. १८०५ ते १९२१ या कालखंडातील ग्रंथालय चळवळीचा इतिहास डॉ. महाजन यांनी आपल्या पीएच. डी. संशोधनासाठी अभ्यासलेला असून 'पश्चिम महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीचा इतिहास' पुस्तकरूपाने यापूर्वीच प्रसिद्ध झालेला आहे. या पुढील कालखंड म्हणजेच १९२१ ते २०१० पर्यंत महाराष्ट्राच्या ग्रंथालय चळवळीतील महत्त्वाचे टप्पे व त्या टप्प्यांमध्ये कार्य करणाऱ्या व्यक्ती आणि घटना प्रस्तुत ग्रंथात निवडल्या असून त्या व्यक्तिचित्राच्या स्वरूपात देण्यात आलेल्या आहेत. या सर्व व्यक्तीबरोबर लेखकाचा प्रत्यक्ष संबंध वा काम करण्याची संधी मिळालेली असल्याने लेखनकार्यात अधिक जिवंतपणा आलेला आहे. ग्रंथालय संघ, ग्रंथपाल नेतृत्व, संघटन, कायदा, ग्रंथालय संगणकीकरण, विद्यापीठ प्रमुखांचे ग्रंथालयासाठीचे त्याचबरोबर ग्रंथालयशास्त्र शिक्षणक्रमासाठीचे योगदान अशा कितीतरी विषयांना लेखकाने हात घातलेला आहे. या सर्व व्यक्तींमुळे महाराष्ट्रातील ग्रंथालय चळवळीला एक निश्चित स्वरूपाची दिशा मिळालेली आहे.

प्रस्तुत ग्रंथ सार्वजनिक, विद्यापीठीय, महाविद्यालयीन तसेच शालेय ग्रंथालयांसाठी, त्याचबरोबर सामान्य वाचकांसाठीही अतिशय उपयुक्त आहे.

---

| | | |
|---|---|---|
| **पुस्तकाचे नाव** | : | पुणे शहरातील विज्ञानविषयक वस्तुसंग्रहालये |
| **लेखक** | : | डॉ. शां. ग. महाजन |
| **प्रकाशक** | : | पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे |
| **प्रकाशन वर्ष** | : | २०१० |
| **आवृत्ती** | : | पहिली |
| **पृष्ठे** | : | ८७ |
| **किंमत** | : | रु. १००/- |

विज्ञानाच्या अभ्यासासाठी वस्तुसंग्रहालये उपयुक्त माहिती देतात. पुणे शहरातील विज्ञान व तंत्रज्ञानविषयक वस्तुसंग्रहालयांची एकत्रितपणे माहिती डॉ. शां. ग. महाजन यांनी आपल्या पुस्तकातून दिली आहे. विज्ञान तंत्रज्ञानाचे वाढते महत्त्व लक्षात घेता विज्ञानविषयक वस्तुसंग्रहालये (Science Museums) यावरील पुस्तकाची नितांत आवश्यकता होती. डॉ. महाजन यांच्या पुस्तकामुळे ही उणीव भरून निघाली आहे. एकूणच सर्व प्रकारच्या वाचकांसाठी असलेले हे पुस्तक ग्रंथपालांनांही मार्गदर्शन करणारे आहे. विषयावार संग्रहालये, खगोल संग्रहालये, संदेशवहन, वनस्पतीशास्त्र, आयुर्वेदिक वनऔषधी, मत्स्यालय, वैद्यकीय वस्तुसंग्रहालय, हवामानशास्त्र या विषयांवरील संग्रहालयांबरोबरच कला व सामाजिकशास्त्रे व व्यक्तीविषयक वस्तुसंग्रहालये आणि इतिहासविषयक वस्तुसंग्रहालये व कलादालने यांचा समावेश करण्यात आला आहे. विज्ञानाचा अभ्यास आणि गोडी लावण्यासाठी शाळा महाविद्यालये याबरोबरच सामान्य नागरिकांसाठी उपयुक्त अशी माहिती या पुस्तकातून सादर करण्यात आली. ग्रंथपालांसाठी हे पुस्तक संदर्भसेवा देण्याबरोबरच सर्जनशील माहितीसाधने निर्मितीसाठी आवश्यक असणारी प्रेरणा देणारे आहे.

❑❑❑

# LIB 013
# ग्रंथालय आणि माहितीशास्त्र : घटना, घडामोडी, भाष्य

ज्ञानगंगा घरोघरी

*संपादक*

डॉ. मधुकर शेवाळे

*संपादक मंडळ*

प्रा. प्रवीण घोडेस्वार

डॉ. राजेंद्र कुंभार

डॉ. मोहन खेरडे

डॉ. सुषमा पौडवाल

डॉ. धर्मराज वीर

© २०११

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

*निर्मिती*

श्री. आनंद यादव, व्यवस्थापक, ग्रंथनिर्मिती केंद्र, य. च. म. मुक्त विद्यापीठ

*मुद्रक*

श्री. अरविंद पोतनीस, श्री ऑफसेट प्रेस, ७ ए, नाईस, सातपूर, नाशिक - ७

*प्रकाशक*

डॉ. प्रकाश अतकरे, कुलसचिव, य. च. म. मुक्त विद्यापीठ

नाशिक - ४२२ २२२.

## ज्ञानगंगोत्री

वर्ष १२ वे — ज्ञानगंगोत्री : जून-नोव्हेंबर २०११ — अंक १ व २

ISSN 2231-6507

*अनुक्रमणिका*


- संपादकीय : २
- ग्रंथपालाचा इतिहास : आधुनिक काळ : डॉ. मधुकर शेवाळे ४
- ई-लर्निंगचे ग्रंथालयातील स्थान : डॉ. प्रतिभा गोखले २२
- वाचकसंतुष्टीच्या पाऊलखुणा : श्री. आशुतोष गो. जोशी २९
- केवळ महत्त्व माहितीलाच (भाग ६) : बदलते समाजजीवन : डॉ. नागनाथ रा. रामदासी ३५
- ग्रंथालय संगणकीकरण उपक्रम : श्री. नारायण बारसे ४०
- साहित्यसूची : आशय विश्लेषण : स्नेहल सुनील जोशी : डॉ. नमिता खोत ४५
- उच्च शिक्षण आणि शोध संस्था दक्षिण भारत हिंदी प्रचार सभा, हैद्राबाद ग्रंथालयातील संदर्भसेवा विभाग : एक परिचय : प्रा. संतोष कांबळे ५५
- राष्ट्रीय विज्ञान संप्रेषण आणि सूचना संसाधन परिषद : श्री. आशुतोष गो. जोशी ६२
- ग्रंथालय सहकाराची कार्यक्षेत्रे : सौ. यु. के. राजोबा ६९
- ग्रंथपरिचय : श्री. प्रकाश बर्वे ८०


सुट्या अंकाची किंमत : संस्था रु. १०० — व्यक्ती : रु. ३०

वार्षिक वर्गणी : संस्था रु. ४०० — व्यक्ती : रु. १२०

मागील अंक उपलब्धतेनुसार पाठविले जातील. वर्गणीचा धनाकर्ष (डीडी) 'वित्त अधिकारी, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक' या नावे काढलेला आणि नाशिक येथे देय असावा.

**पत्रव्यवहाराचा पत्ता**

**वर्गणी व व्यवस्थापन -** डॉ. मधुकर शेवाळे, उप-ग्रंथपाल व प्रमुख, ग्रंथालय आणि माहितीस्रोत केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक - ४२२ २२२.

**संपादकीय (साहित्य पाठविण्यासाठी) -** डॉ. मधुकर शेवाळे, उप-ग्रंथपाल व प्रमुख, ग्रंथालय आणि माहितीस्रोत केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक - ४२२ २२२.

● या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.